म. ग्रं. सं. ठाणे

विषय


संग्रहालय क्रमांक


लेखक गो.

390

पुस्तकाचे नांव

सन





प्रतापशील विप्रवीर सरदार

# परशुरामभाऊ पटवर्धन

## यांचें पद्यात्मक चरित्र.

हें

गोविंद एकनाथ गोसावी, स्कूलमास्तर

यानें रचिलें

झणिज्झणितकंकणक्कणितकिंकिणीकं धनुर्ध्व-
मद्गुरु गुणाटणीकृतकरालकोलाहलं ॥
वितत्य किरतो शरानविरतस्फुरच्चण्डयो-
र्विचित्रमभिवर्धते भुवनभीममायोधनम् ॥ १ ॥

उत्तररामचरित.

( ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

हरी सखाराम खानोलकर यांनीं

धुंडिराज छा० छा०

सन १८९८.

किंमत १/२ एक रुपया दोन आणे.

# अभिप्राय

खानापूर, तारीख ५।४।९८.

रा. रा. गोविंदरावजी गोसावी यांनीं आरंभिलेल्या ऐतिहासिक सत्पुरुषांच्या पद्यात्मक चरित्रमालेंतील प्रस्तुत चरित्र हें तिसरें पुष्प होय. पहिल्या दोन पुष्पांपैकीं " श्रीमती अहिल्याबाई होळकर " यांचें चरित्र प्रसिद्ध झालें आहे. व दुसरें " श्रीमंत थोरले मल्हारराव होळकर यांचें चरित्र प्रसिद्ध व्हावयाचें आहे. हे तिन्ही ग्रंथ मी समग्र वाचून पाहिले आहेत. रा. गोसावी यांची कविता साधी पण रसाळ व प्रसादयुक्त आहे. त्यांत ही त्यांची प्रस्तुत कृति फारच सरस व नामी साधली आहे. सरदार परशुरामभाऊ पटवर्धन चरित्र नायक, व रा. गोसावी मार्मिक व सहृदय कवि, असा योग जुळल्यावर, महाराष्ट्रीय इतिहासप्रिय वाचकांची चित्तवृत्ति चरित्रवाचनानें उचंबळून, गत वैभवाच्या संस्मरणानें क्षणभर क्षुब्ध होणें केवळ साहजिक होय. वृत्ताची निवडही कथाप्रसंगास अनुरूप अशीच आहे. दुरान्वय व पादपूरणें क्वचितच आढळतात. ठिकठिकाणीं आधुनिक आचारविचारांवर मार्मिक विचार प्रकट केले आहेत. काव्य सर्वथा विद्वज्जनांस पसंत पडण्यालायख आहे, असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

**मंगेश जिवाजी तेलंग, बी. ए. एल. एल्. बी.**

**चिटणीस, सहकारिणी सभा खानापूर.**

# आश्रयदात्यांस विनंति

आपण कृपा करून अहल्याबाईच्या चरित्राच्या (        ) प्रतीस आश्रय दिला. यामुळें उमेद येऊन हा ग्रंथ छापून तयार करिता आला. यासही मागील प्रमाणें मदत केली असतां, ‘ राणोजी, जयाजी व जनकोजी शिंदे ’ यांचें १००४ कवितांत रचलेलें चरित्र आपणास थोड्याच दिवसांत सादर करितों. सुज्ञास जास्त प्रार्थना नलगे. छापखाना बेळगांवास, प्रकाशक खानापूरास व मी हुबळीस आणि ह्या तिन्ही ठिकाणीं ( हें काम चाललें असतां ) प्लेगचा तडाका. यामुळें चित्तस्वास्थ्याचा अभाव. असा प्रकार झाला. सबब ग्रंथांत जीं फार अशुद्धें राहिलीं आहेत. तीं पुनरावृत्तीशिवाय निघावयाची नाहींत, सबब शुद्धिपत्र दिलें नाहीं. आपणास ही चूक सहज वाचतांना ध्यानीं येणार आहे. आपणाकडून येणाऱ्या सूचना व अशुद्धांचा निकाल पुनरावृत्तींत होईल. पुस्तकाची किंमत १८२ व टपाल खर्च ( ८-। ) कृपा करून लौकर पाठविणे. आणि दुसरी प्रार्थना ही कीं, प्रत्येकानें निदान एकेक वर्गणीदार नवा मिळवून दिला असतां, मोठे उपकार होणार आहेत. सेवेसी श्रुत होय.

नम्र प्रकाशक.

# प्रस्तावना

सतत-प्रयत्नी व दीर्घोद्योगी अशा पुरुषांचीं चरित्रें, मनास आनंद देतात. त्यांपासून चांगला बोध होतो. सहृदय मनुष्यानें तीं कितीही वेळ वाचिलीं, तरी वारंवार वाचावींशीं वाटतात. विचारी मनुष्यास त्यांपासून सांसारिक व व्यावहारिक वागण्याचे रस्ते दिसतात, प्रसंगांतून पार पडण्याचे उपाय सुचतात, व रिपुमित्रांशीं कसें वागावें हें समजतें. सत्याऽसत्य, न्यायाऽन्याय, इत्यादिकांचे परिणाम चरित्र वाचतांना प्रत्यक्ष दिसतात, यामुळें सत्यानें व न्यायानें वागण्याचा मनुष्याच्या मनाचा निश्चय ठरतो. इत्यादि अनेक फायदे सत्पुरुष-चरित्रावलोकनानें होतात. आणि हे फायदे करून घेण्याची इच्छा तृप्त होण्याचे मार्ग मुद्रण कलेनें तर फारच सोपे केले आहेत, ही एक परमेश्वराची कृपाच समजली पाहिजे.

क्षीर हा पदार्थ कोणत्याही पात्रांतून प्राशन केला, तरी त्याचें माधुर्य कमी होत नाहीं. परंतु स्वच्छ व उत्तम पात्रांतून घेणारास जास्त आनंद होतो, हें सर्वानुभव सिद्ध आहे. त्याच प्रमाणें ग्रंथाचेंही आहे. सुप्रसिद्ध व विद्वान ग्रंथकाराच्या लेखनींतून सहज बाहेर पडलेले ग्रंथ रसाळ व चित्ताकर्षक होतात. हें कालिदास, भवभूति इत्यादि प्राचीन कवि व मोरोपंत, वामन वगैरे प्रासादिक कवि यांच्या ग्रंथांवरून सर्व-मान्य आहे. ह्मणून असलीं कामें त्यांनाच योग्य आहेत.

थोडीशी देशभाषेची सेवा करावी, हा उद्देश मनांत धरून मीं यथामति सेवा केली आहे. ती रसिकास मान्य व्हावी ह्मणून प्रयत्न केला आहे. तो कितपत साधला आहे हें पाहण्याचें काम सुज्ञाचें आहे. लोकाश्रय मिळून दुसऱ्या ग्रंथास उत्तेजन येईल अशी आशा आहे.

विद्वद्वर्य रा० रा० **मंगेश जिवाजी तेलंग** बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं आपला अमूल्य वेळ खर्चून हें काव्य समग्र वाचून पाहिलें, जागजागीं महत्त्वाच्या सूचना केल्या व योग्य असी पुष्कळ मदत केली. याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. **रावसाहेब तुकाराम**

गोविंद कुलकर्णी मु. हुसंगाबाद यांनीं या ग्रंथास ( ५० ) पन्नास रुपये बक्षीस दिलें. हें त्यांचें औदार्य प्रशंसनीय आहे. त्याच प्रमाणें राजकवि श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकर यांणींही हा ग्रंथ पाहून बक्षिस म्हणून ( १५ ) पंध्रा रुपये दिले. यावरून त्यांची गुणज्ञता व्यक्त होते त्याबद्दल त्यांचाही आभारी आहें.

माझे मित्र रा. हरि सखाराम खानोलकर ( हे मजप्रमाणेंच द्रव्यानें गरिब असतांही ) यांनीं हाही ग्रंथ प्रकाशित करण्याचे कामीं सर्व द्रव्यसाह्य व शारीर मेहनत केली. याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे.

हें काव्य रचतांना रा० रा० धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धे यांनीं लिहिलेला 'पेशवाईतील धामधुमीचा देखावा' हा ग्रंथ फार उपयोगीं पडला. याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहें.

'श्रीमती देवी अहल्याबाई साहेब' व 'मल्हारराव होळकर' यांचीं चारित्रें संपूर्ण झाल्यावर हा तिसरा ग्रंथ परमेश्वरानें पुरा करविला आहे. परमेश्वरापाशीं प्रार्थना करून हा प्रस्ताव लेख संपवितों.

कामेरी, आगस्ट १८९८ } गोविंद एकनाथ गोसावी इनामदार पळसगांवकर.

संग्रहालय
काव्य नं. ३२
ना.

## अनुक्रमाणिका


| भाग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | कुलवृत्त व जनुकथन .... .... .... | १ |
| २ | पटवर्धनकृत युद्धें व त्यांत भाऊचा संबंध .... .... .... | ११ |
| ३ | हैदराऽभ्यवस्कंदन .... .... .... | २१ |
| ४ | हैदरसमरपरिसमाप्ति .... .... .... | ३९ |
| ५ | भ्रातृजवध व रघुनाथराव .... .... .... | ५० |
| ६ | आंग्लपराभूति .... .... .... | ६७ |
| ७ | टिप्पुसंग्राम .... .... .... | ७९ |
| ८ | शिंदाविभवदर्शन .... .... .... | ९२ |
| ९ | खर्ड्यांची लढाई .... .... .... | १०३ |
| १० | साचिव्यलाभ .... .... .... | ११२ |
| ११ | परिसमाप्ति .... .... .... | १२४ |

ग्रा० ३६४०
वा.काव्य ३२

देवं वन्दे

महेशसुहृदे नमः । ओंनमः सिद्धं ॥

# सरदार परशुराम भाऊ पटवर्धन वीररत्न यांचें चरित्र

[ कुलवृत्त-जनुकथन. ]

(शार्दूलविक्रीडित)

शंभूची दयिता उमा पशुपती हीं एकदा सन्मती ।
मात्रंकीं स्थित जो गजास्य सुत त्या चुंबावया इच्छिती ॥
शंभूचें मुख आणि तज्जननिचें आलेंच चुंबावया ।
तें हासे मुख-चुंबना चुकवुनी विघ्नेश वंदा तया ॥ १ ॥
श्रीविष्णू गिरिजा तसेंच नमितों श्रीविठ्ठलाला अती ।
विद्यादात्रि सती सरस्वति नमी बुद्धीस द्यायाप्रती ॥
जी लंबोदरपत्नि सच्चरित हें देवी करो पूर्ण ती ।
खंडेराव कऱ्हेपठार-विभुजी केली तयाला नती ॥ २ ॥
दक्षाचा मख नाश जो करि जवें पत्नी-सतीच्या मुळें ।
ज्यातें पाहुनि धांवती चहुंकडे तैं दानवांचीं कुळें ॥
भक्ताला सुख पूर्ण देउन पुढें सायुज्यमुक्ती तया- ।
देतो, नित्य विभू चराचर रची विघ्नां हरो तद्दया ॥ ३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

शंभूलागिं नमून मी रचितसें सद्विप्र जो चांगला ।
ज्यानें गाजवुनी पराक्रम बहू सन्मान संपादिला ॥
राज्यस्तंभचि भासला द्विजनृपा जो पेशव्याचें करी ।
मोदें साह्य सदा जयास नमिती झुंजार भारी अरी ॥ ४ ॥

( आर्या )

त्यांचें चरित्र कथितों, हर्षे मी परशुरामपंताचें ।
ज्यांचे वंशज अजुनी, एथें करितात राज्य हो साचें ॥ ५ ॥

( शार्दूलविक्रीडित )

खेडें कोतवडें लहान अगदीं रत्नागिरी-प्रमुनी ।
आहे योजन अर्ध राहत असे तेथें सुभट्टाग्रणी ॥
नामें जो हरभट्ट विप्रवरहो बाळंभटाचा सुत ।
वागे सज्जनसा स्वकर्मरत जो सर्वांप्रती संमत ॥ ६ ॥
शेंड्याची मुलगी तयास दिधली लक्ष्मी जियेचें असे ।
चित्ताऽऽकर्षक नाम ईश्वरपदीं चित्तास लावीतसे ॥
वंशोपार्जित भूमि थोडि असुनी भिक्षूक-वृत्तीप्रती ।
सांभाळून कसें तरी उभयतां काळाप्रती कंठिती ॥ ७ ॥
त्यांचें स्वास्थ्य न राहिलें परि तसें विस्तार झाला अती ।
होतें ग्राम लहान यास्तव पुरी प्राप्ती न हो संप्रती ॥
चिंताक्रांत सदा सतीसह पती दारिद्र्ययोगें अती ।
कौटुंबीय उपासि हो मरती तैं प्रार्थी उपाध्याप्रती ॥ ८ ॥
गाड्याच्या-वरि नाव आणि कधिं तो गाडाहि नांवेवरी ।
ऐशा गोष्टि कधीं कधीं घडति या लोकांमधें भूवरी ॥
दुःखाचा नच येइ वेळ कधिंही कोणावरी हें कधीं- ।
नाहीं होत ह्मणून देत न कधीं त्रासास लोकां सुधी ॥ ९ ॥

( स्रग्धरा )

भट्टें दोघां सुतांचा उपनयनविधी सारण्याला वड्याला ।
स्वोपाध्याला तदा हो बहुत विनविलें द्रव्य द्याया स्वतांला ॥
'नाहीं' तो साफ बोले भट्ट निजगृहिं ये, लागली थोर चिंता ।
मुंजी होती कशा या परिवृंतिहि कसी चालते सर्व आतां ॥१०॥

१ परिवार.

ना. ३१०५३२



( शार्दूलविक्रीडित )

ज्यांचा उंबरठा कधीं चढुं नये त्यांच्याकडे जाउनी ।
वेंगाडी मुख तो ' प्रभू धन मला द्यावें ' अशा भाषणीं ॥
त्यांनीं देउंनये धना परि भटा टोंचूनि बोलोनिया ।
मानाचा करितीच भंग परते तो विप्र तेथूनिया ॥ ११ ॥

( शिखरिणी )

तदा भट्टाला त्या भगिनि उपयोगी पडलि जी ।
तयाच्या बापानें भुद्रगडि होती दिली अजी ।
तिला ही भावाची अडचण कळोनी मग करी ।
स्वतांच्या भ्रात्याला मदत बरि दांडेकर[1]-करीं ॥ १२ ॥

( स्रग्धरा )

मुंजीची दूर होतां अडचण मग तो विप्र तैं ह्याच गांवीं ।
संसाराचाहि गाडा सुखरुप निभण्या काय युक्ती करावी ॥
ऐशा चिंतेंत गेला बुडुन, गणपती जाउनीया पुळ्याला ।
आराधी फार भावें हरित-तृण-रसा पीउनी सेवि त्याला ॥ १३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

ऐशा घोर तपास तो द्विज करी संतुष्ट विघ्नेश तो ।
झाला आणि तयासि स्वप्निं वदला जो संकटें नाशितो ॥
'भक्तीनें बहु तुष्ट मी तुजवरी झालों द्विजा जा घरीं ।
सारी भोजन तूं त्वरें मग निघे जायास देशावरी' ॥ १४ ॥

( स्रग्धरा )

' जातांना घाट-माथा चढुन वरति जो विप्र भेटेल त्याला ।
स्वामी भावें करी तूं मदत करिल तो आपदा सारण्याला- ॥
भारी देईल. तूतें धन उदय तुझा त्यामुळें खास होतो ' ।
ऐसें सांगून त्याला त्वरित गणपती गुप्त झाला तिथें तो ॥ १५ ॥

---

१ दांडेकराच्या हातीं.

( शार्दूलविक्रीडित )

नागा होउनि भट्ट मानसिं मुदें भारी भरे तो भला ।
झालें सार्थक देव स्वप्निं मजशीं येऊनिया बोलला ॥
आज्ञेच्या परि तो त्वरें मग निघे देशावरी जावया ।
पत्नीचा द्विज घे निरोप सतिही दुःखेंच तो दे तया ॥ १६ ॥

( आर्या )

आला घाट चढोनी, बघतो तों एक बाल सुकुमार ।
वय अल्प असे ज्याचें, उष्णें मुख लाल जाहलें फार ॥ १७ ॥
घामानें थबथबलें, वृक्षच्छायेंत हुश्श जें करित ।
बसलेलें त्या दिसलें, सान्निध माताहि येइ दृष्टींत ॥ १८ ॥
दुःखाचा सुसकारा, विधवा टाकीत बैसली होती ।
फिरलें नशीब ह्मणजे, विघ्नें येतात धांउनीच अती ॥ १९ ॥
पाहुनि हरभटजीची, कंबर खचली सचिंत होवोनी ।
लावी भाळीं कर तो, बोले चित्तांत दुःख पावोनी ॥ २० ॥
‘ या अर्भका कडूनी, दैव कसें उदय पावतें माझें ’ । ( जें )
न्याहाळी बालमुखा, होतें मोहक बहूत सुंदर जें ॥ २१ ॥

( आर्या )

तच्चक्षू तेजस्वी, मुद्रा त्याची तशीच तरतरित ।
सतेज लिंबापरि तत्-कांतीला राहिला तदा बघत ॥ २२
भानावर भट आला, तच्चिन्हांवरुन खातरी झाली ।
होइल बालक राजा, वाटे तत्खिन्नता मुळीं गेली ॥ २३ ॥

( मन्दाक्रान्ता )

बोले तेव्हां हरभट मनीं ‘ या मुलाच्या करानें ।
माझी दैना दुर करुं असें इच्छिलें कीं प्रभूनें ॥
याच्या हस्तें कनक दिन तो दाखवीतो गजास्य ।
त्याची लीला अगम सकलां जो करी भक्त-दास्य ॥ २४ ॥

तेव्हां विप्रें पडशिस पुनः टाकिलें स्कंधदेशीं ।
काठी हातीं धरून मग तो पातला त्यांजपाशीं ॥
त्या बाळाच्या जननिस पुसे, कोण? कोठून आलां? ।
दुःखें सांगे रडुन जननी सर्व वृत्तान्त त्याला ॥ २९ ॥

( शार्दूलविक्रीडित )

'माझें ह्मापण गांव तेथिल असें मी विप्रपत्नी पती ।
दुर्दैवें यम नेइ आत्मभवना माझा द्विजा सन्मती ॥
मौंजीबंधन व्हावयास मुलगा कोठें तरी घेऊनी ।
जावें हें मनिं आणुनी द्विजवरा मी जात आहें ह्मणीं' ॥२६॥
हाही तीस वदे 'असे मजहि तो उद्देश बाई चला ।
जाऊं संगतिनें' तदा द्विज मुला घे आणि संगें तिला ॥
मार्गाला क्रमुनी तिघे हळुहळु आले गिरिला मुदें ।
जोतीबास नमून मागति तया देवा! यशालागिं दे ॥ २७ ॥

( मालती )

इचलकरंजिस सर्व पोंचती ।
हरभट घेउनिया मुलाप्रती ॥
नृपगृहिं नेउन त्या नृपा कथी ।
सकल तदा सुखदुःख सन्मती ॥ २८ ॥

( शिखरिणी )

दयाळू राजानें करुन सुकृपा मुंजहि बरी ।
मुलाची केली त्या पदरिं मग घे ठेवुन घरीं ॥
तमाला सूर्यानें तसिच विपदा दूर पळवी ।
मुलाला पुत्राच्या परि समजुनी त्यास मिरवी ॥ २९ ॥

( आर्या )

नारायणास दिधला, दरबारीं यावयास परवाना ।
झाला सानंद तदा, देती त्याला समस्त सन्माना ॥ ३० ॥

( शिखरिणी )

स्वभावानें होता मुल मनमिळाऊच उमदा ।
नृपाची मर्जीही बहुतचि असे त्यावरि सदा ॥
मुलानें पागेच्या हयपतिसवें तैं परिचया ।
करूनी अश्वाच्या-वरील कृति केल्या शिकुनिया ॥ ३१ ॥

( शार्दूल विक्रीडित )

बाळाचे गुण त्या नृपास दिसती केव्हां स्वतां वा कधीं ।
लोकांच्या कडुनी तया समजती वाटे तया तो सुधी ॥
या-योगें नृप पुत्र मानित असे हाही नृपा वा मनीं ।
मानोनी नृपतीस तोपवि सदा मानें वचें वंदनीं ॥ ३२ ॥
राजा घोरपडे करीत असतां एके दिनीं भोजना ।
तों नारायण पातला सहजची राजा वदे सज्जना ॥
नाना तूं मम पुत्र ना वदविसी ये भोजनाला तरी ।
हें ऐकून तयार होय सह हा जेवावया सत्वरीं ॥ ३३ ॥
त्याचें शौर्य बघून ती चतुरता संतुष्ट झाला नृप ।
अश्वाधीश करी तयास नृपती मोदें अती सत्कृप ॥
राजानंतर हाच राव बनला तद्राज्य-भागीं तदा ।
लोकां रंजवुनी स्वराज्य मग तो हाकी सदा सर्वदा ॥ ३४ ॥

( आर्या )

हरभटजी तैं झाले, मुख्योपाध्याय त्या नृपाचे ते ।
ज्यांनीं त्याला एथें, आणुनि अन्नास लाविलें होतें ॥ ३५ ॥
यापरि बाळाकरवीं, दैना फिटली समस्त विप्राची ।
लागे सुदिन बघाया, विप्रें स्त्री आणिली सती साची ॥ ३६ ॥
परिवार आणुनी तो, आनंदें राहिला नृपाजवळ ।
हरि हरि ह्मणत मुखानें, जायाला लागला सुखें काळ ॥ ३७ ॥
सातारकरनृपाच्या, करवीराच्या पतीस उपयोगीं ।
नारायण नृप पडला, बहु मिळवी कीर्ति मान तद्भागीं ॥३८॥

नारायणा न सुत हो, यास्तव हरभट निघे गिरी-लागीं ।
व्यंकट आराधाया, तत्पत्नी घेउनी तया जागीं ॥ ३९ ॥
झाला पुत्र नृपाला, व्यंकोबा ठेविलें तया नांव ।
आराध्यदैवताचें, स्मारक किंवा सदाच शिव नांव ॥ ४० ॥
पंचम वर्षीं त्याचा, विधिनें व्रतबंध चांगला केला ।
हरभटानें मोदें, सुतसा अंकीं जयास वाढविला ॥ ४१ ॥

( आर्या )

रामा माधव भास्कर, कृष्णा गोविंद आणि त्रिंबकजी ।
बाळाजि पंत सप्तम, हरभटजीचे सुपुत्र हे गाजी ॥ ४२ ॥
अल्पवयीं मृत्यु-मुखीं, पडला झादेव पुत्र भटजीचा ।
गोविंद राम-त्रिंबक, यांचा गाजे प्रताप बहु साचा ॥ ४३ ॥
बालपणीं त्रिकुटाचें, तेज दिसे चांगलें जनालागीं ।
इभ्रत मर्दुमकी ही, त्यांची भासे जना मनाजोगी ॥ ४४ ॥
जो तो भाकीत करी, धैर्याचे मूर्तिमान पुतळे हे ।
शौर्याचे ही होतिल, स्पष्ट असा रंग हा दिसत आहे ॥ ४५ ॥
तैसें घडलें पुढतीं, द्विजकुल पावे तदा समुन्नतिला ।
हे तीन बंधु कीर्ती, पावुनि बहु पात्र जाहले स्तुतिला ॥ ४६ ॥
ह्या तीन बधुंना तें, दिधला सरदार हा किताब बरा ।
सन्मान नृपें केला, जनही बहु मानिती त्रया नृवरां ॥ ४७ ॥

( शार्दूलविक्रीडित )

जो तारा चमके पुढें महिवरी ज्यानें प्रतापें अती ॥
सारा देश दणाणुनी चहुंकडे सुख्याति केली हि ती ।
ज्याचें धैर्य अपार पारहि नसे यद्वीरवृत्तेप्रती ।
रामाजी सुत ग्रंथ-नायक असे भाऊ महासन्मती ॥ ४८ ॥
जन्मे श्रावण शुद्ध अष्टमि दिनीं बासाष्ट सोळा शतीं ।
पादाक्रान्त करी बहू अवनिला शत्रू जया वन्दिती ॥
ऐसा काळ सुखेंच क्रमीत असतां सद्विप्र तो आपुला ।
मोठी गोष्ट घडे जिने भट पुढें आला तदा तो भला ॥ ४९ ॥

( स्रग्धरा )

बाळाजी पेशव्याची उपवर दुहिता आनुबाई जियेचें ।
होतें तें नांव तीतें जनक ठरवि तो त्र्यंकुला द्यावयाचें ॥
त्याचा मध्यस्थ होता हरभट यशहीं त्यांत देई परेश ।
त्या योगें पेशव्याच्या गृहिं सहजचि हो जाहला तत्प्रवेश ॥ १० ॥
त्यावेळीं बाजिराजा प्रमुख अधि।तो सर्व वीरांत होता ।
युद्धाची वेळ होती विषय दणदणी भीति वाटे समस्ता ॥
ज्या वीरें आणिलें तैं शरण यवनपा धाक भारी जयाचा ।
त्याचा आधार लाभे मग उदय कसा होईना त्या द्विजाचा ॥ ११ ॥

( आर्या )

रामा-गोविंदाची, दाद तदा त्या मुली मुळें लागे ।
बाजीरावापाशीं, जो बाजी सद्गुणी खरें वागे ॥ १२ ॥
इंद्रोजी कदमाच्या, पागेची फडणिशी दिली त्यांना ।
दावे वाकब सुंदर, नित्य धन्यालागिं देति बहु माना ॥ १३ ॥
त्यांनीं काम स्वतांचें, उत्तम करुनी धन्यासवें समरीं ।
जावें आणि लढावें, शौर्यें खड्गें धरून नित्य करीं ॥ १४ ॥
केव्हां वीरवरांनीं, कडी करावी धन्यावरीहि रणीं ।
जिंकुनि अरिला धरिती, किंवा धाडिति तया कृतान्त-वनीं॥१५॥
कदमहि सज्जन होता, संतति त्याला नसे बिचाऱ्याला ।
स्व-स्वामीपाशीं तो, वाखाणी या प्रताप-शीलांला ॥ १६ ॥
माझ्या-मागें दोघे, पागा वीर्यें तशीच चातुर्यें ।
खाशी चालवितीलचि, द्यावी ती त्यांजलाचि विद्वर्यें ॥ १७ ॥

( मन्दाक्रान्ता )

पावे जेव्हां कदम मृतिला तैं दिलें स्थान त्याचें ।
गोविंदाला द्विजनृपतिनें रत्न जाणूनि साचें ॥
स्वभ्रात्याच्या चमुमधि दिलें एक रामा ठिकाण ।
लाभे तेथें यशहि बहु तो फार पावेच मान ॥ १८ ॥

बा. कोथ्य ३८

## कुलवृत्त व जनुकथन.

### ( शिखरिणी )

चिमाजी अप्पाच्या चमुंत मिळतां स्थान बरवें ।
तया रामाजीनें बहु मिळविलें सद्यश नवें ॥
सवाई नांवाच्या मदयुत करीला पकडुनी ।
धना जेरीला त्या अणुन मिळवी स्वामिकडुनी ॥ ९ ॥

### ( स्रग्धरा )

सत्राशें पस्तिसाच्या इसवित चिमणा वीर तो जंजिऱ्याच्या ।
शिद्दीशीं युद्ध कोपें करितच असतां रेवदंड्यास त्याच्या– ॥
रामाजीनें सुशौर्यें बळकटहि गडा आणिलें हस्तकीं त्या ।
शूराला लागली त्या गडबडित करा गोळि तैं सैन्य-नेत्या ॥ १० ॥

### ( शिखरिणी )

फिरंग्यापासूनी वसइ हरतांना चमुपती ।
फिरंग्याशीं झुंजे द्विजचिमण तेव्हां भटपती ॥
प्रतापाला रामा गड मिळवुनी दावि कुतुकें ।
बहू माना पावे धन, यश मिळे फार चमके ॥ ११ ॥
चिमाजी अप्पानें खुष मनिं बहू होउन दिलें ।
तयाला स्वारांचें पथक सगळें खास अपुलें ॥
अशी राम-ख्याती चहुकडुन व्हायास बरवी ।
यदा लागे तेव्हां स्व-परशु तया दुःख वरवी ॥ १२ ॥

### ( स्रग्धरा )

रामाजी पंत योद्धा यवनपतिसवें झुंजुनि जिंकतांना ।
बुंदेलांतील राजे शरण सकल तैं हस्तकीं आणतांना ॥
एका एकीं तयाला मृति दिलि उदरें ब्रह्मवर्तानजीक ।
अश्वीनीं शुक्ल सप्ता तिथिस अरिस जो दाखवी फार धाक ॥ १३ ॥

---

१ आकाशाची कुऱ्हाड. २ गोविंदरावास. ३ रामाजीपंतास.

( शार्दूलविक्रीडित )

गेलें रत्न अमोल मोल न गुणा ज्या रामजीच्या असे ।
दुःखीं तच्चमु सर्व तैं तळमळे "हे ईश्वरा तूं कसें— ॥
या रत्ना हरुनीच दुःख दिधलें रे तूं कृपेचा निधी ।
ऐसें गाजत फार ब्रीद असतां केली कमी कां सु-धी" ॥१४॥
ही वार्ता कळतां घरीं सकलिकां आक्रांत हो माजला ।
कांता मोकलुनीच धाय पडली भूमीवरी निर्मला ॥
हस्तें वक्ष पिटी ह्मणे "मम सुता हो कोण सांभाळितो ।
आतां आणि तसाच काळहि पुढें कंठूं कसा मीहि तो" ॥१५॥
भाऊचें दश वर्ष संपत तदा आलेंच होतें पिता ।
जाई सोडुनि स्वर्गिं मातृ-सु-गलीं मारी मिठी तत्वतां ॥
आईला मग बोलला रडुनि तो "बाबा मला टाकुनी ।
गेले सांग कुठें कशास; मजला भेटावया ने झणीं" ॥ १६ ॥

( स्रग्धरा )

वाडा आक्रंदनानें सकल दणदणे सर्व आकूल झाले ।
दुःखें भ्रांत्रीय त्याचा महिवरि पडला, दुःख तैं आवरीलें ॥
त्यानें केलें विवेकें-करुन चुलतिच्या सांत्वनाला जियेनें ।
रायाला थोर केलें वदत मग तिला "टाक दुःखा त्वरेनें"

( शार्दूलविक्रीडित )

"काकांनीं मजला जसें स्व-सुतसें पाळूनि सांभाळिलें ।
भाऊलाहि तसेंच पाळिन बरें काकी! अती चांगलें ॥
नाहीं अन्तर मी तयास कधिही देणार ध्या अन्तरीं" ।
ऐशा सांगुनि चार गोष्टि तिजला आणीच भानावरी ॥ १८ ॥

( आर्या )

पुरुषोत्तमरावानें, शब्द खरे आपुले पुढें केले ।
भाऊला बापाच्या, स्मृतिला त्यानें कधीं न होऊं दिलें ॥ १९॥

---

१ पुरुषोत्तमराव ( भावाचा मुलगा ).

वा. काव्य ३८

... १२ ... ११

## कुलवृत्त व जनुकथन.

स्वसुतापरी तयाचें, प्रेमें पालन करी सदा राव ।
झाल्यावर थोर तया, बापाचें पथकही दिलें सर्व ॥ ७० ॥
[ बंधू मरून त्याचा, विषय मिळावा ह्मणून झटपटती ।
चित्तीं ध्यावें त्यांनीं, दुष्ट असे जे जगामधीं असती ॥ ७१ ॥
कोणी लिवें नारळ, उतरून बंधूस मारण्या टपती ।
चारिति विषास किंवा, फसविति त्याला पदोपदींच अती ॥ ७२ ॥
लक्ष्मीप्रती न भुलुनी, औदार्यें आणि शुद्ध भावानें ।
वागावयास झटती, त्यांना माझीं असोत शत नमनें ॥ ७३ ॥ ]
पुरुषोत्तम-रावानें, पितृ-धना सर्व भाउला दिधलें ।
आनंद पावला मग, मत्त न होउन धना न बळकविलें ॥ ७४ ॥
रावाच्या शिक्षेनें, भाऊला लागलें खरें वळण ।
वीराऽग्रेसर भाऊ, तोहि गिरी लावुनी सदा स्वमन ॥ ७५ ॥
राव जसा वीर असे, तैसा तो कारकून ही होता ।
दोन्ही कलांमधें या, आलें प्राविण्य भाउच्या हाता ॥ ७६ ॥
तेरीज बेरजादी, लेखन-कुशलत्व आणि दरबारी— ।
सारी माहिति रावें, दिधली तेव्हां तयास सर्व खरी ॥ ७७ ॥

### ( शार्दूलविक्रीडित )

अश्वाला भरधाव सोडुनि झणीं भाल्याप्रती फेंकणें ।
गोळी सोडुनि नेमही न चुकतां पृथ्वीवरी पाडणें ॥
पट्टयाचा करणेंच हात बरवा इत्यादिकांच्या-मधीं ।
तो भाऊ मिळवी खरी प्रविणता रावाकडूनी सुधी ॥ ७८ ॥

### ( आर्या )

शूरत्वाच्या बीजा, शिक्षणरूपी विपूल जल मिळतां ।
झाला प्रचंड वृक्षचि, धीरत्वाचा जगा दिसे जनिता ॥ ७९ ॥
चवदाव्या वर्षीं तो, भाउ निघे द्यावयास समरातें ।
उत्साहें युद्ध करी, ज्यानें तें पूर्वि पाहिलें नव्हतें ॥ ८० ॥

कर्णाटकांत स्वारी, श्रीमंताचीच चालली होती ।
वेगें सावनुरावरि, भाऊची होति तीमध्ये मूर्ती ॥ ८१ ॥
रण करण्याचा त्याचा, अगदीं पहिला प्रसंग असतांही ।
दावी अतूल शौर्या, अरि-शिर-कमलांस भूमिला वाही ॥ ८२॥

## ( शार्दूलविक्रीडित )

सिंहाचा शिशु अल्पसाहि असतां हत्तीवरी धांवतो ।
चित्तीं भीति मुळीं कधीं न धरितां त्याला जवें गांठितो ॥
त्याचे फोडुनि गंड आत्म-नखरें रक्ता पितो सत्वरीं ।
ऐसी या शिशु भाउची कृति दिसे भांबावला तैं अरी ॥ ८३ ॥

## ( आर्या )

मुजफरजंग ह्मणोनी, कोणी माणुस पुण्याहुनी पळुनी ।
आला सावनुरामाधें, आश्रय त्याला मिळे नृपाकडुनी ॥ ८४ ॥
यास्तव हें युद्ध सुरू, झालें होतेंच सावनुर-पा-शीं ।
तें तीन मास चाले, शत्रू आला बहूत टेंकीशीं ॥ ८५ ॥
भाऊ पुरुषोत्तम हे, होते चम्वग्रिं जिंकण्या अरिला ।
श्रीमंत जरा मागें, राहून बघती मुदेंच शिशुकृतिला ॥ ८६ ॥
गोपाळराव यांच्या, वामभुजीं एक आणि पदकमळीं ।
गोळ्या दोनचि घुसल्या, यास्तव पडले तसेंच भूमितळीं ॥ ८७ ॥
पटवर्धन-वीरांनीं, या युद्धीं आपुली खरी शैली ।
स्वामीस दाखवूनी, खुष केलें आणि कीर्ति वाढविली ॥ ८८ ॥
भाऊ अल्पवयाचा, परि अरिचमुला त्रिरीच असिनें तो ।
वीरां महिवरि भारी, पाडी दांतीं नबाब तृण धरि तो ॥ ८९ ॥
ऐसी भाऊची त्या, कृति पाहुनि मोद जाहला सकलां ।
"शाबास परशुरामा," नाद असा नृपचमूमधीं घुमला ॥ ९० ॥
श्रीमंताची मर्जी, होतकरू या नवीन वीराला ।
पाहुन खुष बहु झाली, दिधला पोपाख चांगला त्याला ॥ ९१ ॥

कोरेगांव तयाला, बक्षिस दिधलें मुदें प्रवीर नरा ।
तत्पृष्ठीं कर फिरवी, मग बोले "या पुढें असेंच करा" ॥ ९२ ॥

इति श्रीभट्ट परशुराम चरित्रान्तर्गत
कुलवृत्त व जनुकथननामक
प्रथम भाग समाप्त.

---

## भाग २ रा.

[ पटवर्धनकृत युद्धें आणि त्यांत भाऊंचा संबंध. ]

( आर्या )

९३ इसवी सन सतराशें, साठीं अयुतार्ध घेउनी चमुला ।
माधव समरास निघे, तेव्हां साह्यार्थ भाउही गेला ॥ १ ॥
९४ युक्ती करून त्यांनीं, देवगडाला निजाम यवनाच्या ।
ताब्यांत घेतलें तें, झाला प्रारंभ कीर्तिला साच्या ॥ २ ॥
९५ प्रत्येक लढाईला, या पुढच्या भाउभट्ट होता कीं ।
अरिचे वीर तयानें, नेले कित्येक शूर-वर नाकीं ॥ ३ ॥
९६ परि डफ आंग्लें सतरा एकुण ऐशी सनापुढें दिधली— ।
याची हकिकत त्यानें, गोष्ट खरी कां कळे न ही त्यजिली ॥ ४ ॥
९७ आंग्लेतिहासकारी, अपुल्या पक्षास नित्यशः विजय ।
होतो सर्वत्र असे, लीहुन भरलेत ग्रंथ ते स्वकिय ॥ ५ ॥

( स्रग्धरा )

९८ युद्धीं शौर्यीं जयाचें विमल चमकतें नाम हो माधवाचें ।
राज्याच्याही व्यवस्थे-मधिं कुशल असे विप्र; हें सर्व साचें ॥
तो पुत्राच्या परी त्या सकल जनतती नित्य मानी जयानें ।
ख्याती युद्धांत केली यवन-प दचके फार ज्याच्या भयानें ॥ ६ ॥

९९ त्या रावें सैन्यवृद्धी करुनि अरिवरी जाउनी त्यास काटा ।
ऐसी आज्ञा करूनी मिरजगड दिला सर्व विप्रांस मोठा ॥
सत्राशें एकसष्टीं दुसरि हि दिधलीं कांहीं ठाणीं जयांत ।
होती हो सोय नामी बहु मिळत असे विप्रवर्या जकात॥ ७ ॥

( भुजंगप्रयात )

१०० पुढें चार वर्षें निघूनीच जातां ।
तयां आठ हाजार स्वारास जादा– ॥
दिलें ठेवण्याला नृपानें महीला ।
चतुर्थांश कोटी असे प्राप्ति जीला ॥ ८ ॥

( आर्या )

१०१ चोविसशें स्वार स्वतां, भाऊ घेती हुषार ठेवून ।
बाकी विभागुनी तैं, इतरांना टाकिती हि वाटून ॥ ९ ॥
१०२ श्रीमंताझेवरुनी, केली ही वाटणी नरोत्तंसें ।
प्रांतहि दिधले त्यानें, वांटुन सर्वांस युक्तिनेंच तसें ॥ १० ॥
१०३ हे गांव सलग नसती, पंढरपुरच्याहि उत्तरे कितिक ।
कित्येक तुंगभद्रा-तीरीं वसलेत चांगले सुपिक ॥ ११ ॥
१०४ यासर्व भू-प्रदेशीं, मिरजे भोंतालिचा सुपीक असे ।
वास्तव्य ह्मणुनि त्यांचें, त्याच विभागांत नित्य होत असे ॥ १२
१०५ या शूर विप्रवर्या, हेच दिले प्रांत कां नृपें ऐसी ।
शंका मनांत येते, करिन समाधान ह्याच चित्तासी ॥ १३ ॥
१०६ ह्मैसूराचा राजा, हैदर स्वामीस जिंकुनी अपुल्या ।
राजा बनला होता, त्यानें धांदलि बहूत चालविल्या ॥ १४ ॥
१०७ तच्चमु मोठी होती, सन्निधचा प्रांत तो करी ध्वस्त ।
संस्थानिक जिंकुनिया, झाला होता बहुत मदमस्त ॥ १५ ॥
१०८ प्रांतामागुन प्रांता, उतरूं तो लागला घशामध्यें ।
ऐसा क्रम चालुं असे, तन्नाशालागिं गुंतले योद्धे ॥ १६ ॥

---

१ पटवर्धनास.

१०९ करवीराचा राजा, होता वंशज शिवाजि-राजाचा ।
जो गाई द्विज पाळी, होता म्लेच्छांस धाक बहु ज्याचा ॥ १७ ॥
११० कोल्हापुर-नृप तेव्हां, मानित नव्हता ह्मणे द्विजा वाका ।
अरिस असे सामिल तो, द्वेष करी पेशव्यासवें बाका ॥ १८ ॥
१११ ह्मैसुरपालास तसें, करविरपाळास गप्प बसवाया ।
पटवर्धनास दिधल्या, जागा मिरजेसमीप बहु बऱ्या ॥ १९ ॥

## ( शार्दूल विक्रीडित )

११२ बाहूंचा मद ज्यास वाटत असे त्या हैदराचा गळा ।
दाबायास समर्थ आणि शमण्या कंडू नृपाचा भला— ॥
आहे योग्य द्विजातिमंडलचि हें आणूनि चित्तीं नवा ।
पूर्वींच्याजवळीच प्रांत बरवा देई तया पेशवा ॥ २० ॥
११३ आज्ञापत्र धन्याकडून मिळतां जाती लढाईप्रती ।
योद्धे सर्व मिळून झुंजति अती शत्रूप्रती जिंकिती ॥
भारी मर्दुमकीस दाविति धन्या सत्संघ हा चांगला ।
यांच्या एकिस पाहुनी द्विजनृपा आनंद वाटे भला ॥ २१ ॥
११४ पूर्वींचा नृप ह्मैसुरांतुन दिला हाकूनिया हैदरें ।
बैसे गादि बळाउनीच सगळे भीती जयाच्या दरें ॥
पाळेगार जनीं जुलूम करुनी खंडास घेई अती ।
संस्थानें करि गट्ट चट्ट सगळीं राजे जया कांपती ॥ २२ ॥
११५ गांवाला लुटुनी वरी मग करी वर्षाव तो अग्निचा ।
त्राहि त्राहि करी जयाप्रति गमे तो गर्व हो बाहुचा ॥
वाटे काळ जनांस म्लेच्छ-नृपती संतुष्ट कोणी नसे ।
घेई बेदनुरास मावनुरही ध्यायाप्रती येतसे ॥ २३ ॥
११६ हें ऐकून मनीं चपापुन तदा तेथील राजा अती ।
चिंताक्रान्त वदे ह्मणीं मदत मी मागूंच कोणाप्रती ।
तेव्हां त्या सुचला विवेक बरवा साह्याप्रती पेशवा ।
आहे शूर समर्थ त्यास मदती-साठीं ह्मणे बोलवा ॥ २४ ॥

( शार्दूलविक्रीडित )

११७ लीही पत्र तया ' द्विजाति-वर हो आह्मांस साह्यास या, ।
आहों नम्र तुह्मांस, संकट दुरी न्या हें, करा ही दया ।
लज्जा-रक्षण आपणाविन विभो होणार नाहीं कुणा ।
धांवा हो नृपते मला मदतिला यावें क्षणीं रक्षणा, ॥ २५
११८ चित्ताकर्षक पत्र पाहुन मनीं तो सार्द्र हो माधव ।
जो वाटे सकलास धर्म नष ये भू उद्धरायास्तव ॥
आज्ञा सत्वरिं तो करी ' त्वरित जा त्या हैदराच्या-वरी ।
रास्ते सैनिक सर्व वीर इथले न्या साह्यही संगरीं, ॥ २६
११९ आज्ञापत्र तसेंच धाडि मिरजे-लागीं तदा सन्मती ।
तें पाहून रणास तेहि निघती घेऊन सैन्याप्रती ॥
ते चाळीस हजार सैन्य बरवें घेऊनि संगें क्षणीं ।
कर्णाटांत समस्तही उतरले तंबूप्रती ठोकुनी ॥ २७ ॥
१२० अह्मीची रग सर्व आजि जिरवूं कडू भुजांचा हरूं ।
मारूं आपण सर्व दुष्ट यवनां मित्राप्रती उद्धरूं ॥
ऐसा बेत करीत सर्व असतां रास्ते तयांना मिळे ।
तों श्रीमंतहि सैन्य फार समरा घेऊन आले भले ॥ २८

( शार्दूल विक्रीडित )

१२१ म्लेच्छांचा अपमान माधव कसा साहील सांगा बरें ।
ज्याचें मानच मुख्य द्रव्य बरवें तो झुंजण्या ये त्वरें ॥
गंगोबा सचिवें शिशुस्त्विहि नृपा टोंचुनिया बोलतां ।
तत्पृष्ठावरि मारिल्या बहु छड्या ज्याची कृती तत्वतां ॥ २९ ।

( आर्या ) युग्म ·

१२२ एके दिनीं दिनकरें, माधवसुत जोशि जो असे त्यानें ।
पंक्तींत जेवतांना, अपशद्बाचा प्रयोग केल्यानें— ॥ ३० ॥
१२३ माधवरावें त्याची, बत्तिसि स्वकरें त्वरेंच रंगविली ।
इभ्रत ज्याची मोठी, रग त्याचीही क्षणामधीं जिरली ॥ ३१ ।

१२४ बापू बोकील खरा, मार्मिक तैसा प्रसिद्ध विद्वान ।
माधव बुद्धिबळीं खुण, ओळखुनी वाकवीहि तन्मान ॥ ३२ ॥

( शार्दूल विक्रीडित )

१२५ तो हा माधव सैन्य घेउन बहू त्या हैदराच्या-वरी ।
दादा आणिक यामधील कलहा-साठीं न ये सत्वरीं ॥
भाऊ तोंवरि धावले अरिवरी गोपाळरावासह ।
शत्रूचा सरदार यावरि क्षणीं धांवे स्वसेनेसह ॥ ३३ ॥

( आर्या )

१२६ श्रीमंताची सेना, येउन मिळली नसे ह्मणूनी ते ।
'घेनों मायारि' असें, खानाला दाखवीत तें होते ॥ ३४ ॥
१२७ येतां कुमक तयांना, खानावरि धावले सपाल्यानें ।
तच्चमुची कतलही, भारी केली रणांत खड्गानें ॥ ३५ ॥
१२८ 'या अल्ला या अल्ला, तोबा तोबा' ह्मणून पळती ते ।
पाहुनि भाउकृतीला, श्रीमंतादीक तोषले होते ॥ ३६ ॥
१२९ पटवर्धनादिवीरां, सकलां कळलें सुदुष्ट हैदर हा ।
हानगलीं बहु चमुला, घेउनि युद्धार्थ राहिला पाहा ॥ ३७ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१३० हे तीरापरि धावले अरिवरी अल्लीहि तुंगेप्रती ।
ओलांडून हरी-हराजवळ ये, खोटा महा दुर्मती ॥
भाऊ ये आपणावरी श्रवुनि हें तो खान तैं भीउनी ।
रट्टेबाळिहुनी अनूरनगरीं राहे क्षणीं जाउनी ॥ ३८ ॥

( आर्या )

१३१ श्रीमंताची सेना, सोंडुर एथे असून अंतर तें ।
अल्लीपासून मधें, आठ खरीं योजनें तदा होतें ॥ ३९ ॥

( आर्या )

१३२ नंतर माधव-पृतना, सावनुरापाशि येउनी ठेपे ।
वर्धेवरि तळ दिधला, शिबिरें स्थापूनि माधवें सुनृपें ॥ ४० ॥

( स्रग्धरा )

१३३ अल्लीचे लोक भारी छळितिच करुणा दूर सारोनि लोकां ।
तेव्हां दुःखें नबाबें सचिव अरिकडे बोलण्यालागिं बाका— ।
सल्लयाला पाठवावा ह्मणुन ठरविलें बेतही तें द्विजानें ।
वार्ता ही लागताची परत फिरविलें तत्प्रधाना त्वरेनें ॥ ४१ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१३४ म्लेंच्छाच्या अधिपास ताकिद दिली तैं सक्त त्या भाऊनें ।
"तुह्मी घ्या सचिवास बोलवुनिया खंडा न द्यावी धनें" ॥
"भारी त्रास जनास आजवरि त्या आहे दिला हैदरें" ॥
"त्याची खोडच मोडितों यवनपा जिंकीन त्याला त्वरें"॥ ४२ ॥

१३५ 'तुह्मी हें ह्मणणें न मान्य करितां सल्ला अरीच्या-मवें ।
आतां हो जर कां कराल तर या राज्यास घेऊं जवें ॥
दोघांचाहि करूं पराभव रणीं वाटेल तैसें करा' ॥
ही तंबी मिळतां नबाब 'पदरीं घ्यावें' वदे 'किंकरा' ॥ ४३ ॥

( शिखरिणी )

१३६ मराठ्यांची सेना तसि परशुरामाचिहि चमू ।
अरिच्या पूराच्या निकट सगळी लागलि जमूं ॥
ह्मणूनी अल्लीचें दणदणुन धाबें अपकृती ।
करीना कोणाशीं द्विजपतिशिं किंवा कु-नृपती ॥ ४४ ॥

( स्रग्धरा )

१३७ भाऊ गोपाळ-संगें अरि-महि-वरच्या चिक्कबाळापुराला ।
तैसा तो नंद किल्ला करगत करुनी दोड्डबाळापुराला— ॥
घेऊनी चन्नराया गड मग निघती घ्यावया कैबराळा ॥
चंद्रोजी, बाळबाही असति समजलें त्यास तें येकुरीला ॥ ४५ ॥

( स्रग्धरा )

१३८ दोघांना गांठुनीया त्वरित हटविलें भाउनें अन्ययुद्धीं ।
भाऊनें त्या हयाला सहज पकडिलें थोर केली सुबुद्धी ॥
त्यांना भाऊ स्वतांच्या चमुसह फिरवी यापरी अल्लि-वीरा ।
भाऊंनीं जिंकुनीया जर जर करितां फार बैसे दरारा ॥ ४६ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१३९ तेव्हां हैदर सावनूर-निकटीं येऊनिया राहिला ।
तेथें माधवरावजी द्विजपती गांठी तया अल्लिला ॥
गोपाळासह भाउ यास लिहिलें "यावें" तदा धांवुनी ।
आले. स्वामित्वचा कुलीन जपती हें खास जाणा मनीं ॥ ४७ ॥

( स्रग्धरा )

१४० अल्ली झुंजारयोद्धा असुनि चमु अती त्याजपाशीं तसी ती ।
पादाती शूर मोठे हयग मिळुनिया साठ हाजार होती ॥
आतांपर्यंत त्यानें द्विजसह समरा येउनीया समोर ।
नाहीं केलें परंतू यवनप अधुना झुंजण्या येइ शूर ॥ ४८ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१४१ झालें युद्ध सुरू दणाणुन दिशा दाहीहि गेल्या तदा ।
गोळ्यांनीं धुळिनें भरून सगळ्या धूम्रेंहि जाती यदा ॥
शत्रू मित्र कळावयास वदती हर्हर असे ब्राह्मण ।
अल्ली गाजवि दीन दीन अपुला लागे घुमूं तें रण ॥ ४९ ॥

१४२ तेव्हां माधव-पेशवा-नरपती बैसूनि अश्वावरी ।
हातीं घेउनिया असीस चमके विद्युल्लतेच्या परी ॥
देई धीर चमूस फार अपुल्या बोले "तुम्ही शत्रुला ।
जिंका त्यास जवें प्रभूस नमवा पावाल हो कीर्तिला" ॥ ५० ॥

१४३ होता हैदरही करीत चमुला द्यायास धीरा तसें ।
भाऊ आणिक अन्य वीर सगळे हत्तींवरी सिंहसे— ॥

शत्रूच्यावरि तें तुटून पडती गोपाळ बोले तदा ।
" कापा शत्रुशिरास आणि मिळवा कीर्ती दुजी संपदा " ॥ ९१ ॥

( स्रग्धरा )

१४४ भाऊ वाघाप्रमाणें चमुमधिं घुसुनी मस्तकें फार कापी ।
खड्गानें आपुल्या; तें रुधिर जमुनिया जाहल्या थोर वापी ॥
याच्या कौशल्ययोगें चकित अरि बहू जाहला माधवानें ।
"भाऊ शाबास खासी" बहुत ह्मणुनिया वानिले हो मुखानें ॥९२॥

( शार्दूलविक्रीडित )

१४५ अल्लीच्या चमुनें पराक्रम बहू केला परी यां-पुढें ।
कांहीं चालत नाहिं हें बघुनिया अल्लीस कोडें पडे ॥
आले रंजिस सर्व वीर अरिचे सल्ला कराया-स्तव ।
झाला सिद्ध अरी; तहास करवी काकांमुखें[1] माधव ॥ ९३ ॥

१४६ काकाचें अपुलें समेट बरवें व्हावें ह्मणूनी तहा ।
काकांच्या कडुनींच माधव करी मोठेपणा हा पहा ॥
रावाला अगदींच गर्व नसुनी जाणें प्रसंगा त्वरें ।
होते सद्गुण माधवा परि डको[2] ना वाटलें हें बरें ॥ ९४ ॥

१४७ ऐका तो तह सांगतों " यवनपें बत्तीस लक्षाप्रती ।
देऊनी रुपयां मुलूख जिनले द्यावेनही संप्रती- ॥
ज्याचे त्यास तसेंच सावनुरच्या राजाकडूनी करा ।
घेऊं खास नयेच " मान्य करुनीं अल्ली निघाला घरा ॥ ९५ ॥

---

१ राघोबा दादा कडून. २ मॅट डफ साहेबास.

हैदरपराभव नामक द्वितीय भाग
समाप्त.

## भाग ३ रा.

[ हैंदराऽभ्यवस्कंदन ]

( शार्दूलविक्रीडित )

१४८ होता माधव शूर दूरवरही दृष्टी तयाला असे ।
होता तो गुणजाणता ऋतवचा[1] शूरास जाणीतसे ॥
यायोगेंच महादजी चमकला भाऊ तिजे गोखले ।
याचें राज्य जनास वाटत असे तें सौख्यदायी भलें ॥ १ ॥

१४९ रास्ते साळवि शूर वीर शिरके काळे तसें भोसले ।
ते वाडीकर देशमूख फडके योद्धा तुका चौगुले ॥
आणूनी उदयास या सकलिकां पावे स्वतां उन्नती ।
ऐसा माधव राजकारणपटू कीर्तीस लाभे अती ॥ २ ॥

१५० ज्यानें राज्य कमाविलें नमविलें गर्विष्ठ म्लेंच्छांमती ।
गाई देव द्विजातिसंघ सगळे सांभाळि तो सन्मती ॥
होता तो गुणजाणता नरपती बाळाजिचा सत्सुत ।
आले यद्विषयीं[2] बहूत उदया योद्धे तसे पंडित ॥ ३ ॥

१५१ बाजी आणि चिमाजि ( पाजि रघुच्या वाचून ) सारे खरे ।
शूरांचे गुण जाणती सकलही ते पेशवे सत्वरें ॥
बाजी शेवटचा पित्यापरि असे बुद्धी जयाला नसे ।
तो खादाड तसा विलासि असुनी डोकें कमी त्या असे ॥ ४ ॥

१५२ राज्या खाउनि बैसला निपजला विभ्रांत हा कोळसा ।
याचे पूर्वज शूर वीर असतां बारास भीई पिसा ।

---

१ खरें बोलणारा. २ ज्याच्या राज्यांत.

याभीतीं अवळासमूह जमुनी लीला सदां चालती ।
राज्याला गमवी समस्त अपुल्या दुष्टाऽग्रणी दुर्मती ॥ ५ ॥

१५३ बाजीरावरघूपती, नृपतिच्या मागील काळाप्रती ।
"हिंदू-पौरुष पर्व-काळ" म्हणणें हें योग्य आहे अती ॥
भाऊंनीं तरवार फार समरीं तैशीच तद्बंधुनीं ।
अळीशीं लढतांहि गाजविलि तैं तोषेच तो[1] पाहुनी ॥ ६ ॥

१५४ राजा माधव भाउला सुखविण्या देई प्रदेशाप्रती ।
सेनाखर्च तसेंच दुंदुभिसही तैनातिला संप्रती ॥
भाऊ बंधुसवें प्रमोद बहु तैं पावे तसा मानही ।
प्रांताला मिळवी सुकीर्तिस वरी भाऊ बहू आग्रही ॥ ७ ॥

१५५ जानोजीनृप नागपूर-इथला होता अती मत्सरी ।
त्याला ही द्विजगोन्नती न बघवे तो द्वेष याचा करी ॥
ज्ञाता माधवराज शूर-वर जो त्याचा सदा मानसीं ।
व्हावा ऱ्हास असेंच इच्छित असे जानोजि तो तामसी ॥ ८

१५६ वाटे त्यास सदा "करूनि समरा विप्रा रसेच्या तळा ।
घालूं" बेत करून चालहि करी विप्रावरि निर्मळा ॥
एवोनी नृप-धा[2]निसन्निध नृपें बंडाळिही मांडिली ।
कोणाला लुटिलें कुणा पकडिलें गांवें बहू जाळिलीं ॥ ९ ॥

१५७ आला क्रोध दयाळु माधव नृपा तेंव्हां कृतघ्नाप्रती ।
प्रायश्चित्त पुरें दिलें झडकरीं तें पाहिजे संप्रती ॥
ऐसा पोक्त विचार चित्ति करुनी भाऊस आज्ञापिलें ।
सेना तीस हजार घ्या अरिस हो ह्या पाहिजे जिंकिलें ॥१०

१ माधवराव. २ राजधानी-पुण्या-जवळ.

( स्रग्धरा )

१५८ "शत्रूला आज जाळूं अरिबळ सगळें जिंकुनी स्वर्गि धाडूं ।
जानोजी-मस्तकीं वा खरतर असिलें पांच पाटास काढूं ॥
खंदे घोडे तयाचे सकल करि करूं आज पाडाव खासे" ।
रावापाशीं वदूनी मग निघति क्षणीं भाउ तेव्हांच तैसे ॥११॥

१५९ भाऊ, गोपाळ, बंधू इतरहि निघती युद्ध द्याया अरीशीं ।
तेव्हां त्यांना मिळाला यवन-सचिवेंही चांगला शौर्यराशी ॥
एका युद्धीं निजामा-प्रतिच फसविलें जानजीनें ह्मणूनी ।
त्याचा आमात्य आला मदत, अरिवरी चालले ते मिळोनी ॥१२॥

( शार्दूल विक्रीडित )

१६० येती वीर अपार आज समरा द्यायास ऐकूनि घे ।
चित्तीं धाक बहून आणि मग तो राजा पळाया बघे ॥
धावे नागपुराकडे जलदिनें मागेंच हे लागले ।
जानोजी जय आणि भीष्म गमले ते विप्र तेव्हां भले ॥ १३ ॥

( स्रग्धरा )

१६१ चांदा जानोजिचा तो गड झडकरिं तैं तोफ-योगें द्विजांनीं ।
घेऊनी जानजीला त्वरित भटवरीं गांठिलें त्यास रानीं ॥
खायालाही न त्याला समय मुळि दिला धावरे तो नृपाळ ।
"दे मातें ठाय पृथ्वी" मनिं वदत असे दुष्ट तो हिंस्र काळ ॥१४॥

( शार्दूलविक्रीडित )

१६२ त्याचें सैन्य पळे, तदां चहुंकडे भांबावुनी बापुडें ।
चीं चीं चीं करुनी करीहि पळती वेगें गिरीच्या-कडे ॥
घोडे पाय तुटूनि राशि पडले भारी शिपाई तसे ॥
भाजीच्या परि कापिले चरचरां त्यांचा ढिगारा दिसे ॥१५ ॥

१ हत्ती. २ निजामाचा दिवाण.

( शार्दूलविक्रीडित )

१६३ ऐसा भाग समस्त चंद्रपुरचा उध्वस्त झाला अती ।
वाटे भेसुर तो जनास, नृपती रंजीस ये संप्रती ॥
शत्रूची अपुली न शक्ति बघतां शत्रूवरी धांवला ।
त्याचें हें फळ पावला नरपती खासाच पस्तावला ॥ १६ ॥

( आर्या. )

१६४ "हांसत कर्म करावें, भोगावें रडत तेंच परिणामीं" ।
पंतांनीं ह्मटलेलें, अनुभूतीलागि ये नृपा नामी ॥ १७ ॥

( मालिनी. )

१६५ सकल चमु निमाली नाश अश्वादिकांचा ।
बहुत बहुत झाला पाहुनी होय काचा ।
अरि नच त्यजि पिच्छा पाहुनी जानजीनें ।
अबलख हय वेगें सोडिला त्या नृपानें ॥ १८ ॥

( स्रग्धरा )

१६६ गोदातीरीं नृपानें हय झडकरि तो सोडिलेला बघून ।
पृष्ठीं गोपाळ धांवे द्विज यवन तसे सर्व मार्गे त्यजून ॥
जानोजी धांवतांना शशकपरि पुढें वाचवायास प्राणा ।
मार्गे गोपाळ सिंहा परि तइं दिसला गांठतां जानजींना ॥१९॥

( शार्दूलविक्रीडित )

१६७ देखावा बघण्यास विप्र-पृतना राहे उभी स्तब्धशी ।
चित्राच्यापरि ती गमे सकलिकां आश्चर्य वाटे तिशीं ॥
औत्सुक्या द्विजशूर-वीर मणिच्या पाहूनिया तन्मनीं ।
हें भीष्मार्जुनयुद्ध शुद्ध गमुनी संतोष झाला क्षणीं ॥ २० ॥

( आर्या )

१६८ "शांत नव सिंह गमला, पळतां नररथहि तो पळ ससाच" ॥
भासे प्रकार तसला, विप्रचमूला जनासही तोच ॥ २१ ॥

( शिखरिणी )

१६९ यदा त्याला विप्रें जर जर करूनी दमविला ।
तदा आला यांना शरण नृपती दीन दुबळा ॥
ह्मणे आतां सल्ला त्वरितचि कराहो द्विजवरा
धन्याच्या आज्ञेनें तह करि तदा रावहि बरा ॥ २२ ॥

(कलमांक.) ( स्रग्धरा )

१७० १ लक्षांचा आठ होता मुलुख अरिकडे घेतला पेशव्यानें ।
२ जप्तीचें द्रव्य घ्यावें वसुल करुनिया भोसल्याचें द्विजानें ॥
३ दर्बारांतून यांच्या रुसुन जर कधीं पातला कोणि त्याला ।
थारा देऊं नयेची तृतिय कलम हें लाविलें त्या तहाला २३

( शार्दूलविक्रीडित )

१७१ ४ दिल्लीचा पति आणि रोहिलपती तैसा अयोध्यापती ।
किंवा दक्षिणचेहि म्लेंच्छनृपती यांच्यासवें संप्रती ॥
पत्रांचा व्यवहार बंद करणें आणीक आंग्लासवें ।
राजा ऐकुनि या अटींस थिजला गाळीतसे आंसवें ॥२४॥

( आर्या )

१७२ ५ प्रतिपंचम वर्षाला, द्यावा करभार पांच लक्ष धन ।
एकोत्तर या द्विजपा, मान्य करी हें नृपाल बहु खिन्न २५

( शार्दूल विक्रीडित )

१७३ जानोजी मुख कृष्ण तें करुनिया जाई स्वताच्या पुरा ।
भाऊ होउनिया जयी परतला येई धन्याच्या घरा ॥
ऐसा गर्व हरून नागपुरच्या राजाप्रती दीनता ।
आणोनी बहु मोद मानिती मनीं मद्विप्र ते तत्वतां ॥ २६ ॥

---

१ अक्कलकोटच्या फत्तेसिंग भोसल्याचें. २ एकानें जास्त असे पाच लक्ष ह्मणजे सहा लक्ष.

( स्रग्धरा )

१७४ भारी मानी; इमानी नच यवन मुळीं आत्मराजावरीहीं[1]।
राज्याच्या प्राप्तिसाठीं उठुन मिळवि तें राज्य; ज्या लाज नाहीं॥
होता तो शूर भारी परि वचन नसे सत्य ज्या हैदराचें ।
तो युद्धा सिद्ध झाला सकल तह क्षणीं मोडुनी या द्विजाचे ॥२७॥

( शिखरिणी )

१७५ पुन्हां राज्यामध्यें जुलुम करि भारी यवन हा ।
द्विजाच्या प्रांताला परत मिळवाया त्यजि तहा ॥
करी अल्ली हल्ले द्विजपति-सहायां-वरि सदा ।
छळी जिंकी प्रांता कहर उसळी आणि विपदा ॥ २८ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१७६ पूर्वी सावनुरावरीं जलदिनें हल्ला करी दुष्ट हा ।
झाला साह्य तया द्विजाति-नृपती त्याशीं करी हा तहा ॥
यासाठींच सदा द्विजाति विषयीं अल्ली मनीं जळफळे ।
केव्हां मी उसनें समग्र अरिचें फेडीन त्या वाटलें ॥ २९

१७७ जेव्हां हैदररूपि वाघ गिरव्या घालूं बहू लागला ।
वेगें सावनुरासभोंवतिं पुन: राजा तदा त्रासला ॥
फौजा हैदर लागला जमवुंही आक्रांत केला अती ।
तच्छत्रू मरती कितीक रडती साह्या किती मागती ॥ ३०

१७८ सेनासागर घेउनी अमित तो घाटावरी जैं चढे ।
तत्क्रोधाग्निमधीं बळी प्रथमतां तो प्रांत मोठा पडे ॥
तत्सेनापतिचा उपाय हरला होता रणीं शूरही ।
या दुष्टें करुनी पराभव पुरा हो घेतली तन्मही ॥ ३१ ॥

---

१ मांडलिक. २ मददगार.

१७९ अलीनेंच मुरारराविं करुनी हल्ला तयाला दिला ।
भारी त्रास परी प्रचंड रणिं तो योद्धा लढूं लागला ॥
तेव्हां अलिशिं तो मुरारि लढला मासत्रयाहूनही ।
जास्ती; गुत्तिवरी सुवीर चढला सांभाळुनी तन्मही ॥ १२ ॥

१८० अलीचा पडला सभोंवतिं तदा वेढा चमूचा भला ।
गल्ला सर्व वरील संपुन पुढें खल्लास ही जाहला ।
हल्ला हैदरअलिचा परि यदा झाला न त्या सह्य जी ।
किल्ला अलिकरीं प्रवीर निघडा देई तदा रावजी ॥ १३ ॥

१८१ गुत्तीच्याहि गडास म्लेंच्छपतिनें ताब्यामधें घेतलें ।
वार्ता माधवभूपतीस कळतां रास्त्यास आज्ञापिलें ॥
'जावें त्रिंबक-विश्वनाथ-सह तूं त्या हैदराच्या वरीं' ।
भूपाला नमुनी तदा निघति ते अलीवरी सत्वरीं ॥ १४ ॥

१८२ या स्वारींत महाय नागपुरपा येण्यास आज्ञापिलें ।
होतें त्यापरि सैन्य सिद्ध करुनी येण्यास ते लागले ॥
सोडोनी स्वपुरास झडिति पुढें देवाजिला जानजी ।
येवोनी नृपतीस वार्दि दिधली 'राजे निघालेत जी' ॥ १५ ॥

१८३ 'आले ग्राम त्यजून दोन बरवे मुक्काम राजे भले' ।
बापू यासमयीं रघूसह नृपें कारागृहीं घातले—॥
होते त्यास सुमंत देवाजि तदा भेटावया माधवा ।
आज्ञा मागुनि जाइ आणि मग तो भेटे तया तेधवा ॥ १६ ॥

१८४ होते बापु तदा खुशाल बसले लोडाप्रती टेंकुनी ।
होता डावहि चालु बुद्धिबळचा तेथेंच हे जाउनी— ॥
बापूतें नमुनी पहात बसले प्रश्नोत्तरें देउनी ।
होता माधवरावचा मनुज या-साठीं न बोले कुणी ॥ १७ ॥

---

१ मुरारराव. २ आनंदरावास ३ माधवरावास. ४ जानोजीराव भोसले.

१८५ बापू डाव कथी तदा 'नरपती मागेंच न्यावा बरें ।
आतां दोन घरें, तुझ्या नृपतिचे प्यादें पुढें ये त्वरें.' ॥
देवाजीहि निरोप घेउन निघे तंबूस ये सन्मती ।
तेव्हां माधवराव तैं पुसतसे त्या कारकूनाप्रती ॥ ३८ ॥

१८६ 'कैसें काय घडे तिथें सकल तें सांगे मला चांगलें' ।
'कांहीं नाहीं विशेष राव घडलें' ऐसेंच ते बोलले ॥
'बापू स्वस्थ बसून सांगत तदा डावाप्रती सन्मती' ।
'तुझीं दोन घरें नृपा परतुनी न्यावेंच हा संप्रती' ॥ ३९ ॥

१८७ घेई वाक्य टिपून माधव सही·सुद्धां तयापासुनी ।
आज्ञा त्या घरिं जावयास दिधली त्या माधवें तत्क्षणीं ॥
आली नागपुराहुनी नृपतिला जैं डाक तेव्हां कळे ।
'राजे दोन मुकाम जाउन पुनः स्वस्थानिं आले भले' ॥ ४० ॥

१८८ देवाजीस क्षणींच माधवनृपें बोलावुनी आणिलें ।
'आला कां न नृपाळ' त्यास पुसिलें देवाजि तैं बोलले ॥
'ते येतील विभो त्वरें' श्रवुनि हे तो लाल झाला तदा ।
एके हातिं शिळा धरून वदला 'नाशीन मी त्वन्मदा' ॥ ४१ ॥

१८९ 'सांगे सत्य मला तसें न घडतां मी ठार मारीन रे ।
तूं आहेस जरी द्विजाति तरिही, हें कृत्य तूं सत्वरें ॥
बापूच्या कथनापरी घडविलें' ऐकून हो स्तब्ध तो ।
केलें सर्व कबूल आणि वदला 'राजास मी आणितों' ॥ ४२ ॥

१९० होता माधव धूर्त तो किति पहा तैसा अती तापट ।
त्याचें अन्तर वेष्टुनीच बसला सद्बुद्धिचा सत्पट ॥
काकाच्यावरि लोभ फार करितो बापू ह्मणूनी जया ।
कैदी माधव तो करी जरि तरी मानीत होता तया ॥ ४३ ॥

१९१ बापूची मति आणि धैर्य सगळें त्या माधवा माहित ।
राज्याचा भर वाहुनी प्रतिनिशीं बापूकडे ये हित— ॥
बापूला नृपती पुसे अहितही सल्लाहि देई बरा ।
दोघेही समबुद्धि ते न करिती केव्हांच हो मत्सरा ॥ ४४ ॥

( स्रग्धरा )

१९२ भाऊ गोपाळ योद्धा इतर सहजही सर्व घेऊन संगें ।
स्वांगें युद्धा निघाला बहु चमु पथकें संगतीं शूर तो घे ॥
भाऊचें वृत्त आहे सुरस बहुत हें मुख्यतः वीर यांत ।
प्राधान्यानें चरित्रीं रस वसत असे स्फूर्ति येवो मनांत ॥४५॥

१९३ रामाची लक्ष्मणाची दशरथ-सुत त्या; अर्जुनाची तशीच ।
भीमाची या चरित्रीं स्मृति सहज मना, वाचतां होइ साच ॥
भाऊ गोपाळ यांना जनन जननि दे खड्ग तें गाजवाया ।
जिंकूनी शूर शत्रू समर-महिवरी लावण्याला नमाया ॥ ४६ ॥

१९४ भावा भावांत ईर्ष्या समरिं अधिकता शत्रुला जिंकितांना ।
कोणाला लाभतें हें यश ह्मणुनि सदा फार वाटे तयांना ॥
स्पर्धा भारी असे कीं तरी कृत ममता. प्रेम त्यांच्यांत होतें ।
रामाचे लक्ष्मणाचे बहु सुगुण कि हो तत्स्वभावांत होते ॥४७॥

(शार्दूलविक्रीडित)

१९५ योद्धा हामिलकार आणि मुलगा तो हानिबूल चांगला ।
हे विप्रद्वय त्यापरीच असुनी लाभे यशा सोज्वला ॥
खावी भाकर चाकरी करुनिया स्वामीप्रती मोदही ।
त्यांना हेंच मनीं सदा वसतसे आक्रान्त केली मही ॥ ४८ ॥

१९६ आज्ञा स्वामिकडून त्यांस मिळतां कांकूं करावी असें ।
त्यांना माहित हें मुळींच नसुनी औत्सुक्य चित्तीं वसे ॥
या ऐहीक सुखास ते न भुलले तैसें सु-संपत्तिला ।
स्वामीच्यास्तव जिवास जीव अगदीं देणें कळे त्यांजला ॥ ४९ ॥

---

१ बंधू.

१९७ स्पार्टांच्या जननीपरी असि तदा शत्रूवरी फेंकण्या ।
यांना बाळकडू सदा मिळतसे जाती अरी जिंकण्या ॥
यांच्या ही जननी मुला शिकविती युद्धांत वाचा मर ।
किंवा मार अरीस किन्तु समरा सोडूं नको सत्वर ॥ ९० ॥

[१९८ ह्रिय्या आणिक धैर्यही किती असे नारीजनीं तें पहा ।
भाऊच्या परि गोखलेहि असती बापू तदा शत्रु-हा[1] ॥
बापूचा चुलता पराक्रमि असे धोंडू हि आख्या ज्या ।
धोंडीवाघ धरावया नृपतिनें[2] आज्ञापिलें हो तया ॥ ९१ ॥

( आर्या )

१९९ धोंडी वाघाला ज्या, जर्जर करि फार फार धोंडोबा ।
त्या धोंडी वाघानें, पण केला क्रूर एक तेव्हां बा ॥ ९२ ॥

( स्रग्धरा )

२०० "नांवाचा वाघ आहे जर तर समरीं मारितों धोंडिबाला ।
नर्डाचा घोट घेतों रुधिर पिउन मी रंगवीतों मिशांला" ॥
ऐशी त्या क्रोधयुक्तें अखिल-खल-वधें क्रूर केली प्रतिज्ञा ।
सिद्धीला न्यावयाला मदत नशिबही[3] ... य वाघास अज्ञा ॥९३॥

( शार्दूलविक्रीडित )

२०१ कांहींसे दिन लोटल्यावर पुढें धोंडीसवें धोंडिबा ।
यांचें युद्ध सुरूच होउन तदा धोंडी व्रणी होइ बा ॥
तों दुर्दैव मधीं फिरून पडलें त्या गोखल्यांच्या-वर ।
तद्दक्षास अचात जात असतां झाला तरूचा खरें ॥ ९४ ॥

( स्रग्धरा )

२०२ झाडाची एक खांदी उरिच थडकतां धोंडिबा विप्र खालीं ।
येवोनी भूवरी तो तळमळत पडे शुद्धि त्याची निमाली ॥
संधी पाहूनि धोंडी पळत पळत ये बैसुनी वक्ष-देशीं ।
खड्गानें मान कापीं रुधिर पिइ मिशी रंगवी जाइ देशीं[4] ॥९५॥

१ शत्रूचें हनन करणारा. २ बाजीराव पेशव्यानें. ३ वाघाचें विशेषण. ४ झाडा.

( शार्दूलविक्रीडित )

२०३ बापू आणि पवार हे चमुपती वाघासवें झुंजतां ।
लाभेना यश त्या ह्मणून दडणें तें भाग हो तत्वतां ॥
काकाचें शव अग्नि देउन तिथें जाळूनिया टाकिलें ।
बापू औत्तर तत्क्रियाहि करण्या लागीं पुण्या पातले ॥ ९६ ॥

( स्रग्धरा )

२०४ भर्त्याची मृत्यु-वार्ता श्रवणकरि वदे लक्ष्मि त्या गोखल्याला ।
'बापू धिक्कार आहे पुरुष-वर तुला आणि युष्मत्कृतीला' ॥
'तोंडानें कोणत्या तूं फिरुन निजपुरा पातला जा रणाला' ।
'यावेळीं मीं तुझारे क्रुत अगदिं करूं देत नाहीं क्रियेला' ॥९७॥

( शार्दूलविक्रीडित )

२०५ 'वाघाचें शिर कापुनी मजप्रती दावावया आणितां' ।
'तूंतें देइन मी मुला अनुमती त्यांच्या क्रिये तत्वतां' ॥
आज्ञा ऐकुनि तो[१] तसाच फिरला बापू तदा गोखला ।
वाटे बापुप्रती धरून[२] फिरुं मी मारूं तया वा खला ॥ ९८ ॥

२०६ बापू तो मनिं यापरी करुनिया तैं बेत हो चालला ।
वाघाच्यावरि सिंहसा अतिजवें तद्भागिं तो पातला ॥
झालें युद्ध सुरू तयास वधिलें तन्मुंड भाल्यावरीं ।
टोंचूनी चुलतीस येउन नमी केली क्रिया सत्वरीं ॥ ९९ ॥

२०७ आतांच्या जननी मुलास ह्मणती बाळ्या मला चांगला ।
शालू घेउन दे तसेच नगही सुग्रास व्हावा मला ॥
उंची वस्त्र मुलांस घेउन तुझ्या पत्नीस साडी नवी ।
आणी अत्तर बेलियाहि सु[३]ंचा श्रीमंतिला दाखवी ॥ १०० ॥

१ बापूला. २ बरोबर. ३ केंसास.

२०८ आज्ञा घेउन ते प्रवीर निघती रास्त्यादि गुद्दा तदा ।
आले त्रिंबक विश्वनाथ-सह ते मोंडूग्ला त्या पदां— ॥
सोडूनी शिवरुद्रच्यावरुनही त्या सावनूरास ते ।
येऊनी शिबिरें तिथेंच दिधली त्यांनीं तदा संमतें ॥ ६१ ॥

२०९ संगें पास्तिस हो सहस्त्र उमदे ते स्वार घेऊनिया ।
तेव्हां माधवराव शूर वळला त्या झैमुरीं जावया ॥
बाळापूर तमें तदा करविरा घेऊन नंदीप्रती ।
चन्नापट्टण घेतलें हिमतिनें सत्कीर्ति लाभे अती ॥ ६२ ॥

२१० मोठा हिम्मतदार माधव असे सेनापती हो जयां ।
त्या शूरां पदगांपुढें अरि कसा पावेल सांगा जया ॥
मोठा शूर खरा परंतु अरि तो यांच्या पुढें यावया ।
भीई आडुनि आडुनी रण करी हे मार देती तया ॥ ६३ ॥

२११ अह्मीचें दळ या इळास भिउनी धांवेच चोहींकडे ।
घोडे धावति स्वैर होऊनि जवें ते गुंडिती हो कडे ॥
यासाठीं अरिचा पडे तळ सदा तो [illegible] कोमांवरी ।
यांच्यापासुनि नित्य शूरहि अरी [illegible] तांत भीती वरी ॥ ६४

२१२ भाऊचीं पथकें तसीच पृतना त्या पेशव्याची गडां ।
शत्रूच्या सर फार हो करिति तें तो दीन हो बापुडा ॥
पंद्रा पौर्वत आणि भूमिगडही घेती त्वरेनें विस ।
ते पंचोत्तर, भाउ राव अरिला तैं आगिनी टेंकिस ॥ ६५

२१३ यांच्या शूर चमूपुढें न अपुलें कांहींहि कीं चालत ।
येईना यश आपणास गडही आहे अरी जिंकित ॥
अह्मी पाहुनि हें तदा करवदां चोळावया लागला ।
भारी धैर्य धरून भाउवरतीं वाघापरी धावला ॥ ६६ ॥

---

१ ठिकाणास. २ गड विशेष. ३ डोंगरावरील कोट. ४ भुईकोट.

२१४ " माझी कीर्ति हरावया गड तसे जिंकावया दुर्दशा—।
माझी फार करावया झटति हे जिंकीन मीही अशा—॥
वीरांना समरीं तरीच जगतीं ठेवीन मी नांव रे ।
ना नातां पण शेवटा बदलितों नांवाप्रती सत्वरें " ॥ ६७ ॥

## ( शिखरिणी )

२१५ प्रतिज्ञा तो क्रूरा करुन चमु सारीहि जमवी ।
स्थळीं एका अह्णी टपत बसला वेळ बरवी—॥
द्विजातीच्या सेनेवरि जलदिं छापाच हरिसा ।
कसा घालूं याची परि समय लाभे नच तसा ॥ ६८ ॥

## ( स्रग्धरा )

२१६ त्याला माहीत होतें जंवर चमु असे मुख्य सेनेसहीत ।
छाप्याचा बेत नाहीं तंवर जमत हें गांठि घाली मनांत ॥
धाडी तो गुप्त हे[illegible] अरिचमुमधिं त्या हालचाली बघाया ।
केव्हां सर्दार एका[illegible]ठिं जमविहि तो त्यांस औत्सुक्य द्याया ६९

२१७ हेतू उद्दिष्ट सिद्धी-प्रति जलदिं कसा खास जातो मनाला— ।
लागे तैं ध्यास त्याच्या परि समय तसा प्राप्त नाहीं जहाला ॥
होई त्याची निराशा कधिं कधिं उपटी दाढि केसास तोडी ।
' या अल्ला या खुदाजी वखत बहु बुरा ' शत्रुची येई धाडी॥७०॥

## ( शार्दूलविक्रीडित )

२१८ ऐसा काळ निघून जात असतां तो भाउ एके दिनीं ।
मुक्कामास करी जरा दुरवरीं मुख्या चमू-पासुनी ॥
त्याची बुद्धि-बिहाळ-संनिध असे ती छावणी त्या दिशीं ।
भाऊ बंधुसवें खुशाल निजले होते सुखानें निशीं ॥ ७१ ॥

२१९ कांहीं स्वार समस्त सुस्त चमुच्या-मध्येंच गस्ती-प्रती ।
घालीती परि बाकि सर्व निजले ऐशी असे तत्स्थिती ।।
होती सर्वहि सामसूम अगदीं गोंगाट कोठें नसे ।
जैसा वेळ हवा तसाच मिळला अह्मीस आतां असे ।। ७२ ।।

२२० तेव्हां किर्र असा कुशब्द निशिचा टापा हयांच्या कदा ।
गस्तीस्वार खास मात्र करिती ऐकूंहि ये एकदां ।।
केव्हां निद्रित घोरती घुरु घुरू केव्हां गजांचा रव ।
उष्ट्रांचाहि तसाच कर्ण-विवरीं केव्हां पडे भैरव ।। ७३ ।।

२२१ ऐशी घेउनि बातमी यवन तो संगें अती गारदी ।
घोडेस्वारहि घेउनी कडलुरा-हूनी निघाला कुधी ।।
संगें तोफहि पाचशें यवन घे; येऊनि भाऊवरी ।
छापा तच्चमुच्यावरीं निजबळें घाली तदा तो अरी । ।। ७४ ।।

( स्रग्धरा )

२२२ तोफा सोडावयाचा हुकुम फिरविला [illegible]त्या हैदरानें ।
चाराचा तो निजेचा समय सकल तें [illegible]थ झोपेंत होतें ।।
सेना त्यांच्या-वरीं जैं दण दण दण [illegible] तोफ चालू करी ही ।
तत्सेना घाबरेची पळून कुणिकडे जा[illegible]या वाट नाहीं ।। ७५ ।।

इति भट्ट परशुराम चरितांतर्गत हैदराभ्यवस्कंदन
नामक तृतीय भाग
समाप्त.

## भाग ४ था.

[ हैदरसमरपरिसमाप्ति ]

( शार्दूलविक्रीडित )

२२३ मागें सांगितल्या-परी अरि करी तोफा सुरू जेधवां ।
बाणांची करि वृष्टि सारखि वरी होती निशी तेधवां— ॥
काळी किट्ट कुणास कोणिहि मुळीं तेव्हां दिसेना तळीं ।
झालें व्याप्त अकाश भूमि सगळी धूम्रें धुळीनें मुळीं ॥ १ ॥

२२४ झाली धांदल तच्चमूंत अगदीं येतां अरी सत्वरें ।
भीती-सूचक शृंगशब्द भरला सैन्यांत सारा त्वरें ॥
झाली नौबदही सुरूच पृतना एकत्र व्हायास्तव ।
आला अल्ला असा चमूंत पसरे मोठा तदा तो रव ॥ २ ॥

२२५ जो तो घाबरुनी [illegible]यार हुडकी पोषाक गोळा करी ।
कोणी जीन हया[illegible]च चढवी अंबारि हत्तीवरी— ॥
लादूं नौबद लाग[illegible] तशि कुणी कोणी शिरस्त्राण तें— ।
घाली मस्तकिं घालिती चिलखतां अंगांत कित्येक ते ॥ ३ ॥

२२६ कोणी बाण भरूंहि लागति तदा ऐशी स्थिती जाहली ।
तोफांचा भडिमार शत्रुकडचा सेना बहू डागली ॥
आंगें होरपळूंच लागति कुठें तंबूमधी विस्तव— ।
लागोनी मग आग ती भडकली आकांत झाला नव ॥ ४ ॥

२२७ कांहीं तंबु जळून खाक अगदीं झालेच सैन्यांतिल ।
भारी सैनिक अग्नितुंडिं पडले होमांत जैसे तिल ॥
'मेलों रे' अनलीं असा ध्वनि तदा चोहोंकडे चालला ।
लोकां जाळुनि टाकिलें हि अनलें सद्घोक तैं माजला ॥ ५ ॥

२२८ या अग्निप्रलयीं समस्त द्विज ते मारूं असे हैदरा– ।
वाटे तैं परि मृत्युवेळ नव्हती तत्संग वाचे पुरा ॥
तोफांचा ध्वनि कर्णि पूर्ण पडतां गोपाळ भाऊ त्वरें ।
सेनाग्रीं हयिं बैसुनी थडकलें धीरास द्याया बरें ॥ ६ ॥

२२९ जैशी नोबद जाहली सुरु तशी सेना जमूं लागली ॥
गोळ्या शत्रु तिथेंच मारित असे यासाठिं ती भाजली ॥
तेथें या द्विजपुंगवा निमुटता स्वीकारुनी राहणें– ।
झालें प्राप्त ह्मणून भाग पडलें देवास हे राखणें ॥ ७ ॥

२३० रास्ते आणिक भाउ बंधुसह तैं सोशीत गोळ्या अती ।
तेथें राहुनि झुंजती अरिवरी घोडे झणीं सोडिती ॥
त्याचा मार न सोसवे उसळुनी गोळा शतघ्नींतुनी ।
गोपाळांग बरेंच भर्जित किंहो झालें तया चाटुनी ॥ ८ ॥

२३१ नाहीं तो फिरला बहूत बसला धक्का तयाला तरी ।
धैर्याचा पुतळा जनास गमला ‘ शाबास ’ ही वैखरी–॥
माजे चोहिंकडे अरी धडपडे विप्रांसी मारावया ।
‘ राखी देव जया समर्थ नसतो मृत्यू तया न्यावया ’ ॥ ९ ॥

२३२ बंधूच्या तुरगास लागुनि भला गोळा निमाला हय ।
बंधूलागिंहि मारि हैदर झणीं तेव्हां महानिर्दय ॥
भाऊच्या-वरि बाण आणि गुलिका आल्या अहो दोनदां ।
‘तारी देव तयास कोण जगतीं मारी’ तसें हो तदा ॥ १० ॥

२३३ चिंध्या होउनि दोन अश्व पडले अन्यीं बसे सत्वर ।
शत्रूला परि दाखवी न अपुल्या पृष्ठाप्रती तो नर ॥
कांहीं खुजबुजले तरी भिउनि जे ‘ आयाइ ’ हें बोलती ।
हल्लींचें नर पारतंत्र्य खुषिनें यासाठिं हो भोगती ॥ ११ ॥

१ माधव कृष्ण मंगळवेढेकर ( हे भाऊचे सख्खे चुलत भाऊ )

## ( शार्दूलविक्रीडित )

२३४ हो शेंदाड शिपाइ सर्व बनलों खाया मिळेना पुरे ।
चैनीही बनलों तसें विसरलों कर्तव्य आतां खरें ॥
बंधूंशीं दुहि माजवूनि पडलों खड्डयामधेंही जरी ।
व्हावें सावध कंत्ररेस कसुनी सद्धर्म ध्या अन्तरीं ॥ १२ ॥

२३५ भाऊ अन्यहयीं बसे झडकरीं सेनेस दे धीर तो ।
"मारा भीउंनका अरीस पळवी तो किर्तिला लाभतो ॥
ज्या मर्दास असेच हिंमत खुदा तेथें असे साह्य जी ।
हें चित्तांत धरून युद्ध करणें सोडूं नका हो अजी" ॥ १३ ॥

२३६ तोफांचा भडिमार फार असुनी वृष्टी शरांची तशी ।
राहे सोशित भाउ धीर चमुला देऊनि सत्कीर्तिशीं—॥
पावे पार न धैर्य-शौर्य-जलधी-लागीं असा शूर तो ।
किंवा भीमच तो शिरून समरीं म्लेच्छां जवें मारितो ॥ १४ ॥

२३७ डोळ्या देखत भाउबंद पडती हत्तीहि घोडे तसे ।
उष्ट्रादीक जनावरें पडती तद्राशि तो होतसे ॥
हत्ती बृंहति हींसती हय जवें किंकाळती ती ततीं—।
उष्ट्रांचीहि दिशा न गाणुन अहो गेल्याच त्या संप्रती ॥ १५ ॥

२३८ तोफांचा भडिमार बाणहि तसे मर्मस्थळीं लागुनि ।
झाला व्याकुल जीवही परि फिरे ना भाउ तो तेथुनी ॥
लोकां धीरच देइ त्यास जय ही संज्ञा बरी वाटतें ।
किंवा त्याहुनि चांगलें पद कथा तुह्मांस वाटेल तें ॥ १६ ॥

## ( स्रग्धरा )

२३९ भाऊ शाबास बारे प्रसवलि जननी तूज तीतें नमी मी ।
त्वच्छौर्या पाहुनीया स्मृति मजप्रति हो कांक्रनाचीहि नामी ॥
जो त्या अंधारि रात्रीं मुळें न डगमगे पार सर्वांस नेई ।
ज्याचें सर्वांग भाजे परि न विसरला मुख्य कर्तव्य भाई ॥ १७ ॥

## ( मालिनी )

२४० ‘ स्वसुखनिरभिलाषः खिद्यसे स्वामिहेतोः ’ ।
कवि चरण रची जो मुज्ञ आहे किती तो ॥
ऋत वचन कराया सत्कवीचें ह्मणून ।
तव जनन गमे रे नाहिं वा तूं जयोन ॥ १८ ॥

## ( आर्या )

२४१ विश्वासघात करुनी, नीती सोडूनि आणि रणधर्म ।
हैदर अलीनें हें, केलें अत्यंत नीच कीं कर्म ॥ १९ ॥

२४२ परि नाहीं घाबरले, सद्विज तैसेंच राहिले समरीं ।
क्षत्रियभूषण वर्तन, केलें तेव्हां द्विजीं अहो चतुरीं ॥ २० ॥

२४३ या वीराचरणानें, पटवर्धन-भाजु शाहिली करवी ।
झाला नाश परंतू, अन्तीं जय त्यास कीर्तिशीं मिळवी ॥ २१ ॥

२४४ त्या क्रूर हैदरानें, बाणांनीं आणि [illegible] शतघ्नींनीं ।
सेना फार खपविली, अश्वादिकही [illegible] तैसेंच गोळ्यांनीं ॥ २२ ॥

२४५ अवशिष्ट चमू सारी, कापावी हा [illegible]री करी बेत ।
झाली सकाळ ह्मणजे, दुष्ट वळे तें करावया त्वरित ॥ २३ ॥

२४६ कंठस्नान द्विजांना, असिधारांनीं स्वयेंच घालाया ।
हैदर चमुसह लागे, सिंहीं जंबुक तसा तदा याया ॥ २४ ॥

२४७ पाहे द्विजसेनेला, तों शवराशी बहुत पडलेत ।
धूम्राचे लोट वरीं, जाति रणीं पंक माजला बहुत ॥ २५ ॥

२४८ जुणगें पकून गेलें, अरिचा झाला असे बहू नाश ।
वाटे द्विजचमुवरतीं, तेव्हां उठला समेन्यु कीनाश[3] ॥ २६ ॥

---

१ अर्जुनापेक्षां कमी. २ रामावलेला. ३ यम.

२४९ एकंदरींत चमुचा, जरि झाला नाश फार तरि अर्जुनी– ।
सेना बरीच शिल्लक, हैदर दचकेच तीस पाहुनी ॥ २७ ॥

२५० तोफा डगायाचें, काम करी विप्रसैन्य जोरांनीं ।
पोहुनि या कृतिलागीं, धैर्य पळे हैदरास सोडोनी ॥ २८ ॥

२५१ भाऊ गोपाळ तसे, अन्यहि सरदार त्या चमूमाजीं ।
देउन धीरास बहू, चमकति विद्युल्लतेपरी गाजी ॥ २९ ॥

२५२ सोडिति बाण सणाणा, धडधड तोफाहि सोडिती बहुत ।
मारिति सेना अपुली, पाहुनि बहु भीति घे यवन-चित्त ॥३०॥

२५३ हैदर कंबर कसुनी, बेत रहित तो करी अरी-वर्ती– ।
असिनें कापायाचा, जायाचा घेउनी बहू धास्ती ॥ ३१ ॥

२५४ पुर्वी-परी शतघ्नी, सोडी अल्ली बहूत वेगानें ।
भाऊ-कडून गोळ्या, अरि-वरि जाती तशा झपाट्यानें ॥ ३२ ॥

२५५ यापरि यामत्रय तो, लढला परि बेत सिद्धिला नाहीं– ।
गेला परंतु गेला, सेनेसह तो त्वरें स्वदेशींही ॥ ३३ ॥

२५६ भाऊ गोपाळ तदा, [illegible] तसे उर्वरीत सेनेला ।
संगें घेउन आले, मि[illegible]याला आपुल्या चमूपति ज्ञ ॥ ३४ ॥

२५७ गोपाळराव यांचे, ऐंशी (८०) घोडे रणामधीं मेले ।
हत्ती उंठ तसेची, हैदर-टिपुचेहि वीर बहु गेले ॥ ३५ ॥

२५८ माधवकृष्ण निमाले, ही हानी जाहली असे यांची ।
सर्वंचि जायाचे परि, दैवकृपा यावरी असे साची ॥ ३६ ॥

२५९ होते बेसावध हे, तत्फळ यांना मिळे त्वरें बरवें ।
"युद्धीं सावध वागा" हें शिक्षणही मिळे तयास नवें ॥३७॥

( शार्दूलविक्रीडित )

२६० दे जैसा पटवर्धनास जनता हा दोष "या संगरीं– ।
होते सर्वहि अव्यवस्थित" असा भाऊस भारी परी– ॥

अल्लीच्या-परि शूर-वीर समरीं प्रत्यक्ष झुंजूनिया ।
लाभेना जय यामुळें मग करी तो नीच कृत्यास या ॥ ३८ ॥
२११ छापा घालुन मारणें नच बरें शूरास त्या अल्लिला ।
वाटे "निंद्य" असा किताब यवना देणें बरें बुद्धिला ॥
नर्डीला नख शत्रुच्या गफलती भारी करूनी कधीं ।
देणें शील नव्हेच मर्द मनुजा नामर्द अल्ली कुधी ॥ ३९ ॥

( शिखरिणी )

२१२ खऱ्या शूरें वीर्यें लढुनि समरीं शत्रु अपुला ।
वधावा वा युद्धीं मरुन मिळवो स्वर्ग वरला ॥
परी विश्वासाचें हनन करुनी उन्नतिप्रती ।
कधींही शूरानें नच मिळविणें सर्व जगती ॥ ४० ॥

( स्रग्धरा )

२१३ अल्लीला दोष देतों "कपटि यवन हा घातकीही तसाच ।
विश्वासाचा" असा जो निशि अरि[illegible]तीं पातला दुष्ट साच ॥
कापी शत्रूस अल्ली सदय सु-मनुजा [illegible]त्य जें पाहवेना ।
तेव्हां त्या निर्दयानें असि कृति करु[illegible] आणिली लाज वेना ४१

( आर्या. )

२१४ पटवर्धन-वीरांची, सेना मिळतांच मुख्य-सेनेला ।
कपटी हैदर-खाना, बक्षिस द्यावें विचार हा ठरला ॥ ४२ ॥
२१५ त्रिंबकराव तसेंची, रास्ते भाऊ प्रचंड वीरांना ।
वीरश्री बहु चढली, मारूं अल्लीस हा असे बाणा ॥ ४३ ॥
२१६ समरोत्साह चमूच्या, मध्यें प्रत्यक्ष तें दिसूं लागे ।
यवनाच्या रक्तें कधि, माखूं समशेरि हें मनीं वागे ॥ ४४ ॥
२१७ ऐसा सेनासागर, बुडवाया अरिस तो निघायाला ।
होतां तयार संकट, ओढवलें त्यांचियाच गमनाला ॥ ४५ ॥

२६८ तें शूर माधवाला, नृपयक्ष्मा रोग होउनीच गदी—।
झाला माधवराजा, शय्या त्याला न सोडवे अगदीं ॥ ४६ ॥

२६९ स्वीकृतकृत्य न जातें, अन्तीं ऐसें रमाधवा वाटे ।
फाटे हृदय तयाचें, नेत्रामध्यें तदा उदक दाटे ॥ ४७ ॥

२७० कष्टी माधव झाला, चमुचा अधिकार देइ मामांना ।
भाऊ तसेच रास्ते, यांना देईहि त्याच सन्माना ॥ ४८ ॥

२७१ कृष्णातीराहूनीं, परते माधव पुण्याकडे याया ।
सर्व-गुणीही मनुजा, नशिबा पुढतीं न ठेववे पाया ॥ ४९ ॥

२७२ भाऊ त्रिंबक, रास्ते, यांनीं धैर्या धरूनिया पिच्छा ।
अह्लीमागें लागुन, अगदीं पुरवून सोडिला साचा ॥ ५० ॥

२७३ पंध्राशें गारदि तें, स्वारहि घेऊन सातशें अह्ली ।
दोन हजार पदाती, धुळपावरि स्वारि ही तदा आली ॥ ५१॥

२७४ तेरा दिन तद्दुर्गा, घेऊन टाकून दीधलें त्यानें ।
भाऊ बंधुसह तदा धांवे यवनीं बहूत वेगानें ॥ ५२ ॥

२७५ दिसतां यवनचमूचा, धुव्वा उडवून जैं दिला यांनीं ।
या अह्ला करित तदा, पळ शूरांनींहि काढिला यवनीं ॥ ५३॥

२७६ पटवर्धन-वीरांनीं, प्रायश्चित्तास अह्लिला दिधलें ।
छाप्याच्या बद्लच्या, दुष्कृति-परिणमन हें असें घडलें॥५४॥

२७७ लुटला गोट अरीचा, मांसमया भूमि भोंवतीं केली ।
म्लेंच्छांचीं शिरकमलें, जिकडे तिकडे तदा बहू पडलीं ॥५५॥

२७८ चार शत महायोद्धे, यवनांचे कापिलेच विप्रानीं ।
स्वारहि पंचशत तसे, जखमी केले अती पदाति रणीं ॥ ५६ ॥

२७९ तोफाहि घेतल्या बहु, पांच शतें अश्व चांगले अरिचे ।
विप्रांनीं हरिले तें, झाले हो असित-तुंड म्लेंच्छाचें ॥ ५७ ॥

6

२८० पटवर्धनाकडिलही, या युद्धीं अर्धशत पडे पदग ।
यशवंतराव मेला, हाच पडे यावरीहि दुःख-नग ॥ ५८ ॥

( आर्या )

२८१ जानोजी धुळपाच्या, किल्ल्याजवळीं द्विजाति सेनेनें ।
बापाचा नाश बहू, केला हें ऐकिलेंच टिप्पूनें ॥ ५९ ॥

२८२ जो मोठा शूर असे, क्रूर तसा साहसीहि बहु होता ।
वाघापरि जनकाला, मिळण्या येण्यास जाहला निघतां ॥६०॥

(शार्दूलविक्रीडित)

२८३ जेव्हां टिप्पु मिळे पित्याप्रति तदा जिंकावया तद्धया ।
मामा त्रिंबक भाउच्यासह निघे सेनेस घेऊनिया ॥
राजापूर तसेंच राचिटि द्विजीं ताब्यामधें आणिली ।
तोफांचा भडिमार फार करुनी ठाणीं दुर्जीं घेतलीं ॥ ६१ ॥

( आर्या )

२८४ यापरि गड क्रमानें, एका मागून एक घेऊन ।
सत्ता स्वामीची ते, स्थापित होते सत्वरें करून ॥ ६२ ॥

२८५ इतक्यांत तत्पित्याचा, भाऊ गोपाळ [illegible]मिक-ख्यात ।
बिघडे प्रकृति म्हणुनी, आला तो सत्वरींच मिरजेंत ॥ ६३ ॥

२८६ झाला उदर तयाला, त्रयोदशीच्या दिनीं सुशुक्लांत ।
सत्राशें एकोत्तरिं, सत्तरिं झाला तदंत माघांत ॥ ६४ ॥

२८७ झालें दुःख समस्ता, माधवरावाप्रती कळे वृत्त ।
दुःखी होउन वदले, नेलें नररत्न हें यमें ख्यात ॥ ६५ ॥

२८८ दुःखवत्याचीं पत्रें, मिरजेला आणि तच्चमूमाजीं ।
सांत्वन करावयास्तव, धाडी माधव नृपाळ तो गाजी ॥ ६६॥

२८९ " राजश्रिया विराजित, राजश्री विप्रवीर सरदार ।
कर्णाटकाधिकारी, गोसावि यासि राव लिहि शूर ॥ ६७ ॥

२९० सकल-गुणालंकृति जो, लक्ष्म्यालंकृत नृपाप्रती मान्य ।
स्नेहांकित माधवनृप, याची आशी तुह्मांस सन्मान्य ॥ ६८॥

२९१ विनंति विशेष पत्रीं, लिहिलों चित्ताप्रती तुह्मी द्यावें ।
गोपाळराव-मृत्यू, ऐकुनि मच्चित्त दुःख बहु पावे ॥ ६९ ॥

२९२ त्यांणीं सेवा केली, निष्ठेनें आणि फार प्रेमानें ।
श्रीमत्कृपा मिळविली, कीर्ति तसें द्रव्य चांगलीं वसनें ॥७०॥

२९३ गोपाळराव यांची, गणना सरदार-मंडळामाजीं ।
प्रमुखांमधेंच होती, होती सानंद यत्प्रजा राजी ॥ ७१ ॥

२९४ झाल्या गोष्टीस नसे, उपाय आहे तुह्मांवरी भार ।
आतां सरदारीचा, सांभाळा लक्ष देउनी फार ॥ ७२ ॥

२९५ स्वामिकृपा तुह्मांवरि, आह्मां करण्यास योग्य ही सेवा ।
' कष्टाचें फळ मनुजा, मिळतें सिद्धान्त मानसीं ठेवा ' ॥७३॥

२९६ ध्या आतां यव[illegible], सावधगिरि राखुनी समाचार ।
नाहीं विशेष या[illegible], यश मिळवुनि पत्र धाडणें जरुर " ७४

( शार्दूलविक्रीडित )

२९७ ज्ञाताऱ्या हरभट्टजीवर जसा रामाजि-मृत्यूमुळें ।
गोविंदावरि ये प्रसंग तसला गोपालमृत्यूमुळें ॥
पुत्राचें मृतिदुःख वृद्धपणिं त्या गोविंदरावास ने ।
वैकुंठास तदा तदीय वनिता गेली सती सन्मनें ॥ ७५ ॥

२९८ मृत्यू ऐकुनि बंधुचा बुडति ते भ्राते सु-दुःखार्णवीं ।
तेव्हां त्यास विवेकरूप सुगडी धैर्यें वरी आणवी ॥
व्यामोहास दिलेंच टाकुन पुढें जायास शत्रूवरी ।
स्वाम्याज्ञा परिसोनि सिद्ध सगळे झाले तदा सत्वरीं ॥ ७६॥

### ( इंद्रवज्रा )

२९९ आज्ञा धन्याची अनुगास मान्य ।
हें तत्व तेव्हां सगळ्यांस मान्य ॥
म्हणून सारे निघती लढाया ।
सत्कीर्ति चाले सह त्या वराया ॥ ७७ ॥

### ( आर्या )

३०० गोविंद-हरीचा सुत, भ्रातृज यांनीं रणांत सत्कीर्ती– ।
आजवरी मेळवुनी, दाखविली दक्षता जनास अती ॥ ७८ ॥

३०१ परि भाउ खुद्द आतां, एथुनि मुख्यत्व पाउनी समरीं ।
अरि मथुन करी हरिची, घाटी मिरवुनि रणांत यशाहि वरी ७९

३०२ सत्रा एकाहत्तर, नंतर जी जी घडे उलाढाली ।
प्रत्येकींत असे हा, मुख्यांगें कळति याप्रती सगळीं ॥ ८० ॥

३०३ साचिव्य कांहीं दिन हा, लाभुनि नृपहित मनें करून करी ।
इत्यादि सर्व गोष्टी, परिसाव्या सा[illegible]न त्या चतुरीं ॥ ८१ ॥

३०४ ‘ राजा माधव नृपती, क्षय होउनि थेउरामधीं पडला ।
हैदरमथना करुनी, नृपदर्शन घ्यावयास जाउं चला–॥ ८२ ॥

३०५ श्रीरंगपट्टणावरि, मोठा हल्ला रिपूहि निर्नाम– ।
आतां करून जाऊं, नृपतिकडे जें असेच सुखधाम ’ ॥ ८३ ॥

३०६ त्रिंबकमामासह, मग भाऊंनीं बेत मानसीं केला ।
त्यापरि सेनासागर, अरिपुरनाशार्थ लोटला सगळा ॥ ८४ ॥

३०७ भाऊ आणिक मामा, येती हल्ला करावया नगरा ।
अल्ली ऐकुनि आला, जय्यत सेनेनिशीं तदा समरा ॥८५॥

३०८ मोतीसरोवराच्या, संनिध गांठी पडून वीरांच्या ।
झाल्या झटपटि चालू, टोळ्या धावति विपूल स्वारांच्या ॥८६॥

३०९ समरोत्साही सेना, द्विजततिच्या आणि हैदराच्याही– ।
होत्या यास्तव त्यांची, चालू झाली बहूत चपलाई ॥ ८७ ॥

## ( शार्दूलविक्रीडित )

३१० टोळ्या तीन करून आत्मचमुच्या मामा तदा नेमिती ।
एकीच्या वरि भाउला चमुपती अन्या स्वतां पाहती ॥
कृष्णाजी बळवंत धायगुडला देऊनि भागा तिजा ।
बांधीं शिस्त वरी अरीहि समरीं घेऊनि ये आत्मजा ॥ ८८ ॥

## ( आर्या )

३११ द्विजसैन्यांनीं अरिवरि, तोफांचा लाविला सपाटा जी ।
गोळ्यांचा बाणांचा, हैदरटिपुंनींहि चालली आजी ॥ ८९ ॥

३१२ गेली द्विजस्वारांची, मांड चढावाकरून अरिवरतीं ।
घोड्यांच्या टापांनीं, हिंसण्यांनीं दश दिशा तदा भरती ॥९०॥

३१३ तोफांच्या भडिमारें, झालें पाताळ विष्णुपद एक ।
हर हर वदुनि म[illegible] अरिचमु झोडिति तदाच अतिरेक ॥९१॥

३१४ टिप्परवाई चालुनी प्रेतांचे राशि संगरीं पडले ।
वीरांनीं चोंहिकडे, [illegible] रक्तप्रवाह वाहावेले ॥ ९२ ॥

३१५ द्विज-यवन-चमू होत्या, जय्यत यास्तव कुणी कुणा हार– ।
गेलें नाहीं त्यांचें, समर तदा चाललें दिवस चार ॥ ९३ ॥

३१६ युद्धाच्या कौशल्या, दाउनि केली कमाल भाऊंनीं ।
चिरुनी यवनचमूला, रिपुमुख मग टाकिलें फिकें करुनी ॥९४॥

३१७ हैदरसेनेस तदा, त्राहि त्राहि त्वरें करी विप्र ॥
हैदर शूर खरा परि, अबलासम जाहलाचि तो क्षिप्र ॥९५॥

३१८ भाऊ बंधुजनाला, आत्मचमूलागिं देई तो हुरुप ।
सेनापतिचें सत्यचि, दावी लोकां तसें अरीस रुप ॥ ९६ ॥

३१९ पाहुनि युद्ध-कुशलता, त्रिंबकमामाच थक्क झाले जी— ।
ऐसें नाहीं तर अरि, घाली कीं बोट स्वा मुखामाजीं ॥ ९७ ॥

३२० कृष्णाजी बलवंतें, मामांनींही तसेंच कर्तव्य ।
केलें नामी समरीं, चालवुनी आत्मखड्ग तें दिव्य ॥ ९८ ॥

३२१ कृष्णाजीरावानें, हैदरचमुभोंवतीं दिला वेढा ।
नाहीं हालविला तो, चारी दिन खास वीर हा गाढा ॥ ९९ ॥

३२२ हैदरचमुला तेव्हां, हलण्याला मार्ग नाहिं उरला जी ।
भाऊ तोंडीं मामा, मागें मारी असंख्य तें वाजी ॥ १०० ॥

३२३ कोंडुनि गेलों आपण, सेना मेली बहुत समरांत ।
द्विजसेना जोरावरि, पाहुनि अरि भीइ आत्मचित्तांत ॥ १०१ ॥

३२४ हैदरटिप्पू तेव्हां, पंच्विस स्वारांनिशीं जवें करून ।
घायगुऱ्याच्या फळिला, फोडुन नगरांत जाति ते पळुन ॥१०२॥

३२५ निलकंट त्रिंबकाच्या, वक्षःस्थळिं एक गोळि लागून ।
ते युद्धीं हत झाले, भाउंचे चुलत बंधु हे जाण ॥ १०३ ॥

३२६ स्वामीच्या सेवेमधिं, समरार्पण देह [illegible]या जनीं केला ।
पटवर्धनकुलपुरुषां, त्यांत तिजा ह[illegible]णीं यमें नेला ॥ १०४ ॥

३२७ या शूर कुलांतिल जन, धारातीर्थ[illegible] असीस गाजवुन ।
किंवा रणकार्यामधिं, मृत झाले सद्यशास मेळवुन ॥ १०५ ॥

३२८ निलकंठराव यांच्या, औत्तर-कार्यार्थ बांधवीं सकलीं ।
जाउन कावेरीला, रावक्रिया सारिली अंकें सगळी— ॥ १०६ ॥

३२९ अह्मी शरण ह्मणुनी, रण करणें न्याय्य नाहीं हें स्वमनीं ।
मामांनीं भाउंनीं, आणुनि रण बंद पाडिले सुजनीं ॥ १०७ ॥

( शार्दूलविक्रीडित )

३३० सद्धचाच्या अटि धाडिल्या टिपुकडे देऊन तेथें तळा ।
कावेरीनदिच्या तटीं स्वचमुला पाहूनि नामी स्थळा ॥

---

१ बांधव जनांनीं. २ दुःखानें.

हे सद्विप्र सुशील एकवचनी बोलापरी वागती ।
अन्ही हा कपटी असत्यवचनी मोडी अटी दुर्मती ॥ १०८ ॥

३३१ मामा भोजन सारुनी स्वशिबिरीं स्वस्थान्त बैसूनिया ।
गप्पागोष्टि करीत आंत असतां सल्लयादिकांच्या नव्या ॥
तो कापव्यपटू तदा द्विजवरीं तोफा झणीं चालवी ।
मामा पाहुनि सिद्ध होय यवना द्याया लढाई नवी ॥ १०९ ॥

( आर्या )

३३२ मामा पेठे भाऊ, रास्ते यांणीं नदीपलीकडुन ।
येणारे रिपुकडुनी, कापुन काढून टाकिले यवन ॥ ११० ॥

३३३ झालें युद्ध सुरु पुनः, पट्टणदुर्गास घातला वेढा ।
चाळिस दिन झालें रण, परि धक्का नाहिं लागला सुगडा ॥ १११ ॥

३३४ भाऊंच्या तोफांची, संतत-धारा असेच चालु वरीं ।
त्यायोगें नगरामधिं, गेली धांदल उडूनिया भारी ॥ ११२ ॥

( शार्दूल विक्रीडित )

३३५ धो धो गोलक येउनी झडकरीं किल्ल्यामधे आदळे ।
झाले फस्त समस्त वर्णित बगिचे वाडे तसे चांगले ॥
झाले नागर भीतियुक्त सगळे रस्त्यांत वागावया ।
कोणा धाडस होइना यवनपें दुःखाप्त केलें तयां ॥ ११३ ॥

३३६ केला हा अविचार दुष्ट यवनें दुःखीं प्रजा लोटिली ।
बोटें मोडिति बायका कटकटा उल्थून जावो खळी ।
चिंतासागरिं सर्व लोक बुडले आतां कसे प्राण हे ।
वाचावेत तयांस शुद्धिहि नसे युद्धें स्वगर्वापहें ॥ ११४ ॥

३३७ किल्ल्याभोंवतिं आणि सर्व शहरा-भोंतीं गराडा भला ।
विप्रांच्या चमुचा असून रवही व्यापी नभो-मंडला ॥

---

१ श्रीरंगपट्टणास २ वर्णनीय.

तोफांचा दणका सधूम पसरे सर्वस्थळीं जेधवा ।
झाले नागर आणि हैदर-टिपू त्रस्तान्त हो तेधवा ॥ ११५ ॥

( आर्या )

३३८ वैराग्नी भाऊंचा, वाढुनि कोपाग्निही तसा फार ।
त्यायोगें असिपत्रें[1], मरती रिपुचे कितीक वीर-वर ॥ ११६ ॥

३३९ शरवृष्टी भाऊंची, त्वेषानें चालली अरी-वरतीं ।
भाऊ बंधूंस स्वयें, धीरहि देउन लढावया कथिती ॥ ११७ ॥

३४० " मित्रांनो धीर खचूं, देउं नका एक दील राखाल ।
किल्ल्यावरि नेटानें, हल्ला करितां यशास मिळवाल ॥ ११८ ॥

३४१ गलिमाचें निर्नामचि, करण्याला वखत चांगला आहे ।
आजवरी तदुपेक्षा, व्यर्थचि केली मनामधें ध्या हें ॥ ११९ ॥

३४२ या बेइमान हैदर-टिपुचें निर्नाम करुनिया दुर्गीं ।
लावूं निशाण विभुचें, ईश करो आपुलीच सत्या[2]गी " १२०

३४३ ऐसा वीरश्रीचा, बोध करी भाउ [illegible]मबंधूंना ।
शाबास ! वाहवा ! जी ! बोलुन उत्ते[illegible]ती कधीं त्यांना ॥ १२१ ॥

३४४ यापरि सव्वामहिना, भाऊ रिपुला[illegible] वाटलाच पवी ।
झुंजे हटवी जिंकी, मद हरि रिपुचा जगांत यश मिरवी ॥ १२२ ॥

३४५ प्रथम टिपू हैदर ते, हिमतीनें लढति फार संग्रामीं ।
होउन यत्न विफलची, मेले अति लोक शूरवर नामी ॥ १२३ ॥

३४६ हैदरखानाचे जन, पटपट मरती रणांत तोफेनें ।
सारी चमु जर्जर हो, धीर तयांचा सुटेच जनमृतिनें ॥ १२४ ॥

३४७ भाऊ कंठस्नाना, असिनें घालील वाटलें रिपुला ।
वेढा पाहुन दुर्गा, भांबावुनि खान तो तदा गेला ॥ १२५ ॥

---

[1] तरवारीनें [2] भाषण

३४८ मूर्च्छा क्षणोक्षणीं त्या, रण टाकुनि लागली तदा याया ।
दुःस्थिति पाहुनि चमुची, धैर्य गळुनि अक्षि लागती फिरण्या १२६

३४९ एकिकडे सेना तर, टिप्पू दुसरीकडे तसा बाप– ।
मलतीकडेस त्याचा, ऐसा गोंधळ चमूस दे ताप ॥ १२७ ॥

३५० कुमुदान महमदाला, फुलचारी पोर्तुगीज ही याया ।
साह्यास याचिलें परी, यवनांचे यत्न जाहले वायां ॥ १२८ ॥

( शार्दूलविक्रीडित )

३५१ झाले हाल पुरे तदा यवन ते मारा अती सोसिती ।
पश्चात्ताप पुराच होउन पुढें सल्ला करूं इच्छिती ॥
आह्मां भीक नको परंतु कुतरा आटोप ऐसें तया– ।
झाले येति समस्त म्लेंच्छ शरणा प्राणांस मागावया ॥१२९ ॥

( आर्या )

३५२ विप्रांच्या सैन्यांनीं किल्ला बहुतेक हस्तगत करुनी ।
मुलखाच्या खंडणीला, घ्याया सुरुवात चालविलि त्यांनीं ॥१३०॥

३५३ इतक्यांत थेउराहुन, माधवजी धाडि एक पत्र नवें ।
'आसन्न-मृत्यु आहें, यास्तव भेटावया तुह्मीं यावें' ॥ १३१ ॥

३५४ 'हैदरटिप्पू यांशीं, उरकावा तह तुह्मी कसातरि हो ।
द्यावा अन्तसमयिं मज, भेटीचा आपुला भला लाहो' ॥१३२॥

३५५ मर्मज्ञ, शूर, दात्या; कृपाळु गंभीर आपुल्या विभुनी ।
आज्ञा पाहुनि मामा, भाऊ ही खिन्नचित्त होति अती ॥१३३॥

३५६ पोटांत भडभडे बहु, नेत्र जलानें बहूत डबडबले ।
आलाच कंठ दाटुन, नेत्रांतुन अश्रुबिंदुही पडले ॥ १३४ ॥

३५७ थेउर एथील दिसे, देउळ आणीक राव माधव ही ।
मूर्तीमान पुढें तें, दुःखालागीं पुरी पडे न मही ॥ १३५ ॥

३५८ शेवटचें दर्शन हें, स्वामीचें आपुल्या भल्या घ्यावें ।
भाऊस तदा झालें, तह सारुनि थेऊरीं झणीं जावें ॥ १३६ ॥

( शिखरिणी )

[ तह ]

३५९ शिवाजीराजाचे-समयिं जितका प्रांत अमुचा ।
असे या प्रांतीं तो सकलहि मिळो आणि तुमचा— ॥
नसावा तावा जो नरपति-वरीं सावनुरच्या ।
अशा किल्ल्यांना द्या मर्दगिरि गरीमास तुमच्या ॥ १३७ ॥

( आर्या )

३६० छत्तीस लाख द्यावा, युद्धाचा खर्च आमुचा तुम्ही ।
चौदा लक्ष कर तसा, दरसालीं देत जा ठरेच तहीं ॥ १३८ ॥

## हैदरसमर परिसमाप्ति नामक ४ भाग

समाप्त.

## भाग ५ वा.

[ भ्रातृजवध ]

( आर्या )

३६१ मद हरुनी अरिचा मग, तह करुनी यावयाप्रती निघती ।
मामा पेठे भाऊ, फिरवुनि संपूर्ण आपुली चमु ती ॥ १ ॥

३६२ माधव-भेटीसाठीं, जलदीनें थेउराप्रती आले ।
प्रेमें श्रीमंतांना, पाहुनि सानंद-चित्त ते झाले ॥ २ ॥

१६३ युद्धाची सकल कथा, ऐकुन वाटे द्विजातिपास बरें ।
मामाला भाऊला, वदले 'शतकृत्य हें असेच खरें' ॥ ३ ॥

१६४ आहे अन्त-समय हा, आणुनि चित्तांत माधवें सगळे ।
मानकरी बोलविले, थेउरिं दरबार ही तदा भरलें ॥ ४ ॥

१६५ रघुनाथराव दादा, मोरोबा परशुराम ते नाना ।
हरिपंत आणि मामा, दाजी गोविंद आणखी अण्णा ॥ ५ ॥

१६६ इत्यादि सर्व छोटे, मोठे सरदार जमति त्या ठायीं ।
गणपतिदर्शन घेउन, सकल शिरें ठेविती नृपापायीं ॥ ६ ॥

( स्रग्धरा )

१६७ मागें हें राज्य चालो सुनियमितपणें कांहिं तंटा न व्हावा ।
आढी जाव्या निघूनी सकल जन तसा निर्मलान्ती बनावा ॥
सर्दारांनीं स्वराज्या-प्रति झटुनि बहू नित्य द्यावाच टेका ।
हेतू हा माधवाचा ह्मणुन जमविले शुर सर्दार लोकां ॥ ७ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१६८ तो राज्याविषयीं करीच निरवा-निर्वीस राजा यदा ।
गोष्टीचीहि करी नृपाल दुसऱ्या तो सुव्यवस्था तदा ॥
बालाजीकुलजांस पाहति जळीं दोघे तया बापुला ।
दादालागिंहि बोलवी जवळि तो सांत्वी तयांना भला ॥ ८ ॥

१६९ दादाङ्कीं अनुजास बैसवि करीं देऊनि त्याच्या करा ।
बोले गद्गदकंठयुक्तचि रवें 'रक्षा मुला पामरा ॥
काका! मी तर चाललोंच निघुनी या बालका रक्षणें- ।
आहे हें तुमच्या-कडेस दुसरें राज्यास सांभाळणें' ॥ ९ ॥

१७० 'सर्वांचा प्रतिपाल आत्मसुतसा नाना जसा चांगला- ।
गेले हो करुनी जना सुखवुनी तैसें न झालें मला ॥
आतां आपण बालकासह बघा राज्या न यो संकट ।
टाका काढुनि आढि सर्व अपुल्या चित्तांतल्या वाइट' ॥१०॥

३७१ 'झालेलें मनि आणणें न बरवें हें राज्य जी आपुलें ।
या नारायणि लक्ष पूर्ण असुं द्या वाजीपरी चांगलें ।
दादा! जैं दिल खास स्वच्छ नसती तैं हानि होते बरें ।
आह्मां सुज्ञच आपणां न वदणें अज्ञान मी लेंकरें' ॥ ११ ॥

३७२ ऐसें माधव बोलतां जल निघे नेत्रांतुनी त्याचिया ।
दाटे कंठ निघे न शब्द पुढतीं दादा ह्मणाला तया ॥
नेत्रीं आणुनि पाणि 'माधव अमा कष्टी नको होऊं रे ।
नानाच्या परि चालवीन सगळें चिंता नको वा बरें ॥ १२ ॥

( स्रग्धरा )

३७३ दादा खात्री करी तैं अनुनकर दिला बापुच्या हस्ति माया ।
ठेवा ऐसें ह्मणूनी झडकरिं अनुजा घातलें तत्पदीं त्या ॥
वागावें निर्मलान्तें ह्मणुन बहुकरी बोध बापूस जेव्हां ।
बापूही माधवाच्या पदिं कर अपुला ठेवि बोलेच तेव्हां ॥ १३ ॥

३७४ 'वा राया! माधवा! तूं अगदिं मनि नको व्यर्थ वाहूं सुचिंता ।
माझ्या हातून आतां बिलकुल न घडे शंकडें कांहिं ताता'
बापूनीं घेउनीया शफथच वदतां माधवाचें तदा हो ।
भारी स्वस्थान्त बोले मग सकल जना राहुं द्या प्रेम लाहो ॥ १४

( आर्या )

३७५ नोवेंबर महिन्याच्या, अठराव्या तारखेस रावानें ।
सत्रा ब्याहात्तरिच्या, केलें स्वर्गी प्रयाण मोदानें ॥ १५ ॥

३७६ तद्भार्या माधव रमा, फारप्रिय जी प्रियाप्रति होती ।
अनुगमन करी वेगें, मानी दैवत सदा पतीच सती ॥ १६ ॥

३७७ माधव पत्नीच्यासह, जातां सर्वांस शोक बहु झाला ।
क्रियेस सारुनि त्याच्या, दुःखें तज्जन पुण्याप्रती गेला ॥ १७ ॥

३७८ बापू आणिक दादा, सातान्याहुन अणून वसनांना ।
नारायणास वदले, आनंदानें स्वराज्य बस नाना ॥ १८ ॥

१७९ यापरि नारायण हा, राज्यावरि बैसल्यावरी सगळे ।
पटवर्धनादि भट ते, संस्थानीं आपुल्या ह्मणी गेले ॥ १९ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१८० झाले नाहित आठ मास बसुनी नारायणा गादिला ।
दादाची वनिताच कारण असे तन्नाशिं ती चंचला ॥
इच्छा गादिवरी रघूस बसण्या होती दुणावे अतां ।
या-योगें शपथा मुळीं न टिकल्या थेऊरिंच्या तत्वतां ॥ २० ॥

( स्रग्धरा )

१८१ रावोबा भ्रातृजाला वधि सदय नृपा गारद्याच्या-कडून ।
राज्येच्छेनें तयाला वध नरपतिचा वाटलाही कडू न ॥
राज्यप्रात्यर्थ त्याचा अजवरि रघुचा यत्न अत्यंत झाला ।
राजानें याचसाठीं अडकवुन तया ठेविलें राघवाला ॥ २१ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१८२ राघोबा मत बापुचें मिळवुनी ' नारायणाला धरा ' ।
ऐसें लीहुनि देइ पत्निजवळीं कृत्याच जी दुर्धरा ॥
दुष्टेनें खुडुनी ' ध ' अक्षर तिथें ' मा ' घातला हस्तकें ।
त्यायोगें बाकि तें सहाहि पडले देऊनिया मस्तकें ॥ २२ ॥

१८३ इच्छाराम पडेच गाइसह तें मागें अबाजी पडे ।
चाफाजी तिसरा पडे मग पुढें नाईक नाना पडे ॥
नारू फाटक खड्ग लागुन पडे नारायणाच्या-वरी ।
दुष्टांनीं मग चालवूनि असिला त्या घाडिलें हो वरीं ॥ २३ ॥

( आर्या. )

१८४ बापूचें मत आहे, धरण्यालागीं कुणा न हें कळलें ।
पातक कधीं न दडतें, बहु दिन झाल्यावरी उघड पडलें ॥२४॥

( स्रग्धरा )

२८५ दादानें ब्रह्महत्या करुन मिळविलें राज्य मोठे परी जी ।
मुत्सद्यांनाच नाहीं तर सकल जना नावडे तो रघूजी ॥
शास्त्र्यांमाजीं हिरा जो नय-निपुण असा रामशास्त्री तयीनें ।
केलें बारीक शोधा रघुपति कळला राजहन्ता नयानें ॥ २५ ॥

२८६ तेव्हां ते रामशास्त्री झडकरिं निघती जावया आत्मदेशीं ।
राघोबानें नमूनी बहुत विनविलें राहण्याला तयाशीं ॥
प्रायश्चित्ता पुसे तैं नयनिपुण वदे ' जोंवरी तुह्मि आहां ।
राहायाचा न एथें शरिर-दहन हें चित्तशुद्ध्यर्थ पाहां ॥ २६ ॥

( आर्या )

२८७ नारायणा तिलांजलि, द्याया सगळे नदीवरी जमले ।
नामा तात्या पेठे, तैं संकेतें तयास्थळीं वदले ॥ २७ ॥

२८८ " रघुनाथ सुतां न नमूं, जरि जावें लागलें हि मृत्युपथा " ।
त्यांनीं शिवलिंगाला, वाळूच्या करुनि घेतल्या शपथा ॥ २८ ॥

२८९ " नानाचा वंश स्वतां, पाळूं-ग्या करुनिया बहू यत्न ।
ऐसा विचार ठरुनी, यापरि केले तिहीं सकल प्रयत्न ॥२९॥

२९० दादा मोठा योद्धा, दुसरें खंबीर खड्गही त्याचा ।
यास्तव पुण्यांत कोणी, गडबड करण्या न तो धजे साचा ॥ ३० ॥

२९१ मुत्सद्दीमंडळ हें, कांहीं दिन खात मूग बसले जी ।
कांहीं उपाय न चले, योजावी युक्ति ती फसे जी जी ॥३१॥

( आर्या )

२९२ स्त्रैण तथा अविचारी, दादा होता ह्मणून दुष्कृत्यें ।
झालीं त्याजकडुन हीं, तत्फळ मिळलें तयाप्रती एथें ॥ ३२ ॥

२९३ कलहाग्नी द्विजनगरीं, पाहुन हैदर निजाम मानिं घाले ।
कर साधुनि घ्यावा तैं, म्लेंच्छांना आत्म-मानसीं आणिलें ३३

३९४ विप्रांचीं जीं ठाणीं, होतीं राज्यांत त्यांचिया तीं तीं ।
हुसकुन देउन सारीं, खैरपणें वागण्या यवन धजती ॥ ३४ ॥

३९५ यास्तव राघोबाला, निजपुर सोडुन अरिवरी निघणें— ।
झालें भाग निघे तो, करण्या शत्रूसवें बहून रणें ॥ ३५ ॥

३९६ राघोबा कर्णाटकिं, असतां मंत्र्यांस फावलें बरवें— ।
कारस्थान कराया, त्यांनीं केले प्रयत्न चालुं नवे ॥ ३६ ॥

३९७ बापू बोकिल फडके, नाना फडणीस ही असे त्यांत ।
बुद्धिप्रभाव येथुनि, नानांचा गाजलाचि जगतांत ॥ ३७ ॥

( युग्म )

३९८ अर्धा नाना फडणिस, विठ्ठल सुंदर निजाममंत्रि पुरा ।
देवाजि हिंगणे हा, दिल्लीचा वकिल ही असे दुसरा ॥ ३८ ॥

३९९ बापू बोकील तिजा, हा मंत्री पुण्यपत्तनीं होता ।
साडेतीन शहाणे, यद्वक्षा जगतिं गाजला होता ॥ ३९ ॥

४०० [ नाना फडणीसाचें, पूर्वीचें वृत्त सांगतों अल्प ।
मुख्य कथेला सोडुन, यास्तव माफीस द्या मला स्वल्प ॥४०॥

४०१ नानांचा वडिल मरे, पंध्राव्यावर्षिं तैं तया वसनें ।
मिळलीं फडणीसीचीं, अल्पवयीं काम हा तडीसहि ने ॥४१॥

४०२ कांहीं विकार याला, झाला यास्तव पुढें तपा गेला ।
केलीं तीर्थं यात्रा, नाना मग पुण्य-पत्तनीं आला ॥ ४२ ॥

४०३ बाळाजिपेशव्याची, भागी यावरि तदा बसे मर्जी ।
पानिपतीं रणगर्दी-मार्जी गवसे द्विजाति हा फर्जी ॥ ४३ ॥

४०४ जीव बचावुनि तेव्हां, गोसाव्याचें धरून रूप भला ।
आला पुण्याप्रती परि, तन्माता सांपडे गळीमाळा ॥ ४४ ॥

४०५ कांहीं दिन हे होते, खाजगिच्या कडिल कारकून बरे ।
फडणिस झाले पुढतीं, यद्यश गाजे जगांत सर्व खरे ॥ ४५ ॥

४०६ युद्धांत घाबरे हा, परि डोक्याचा पुरा असे विज्ञ ।
अक्कलयोगें हस्तकिं, सर्वहि नृप आणिले तदा क्षिप्र ॥ ४६ ॥

४०७ जबरा लेखक होता, कामाचा उरकही असे फार ।
ज्ञातृत्व दुजें धैर्यहि, बुद्धी त्याला असे बहु मखर ॥४७॥

४०८ सत्रा शैशीमध्यें, बदामि किल्ल्यास पेशवे वेढा– ।
देउन होते त्यांना, साह्या आला निजामही गाढा ॥ ४८ ॥

४०९ एके समयीं म्लेंच्छप, बक्षी बेगमसवेंच एकान्तीं– ।
असतां खिन्नान्त पुसे, ती त्याला कां उदास जी! चित्तीं ४९

४१० कांहीं नसे कमी मज, तरि नानापरि नसे दिवाण मला ।
याचें वाइट वाटे, यास्तव खिन्नत्व ये प्रिये मतिला ॥ ५० ॥

४११ दुसऱ्या दिनीं प्रभातीं, घेउन पत्रास[१] एकजण आला ।
देउन निजामकरिं तें, तेथुन तो चालतां त्वरें झाला ॥ ५१ ॥

४१२ "अपुल्या पदरीं नाहीं, मुज्ञ ह्मणुनि खिन्नचित्त कां असतां ।
आहें सेवक सादर, काम कथा करिन मी प्रभू आतां" ॥५२॥

४१३ "न धरा मनांत शंका, ज्या ज्या सेवेप्रती कथाल मला ।
ती ती करीन मी हो," हें पाहुन थक्क म्लेंच्छ तो झाला ॥५३॥

४१४ पत्नीस ह्मणे पाहा, "एकान्तांतील वृत्त हें सगळें ॥
नानास कसें कळलें," तेव्हां तिजलागिंही नवल झालें ॥५४॥

४१५ तेव्हां म्लेंच्छपतीनें, नानाला देउनी धनें वसनें ।
दिधला मदारुलमहा, किताब त्याला बहूत मानानें ॥ ५५ ॥

---

१ बडा मसलती.

४१६ श्रीमंतमतानें नें, बेटावरि आंग्ल एक मुत्सद्दी– ।
होता राहत पूर्वीं, आंग्लांची चांगली नसे सद्दी ॥ ५६ ॥

४१७ मेणे तीन भरूनी, त्याचें सामान नित्य येत असे ।
एकांतुन एके दिनिं, दारूसामान आणवी खासें ॥ ५७ ॥

४१८ ताम्रमुखें आणिविली, ताम्रा मेण्यांत घालुनी दारू ।
बंदुकिच्यासह आणी, नोहे हा काय घातकांत गुरू ॥ ५८ ॥

४१९ नानास वृत्त कळतां, दारूच्या थांबवून मेण्याला ।
आंग्लां निरोप धाडी, सत्वर यावें तुह्मीं कचेरीला ॥ ५९ ॥

४२० आल्यावर त्या पुसिलें, दारूसामान कां तुह्मी अणिलें ।
आंग्लें घाबरुनी तें, माफीस्तव नृपपदाप्रती धरिलें ॥ ६० ॥

४२१ आंग्लें पुस्तकिं लिहिलें, ' जोंवरि जीवंत हा असे नाना ।
कोणाचीही मात्रा, या राज्यामधिं कधींच चालेना ' ॥ ६१ ॥

४२२ मुख्य कथाभाग पुढें, स्वस्थमनें आयकोत वाचक हे ।
झालें विषयान्तर बहु, यास्तव पूर्वींच प्रार्थिलें आहे ॥६२॥ ]

## ( शिखरिणी )

४२३ जसा आला होता चतुर ह्मणुनी बापु उदया ।
नृपाळाच्या राज्यामधिं सदय जो माधव तया ॥
तसा नाना भानू तदनुजमृती नंतर नभीं ।
चकाकू लागोनी बहु निपुणता दाउन न भी ॥ ६३ ॥

## ( शार्दूल विक्रीडित )

४२४ राज्याच्यावर संकटें उसळुनी येती अरिष्टें अती ।
माजोनी समरें सुरक्षित-पणा सोडी स्वराज्याप्रती ॥
ऐशाही समयीं चतूर पुरुषें बाळाजिनें आपुली ।
राष्ट्रें दावुनि बुद्धिची प्रखरता तैं थक्क केलीं भलीं ॥ ६४ ॥

४२५ नाना आत्मकरीं सुकर्ण धरुनी राज्याप्रती चाळवी ।
तेव्हां शूर तमेंच वीर नृपती यांना अती वाकवी ॥
जे राजे द्विजनाशयत्न करिती सुस्नेह टाकूनिया ।
नेत्रीं घालुनि तेल (स्नेह) हा नृपतिंना हारीच आणी तया ६५

( स्रग्धरा )

४२६ राघोबा युद्ध द्याया चमुसह निघुनी हैदराच्या प्रदेशीं–।
गेला तैं भानुनें या मृतनृपवनिता ठेविली सुस्थळाशीं ॥
गंगाबाई सभोंतीं सबल जन दिले ठेवुनी राखण्याला ।
तन्नामें द्याहि राज्यीं फिरवुनि बघण्या राज्य तो सिद्ध झाला ६६

( आर्या )

४२७ तात्या हरिपंत दुजा, बापू बोकील आणखी नाना ।
राज्या त्रिवर्ग बघती, युक्ती योजून चांगल्या नाना ॥ ६७ ॥

( स्रग्धरा )

४२८ आतां भाऊवरी हा समय कठिण कीं पातला खास मोठा ।
मारूनी मागि राजा रघुपति मिळवी राज्य तो दुष्ट खोटा ॥
भाऊसाहेब पाही चकित निजमनीं होउनी दुःख मानी ।
तों दादा आणि नाना लिहिति चमुस तूं साह्य द्यायास आणी ६८

४२९ एका काळींच दोघां कडुन मदतिला मागणें जाहले जी ।
कर्णाटीं हैदराशीं रघुपति लढण्या मागतो साह्य आजी ॥
नाना हा व्युह जावो सुखरुप म्हणुनी भाउला साह्य याची ॥
झाली ही प्राप्त वेळा सुमति कुमति कीं पाहण्याला तयाची ६९

४३० भाऊंनीं क्लृप्ति केली अनुजसह चमू धाडिली पुण्यदेशीं ।
सेना घेऊन चाले रघुपति मदती-साठीं स्वारीच खाशी ॥
नाना आणीक दादा उभय निजमनीं राखुनी तुष्ट भाऊ ।
स्वामींचें कार्य सारी सकल रिपु जया मानिती थोर बाऊ ७०

( शार्दूलविक्रीडित )

४३१ काळाची गति चित्र ती किति पहा आतां स्वचित्तीं तुझी ।
जो भाऊ नृप माधवा मदतिला जाऊन जिंकी मही ॥
तो भाऊ रघुनाथ दुष्ट नृप हा या साह्य द्याया निघे ।
वेळा सत्कृति दुष्कृती करविते हें तत्व ध्यानांत घे ॥ ७१ ॥

( मंदाक्रान्ता )

४३२ ज्यांचीं खड्गें चमकति रणीं क्रमिती शत्रुमाना ।
त्या वीरांना रण त्यजुनिया यावया लाहि नाना ।
'गंगाबाईस्तवन करुनी साह्य स्वामीस व्हावें ।
नाहीं जात्ती लिहित अपणां योग्य जें तें करावें' ॥ ७२ ॥

( स्रग्धरा )

४३३ ज्यांना मोठा दरारा थर थरति रिपू पाहुनी यच्चमूला ।
त्या बाळाजा भट्टांच्या कुलि कलह अती एकि जाई लयाला ॥
नानांची बुद्धिमत्ता द्विजवर अमुच्या भाउचें बाहुवीर्य ।
या दोहोंच्या वरी तैं सकल नृपतिता राहि जाऊन स्थैर्य ७३

( आर्या )

४३४ लागे लक्ष जनांचें, गंगाबाईकडे पुरंदरिं हो ।
वैशाख शुद्ध सप्तमि, दिवशीं तिजला सुपुत्र नशिबें हो ॥ ७४॥

४३५ त्यानें नांव सवाई माधव ठेवूनि आणुनी वमनें ।
चाळीसाव्या दिवशीं, देवविली पेशवाइ नानानें ॥ ७५ ॥

४३६ दादाच्या पक्षाच्या, मंडळिला कैद करुनि नानांनीं ।
शिंदे होळकरांना, इतरांना कळविलें हि पत्रांनीं– ॥ ७६ ॥

---

१ राजदूत.

## ( आर्या )–राजांस पत्रें.

४३७ ‘ रघुनाथ बाजि यांचीं, पत्रें मानूं नगा कोणि कधीं ।
ते असति बंडवाले, नृपहन्ते त्याप्रती नसे बुद्धी’ ॥ ७७ ॥

४३८ ‘ त्यांना साह्य जर कुणी, देइल तर शासना करूं पाहां ।
सवाइ-माधव वारस, तच्चिंता मानसामधीं वाहा’ ॥ ७८ ॥

४३९ ‘ माधवनारायण हे, वारस यास्तव तया कडून पुढें ।
चालेल राज्य सगळें, द्याया साह्यास या तुम्ही इकडे’ ॥ ७९ ॥

४४० चाळिस हजार सेना, देऊन तैं त्यासवेंच नानांनीं ।
राघोबा-पक्षाला, मोडाया धाडिलें तयास रणीं ॥ ८० ॥

४४१ भाऊस गुप्त पत्रें, नाना धाडी लिहून व्हा साह्य ।
सवाइमाधव याचें, सिद्धी लागोंच न्या तुम्ही कार्य ॥ ८१ ॥

## ( पृथ्वी )

४४२ पुण्यांत असल्या यदा सुरुच धांदली जाहल्या ।
रघू रण पुरे करी परतवी चमू आपुल्या ॥
सवाइ नृप जन्मला म्हणुन धनी कळे भाउला ।
तशांत हरिपंत हा रघुशिं युद्ध द्याया अला ॥ ८२ ॥

४४३ बघूनि हरिपंत तो परशुरामभाऊ यदा ।
मनीं हरिख पावला रणसुरूहि झालें तदा ॥
त्वरें परशुराम हा रघुजिच्या कुपक्षाप्रती ।
त्यजून रघुच्यासवें रण संज कराया अती ॥ ८३ ॥

## ( स्रग्धरा )

४४४ तात्यालागीं मिळाले भटवर अमुचे भाउ पाहूनि भारी ।
दादाचे लोक आले झर झर मिळण्या खिन्न झाला भरारी ॥
दादाचा पक्ष नाहीं इसफ महमदें सांडिला मात्र जेव्हां ।
दोन्ही सैन्यें लढाया निकर करुनिया लागती फार तेव्हां ८४

( शिखरिणी )

४४५ अशोरीनैद्रानीं बहुत रण माजे उभयतीं ।
गुळीका मामाच्या हृदिं बसुन पावे मग मृती ॥
तशा रास्ते गंगाधरहि जखमा लागुन अती ।
पडे खालीं; भाऊ इसफतरीं खड्गा परिजिती ॥ ८५ ॥

( स्रग्धरा )

४४६ भाऊंनीं वार केला परि यवन नरा नाहिं तो लागला जी ।
आंगीं होतें तयाच्या चिलखत म्हणुनी तो सुटे म्लेंच्छ गाजी ॥
तद्वत् वामनाजी रण-समरिं अती शौर्य दावी अनीनें ।
भाऊंनीं आणि यानें बहु रघुचमुला धाडिलें स्वर्गतीनें ॥ ८६ ॥

( आर्या )

४४७ त्या दारुण युद्धामधिं, भाऊ आणीक वामनाजीची- ।
गांठी संबंध दिवस न, अन्य दिनीं ती पडे प्रभातीची ॥ ८७ ॥

४४८ राघोबा यापमर्गीं लघु चमु असतांहि फार धीरानें ।
लढला भाउचमूशीं, दाखविला हात चांगला त्यानें ॥ ८८ ॥

४४९ तात्यांच्याहि चमूची, गाळण केली बहूत दाट्यानें ।
झालें न साह्य दैवचि, यास्तव परते रघूजि दुःखानें ॥ ८९ ॥

४५० आरंभींच्या धैर्या, जर रघु सोडूनि धावला नमतां- ।
तर पारड फिरूनी, सर्वच आक्रांत जाहला असता ॥ ९० ॥

४५१ रघुनाथराव तेव्हां, समरमहीं त्यजुनि चालला पळुनी ।
लोकहि लागति पळाया, वेदर किल्ल्यास ये त्वरें करूनी ॥ ९१ ॥

४५२ राघोबा पळतांना, तात्यांनीं आणि भाउंनीं बघुनी ।
निजामअल्ली साह्या, घेउन तत्पृष्ठि चालले जवुनी ॥ ९२ ॥

४५३ वांटेत जात असतां, अल्लीनें घातला मधीं मोडा ।
'साह्यास येत नाहीं, मत्संबंधालागिं संप्रती तोडा' ॥ ९३ ॥

४९४ तात्या हिंमतीचे बहु, वदले यवनाप्रती तदा मानें ।
'आपण खुशाल परतां, नाहीं कांहीं फिकीर जाण्यानें' ॥ ९४ ॥

४९५ 'रावोबा अमुचाची, बाहिरिल तो नमेच दुस्मान ।
एकत्र होउं आम्ही, केव्हां तरि टाकुनीच अभिमान' ॥ ९५ ॥

४९६ 'विश्वासघात करितां, यास्तव याचा तुम्हांस मोबदला ।
देऊं खास मनीं हें, घेउन सोडून या चतूर चला' ॥ ९६ ॥

४९७ या समयोचित वचनें, म्लेंच्छाचो फार तें थिजुन गेला ।
तात्यास पदवि देउन, संगें साश्याल चालतां झाला ॥ ९७ ॥

(शार्दूलविक्रीडित)

४९८ दादा पोंचति बेदरास तिथुनी जाती वऱ्हाडा-कडे ।
पाठीलागती भाउ आणि हरिही ओलांडुनीया कडे ।
खोखो डाव असा प्रशस्त भरतीं रंगात येऊनया ।
वर्षें तीन संबंध चालुन पुढें दादा मिळाला तया ॥ ९८ ॥

४९९ तात्या भाउपरीच शूर अमुची हिंमत तयाचा भला ।
नानापासुनि खड्ग चालवुनि जो योद्धा असे गाजला ॥
त्या दादास पळवाया जरुदिनें लागूनि रंजीमही ।
तात्या आणि रघूस तें न पळण्या झाली पुरी ही मही ॥ ९९ ॥

४६० नेमाडाहून माळवीं रघु पळे तेथून कोट्याप्रती ।
ओंकोरेश्वर उज्जनीहून पुढें जाईच धारेप्रती ॥
दादाला सुत बाजिराव भितरा धारेमधीं जाहला ।
बापाच्यापरि जो पलायनपटू होऊनिया गाजला ॥ १०० ॥

( आर्या )

४६१ भाऊंनी तर पिच्छा, दादाचा पुरविला तदा भारी ।
मागोवयास साह्या, दादा जेथें तिथेंच ही स्वारी ॥ १०१ ॥

४६२ अमरपती तो ज्यापरि, द्विजहत्या करुनि पाठिशीं पाप- ।
लावुन घेउन नाचे, त्रिभुवनें भारीच पावुनी ताप-॥ १०२ ॥

४६३ त्यापरि राघोबाच्या, द्विज नृप हत्याच पाठिशीं लागे ।
भाऊच्या रूपानें, पळतां पळतां रघूपती भागे ॥ १०३ ॥

४६४ सर्व भरतखंडामधें, दादाची धिंड काढिली जेव्हां ।
त्राहि त्राही होउन, दशहत बसली रघूप्रती तेव्हां ॥ १०४ ॥

४६५ दादा पळतां पळतां, जाइ बडोद्याप्रती अगीं दुष्ट ।
तेथें साह्य न मिळतां, खंबायितें संपगावें ये नीट ॥ १०५ ॥

४६६ नापरगांवीं रघुचा, भाऊंनी फार नाश केला जी ।
दादास वाटलें तें, व्यर्थचि सजलों करावया आजी ॥ १०६ ॥

४६७ यापरि तोबा तोबा, होउनि उतरूनि नर्मदा नदिला ।
थोडें बहु हिंडुनि मग, आंग्लांच्या पाठिशीं रघू पडला ॥ १०७ ॥

**भ्रातृजवध व रघुपलायन नामक ५ वा भाग समाप्त.**

## भाग ६ वा.

[ आंग्लपराभूति ]

( स्रग्धरा )

४६८ दादाचा कंडु भाऊ जिरवित असतां भाउच्या बंधुवीरीं ।
त्यावेळीं एक मोठा गहजब उमळे लक्ष द्यावें चतुरीं ॥
दादाशीं वामनानें झगडत असतां सोडुनी आत्मप्राणां ।
तापी तीरास युद्धीं वरणनगारिला स्वर्गि केले प्रयाणा ॥ १ ॥

( आर्या )

४६९ हरिपंत आणि भाऊ, हिंदुस्थानांत पाहुनी रिपुंनीं ।
टिपू हैदर इतरीं, द्विजदेशीं घातली झडप त्यांनीं ॥ ३ ॥

४७० करविरप कहि इच्छा, करण्यालागीं प्रवृत्त जें झाला ।
कोन्हेर पांडुच्यासह, तन्नाशास्तव तुटूनि वरि पडला ॥ ३ ॥

४७१ तेव्हां दोघांमध्यें, तह ठरुनी हैदरावरी वीर ।
ते पटवर्धन निघती, दावाया आपुला प्रभाव खर ॥ ४ ॥

४७२ पादाति आणि स्वारहि, रिपुचे होते असंख्य या समरीं ।
द्विजसेना लघु ह्मणुनी, लागे कच खावया रणीं भारी ॥ ५ ॥

४७३ पटवर्धनवीरांनीं, तरि मागें नाहिं घेतला पाय।
अपुलीं पथकें घेउनि, निघती रिपुला करावया घाय ॥ ६ ॥

४७४ सावशिकमडोळीला, झालें सुरु युद्ध तें उभयतांत ।
सत्रासस्याहत्तरिं, काटाकाटीस होइ सुरुवात ॥ ७ ॥

( स्रग्धरा )

४७५ साहा हाजार होते पदग हयगही पांच हाजार होते ।
तोफा होत्या नऊ त्या रिपुकडिल असें सर्व सामान होतें ॥
योद्धा मोठा टिपू तो जनकहि तसचा शूर याद्धा असोनी ।
होते सर्दार तैसे द्विजचमु ह्मणुनी फार जाई मरोनी ॥ ८ ॥

( आर्या )

४७६ कोन्हेरराव यांना, लागुनि छातींत गोळि ते पडले ।
पाहुनि पांडूरंगहि, सारुनि दुःखा रणांत सरसरले ॥ ९ ॥

४७७ चालू केली त्यांणीं, भाल्याची फेंक शत्रुचमुमाजीं ।
टोंचुनि कितीक रिपुचे, यमसदनीं धाडिले यवन गाजी ॥ १० ॥

४७८ कुमुदान महमदानें, त्यांच्या पाठींत मारिला भाला ।
मस्तकिं तरवारीचा, घाव करुनि पाडिलें रणीं त्याला ॥ ११ ॥

४७९० श्रीपत मोरेश्वर हा, पाठीमध्येंच लागुनी गुरजा ।
रणभूमीवरि पडला, सोडुनि दुःखाप्रतीहि संसृतिजा ॥ १२ ॥

४८० वासुदेवा अरिनें, पांडोबालाहि धरुनिया नेलें ।
पैकीं पांडोबा हे, बंकापुरिं प्राण सोडिते झाले ॥ १३ ॥

४८१ कोन्हेर शवाचा त्या, शवराशीं-मधिं ठिकाण मुळिं नव्हता ।
शोधुनि चौथे दिनशीं, अग्नि दिला त्या रणांगणांत मृता ॥१४॥

४८२ पटवर्धन बहु पडतां, झाला आक्रांत सर्व पृतनेंत ।
ही वार्ता गृहिं कळतां, झाले दुःखार्त सर्वही आप्त ॥ १५ ॥

४८३ त्यांच्या विधवा अबला, पोरवडाही तसा तया होता ।
त्यांचा भार समस्तहि, पडला भाऊवरीच हो आतां ॥ १६ ॥

४८४ टिप्पू हैदर यांचें, उसनें फेडूनि भाउंनीं त्यांना ।
नेत्रांतुन जल भारी, आणविलें वाकवूनिया माना ॥ १७ ॥

४८५ वार्धक्यीं भाउवरी, दुःखाचा हा गिरीच कोसळला ।
न त्यजी धैर्य परंतू, दुःखानें भाउ फार आरडला ॥ १८ ॥

४८६ [ एके समयीं मितऱ्या, बाजीनें भाउच्या जहागिरिला– ।
जप्त करावें ऐसा, मानसिं संकेत पाजिनें अणिला ॥ १९ ॥

४८७ तें जाणुन भाऊंनीं, बाजीला मेजवानि एक दिली ।
आले जेवायाला, नृपव्यवस्था तदा बरी केली ॥ २० ॥

४८८ भोजन झाल्यानंतर, बाजी प्रासादिं जावया निघती ।
येउन दरवाजाशीं, तथें पडत्रीकडे तदा बघती ॥ २१ ॥

४८९ अठरा पानीं अठरा, विधवा घालूनि खालतीं माना ।
अश्रू गाळित भोजन, बाजीनें पाहिलेंच करितांना ॥ २२ ॥

४९० हें काय असें पुसिलें, बाजीनें परशुरामभाऊला ।
'तुमच्या राज्यासाठीं, यांच्या पतिनीं रणीं असू दिधला' २३

४९१ ' या जाहगिरीवरतीं, इतक्यांचें अन्न चालतें पाहा ।
करणार जप्त तर विभु, समर्थ तैसें दयाळुही आहां' ॥ २४ ॥

४९२ हें एकुन बाजीनें, सोडुन दिधलाहि बेत जप्तीचा ।
पटवर्धननिष्ठा कसि, स्वामीवरि दाखलाच ये साचा ] ॥ २५ ॥

( स्रग्धरा )

४९३ दादासाहेब मुंबापुरिस झडकरीं जाउनी इंग्लिशांशीं ।
सल्लेंचार्चे बोलणें ते करिति जर मला राजता घाल खाशी ॥
राज्याचे दोन आणे तर नजर तुह्मां खास देईन त्याला—।
घेऊनी साह्य व्हावें ह्मणुनि रघुपती बोलतां त्याशि झाला २६

( शार्दूलविक्रीडित )

४९४ साष्टी आणिक मुंबई जवळच्या बेटांस कांहीं तसे ।
गुजराथेंतिल प्रांत आणि वसई द्यावें ठरे तें असें ॥
दादाचा धरुनि कुपक्ष लढती ते पेशव्याशीं अती ।
आंरासीं हरिनें तयांस चुरतां सल्ला करूं इच्छिती ॥ २७ ॥

( आर्या )

४९५ झाला पुरंदरीं तह; सत्रा श्याहात्तरीं ठरे त्यांत ।
' आंग्लीं रघुपक्षाला, सोडुन जावेंच आपुल्या पुरिंत ' ॥२८॥

४९६ मुंबइ सरकारावर, ब्रह्मघ्ना राघवा तुह्मी साह्य ।
कां दिधलें ? ठपका ये, ह्मणुनी ते राहिलें तसें कार्य ॥२९॥

---

१ माम विशेषात.

४९७ कांहीं दिन गेल्यावर, आंग्लांनीं घेतला पुनः पक्ष ।
आणि जवानें लढती, त्या दिसली नाहिं नीति प्रत्यक्ष ॥ ३० ॥

( स्रग्धरा ).

४९८ नाना फ्रेंचांस घेई वळवुन अपुल्या बाजुला आणि झुंजे ।
युद्धें चालू जहालीं हळु हळु झळकूं लागती शूर तेजें ॥
मॅके गोदर्द तैसें समरमहिवरी फाकड्या इष्टुरानें ।
प्राच्यांना दाखवीली समर-कुशलता झुंजुनीया दमानें ॥ ३१ ॥

४९९ तेव्हां पौरात्य खङ्गा परजविति झणीं जिंकण्या आंग्ल मस्त ।
नाना श्रीमंत राजे लघु ह्मणुन वघे राज्यसत्ता समस्त ॥
त्यानें भाऊ तुकोजी धुळप व फडके आणखी पाटलाला ।
झुंजाया धाडिलें तैं चकमकि झडुनी आंग्ल जेरीस आला ॥३२॥

( शार्दूलविक्रीडित )

५०० घेऊनी पनवेलिहूनि पृतना गोदर्द येण्या निघे ।
आला खोंपवलीस तों चमकती शिंदे तिथें तो बघे ॥
तोफा घेउन पोंचला धुळपही रास्त्यासवें संगरीं ।
घाटाखालिं अरीसवें धुळप तो झुंजे तदा सत्वरीं ॥ ३३ ॥

५०१ तात्या होळकरादि अन्य धरिती सह्याद्रिटोंकांप्रती ।
आंग्लाच्या रसदी न पोंचुं दिधल्या त्या भाउनें संप्रती ॥
घाटाच्या-मधिं सैन्य घेउन अती भाऊ उभा राहिला ।
केली बंदचि वाट आंग्ल रिपुची तैं आंग्ल कोमेजला ॥ ३४ ॥

५०२ मॅके जो पनवेलिहूनि रसदी आणीत होता निशीं ।
भाऊ घालुनि त्यावरी झडप तैं ठोकी अती त्याजशा ॥
म्यॅकेच्या रसदीस दारुस तसें गोळ्यांसही नाशिलें ॥
मॅकेही लढला परंतु जिरला कंडू यदा जिंकिलें ॥ ३५ ॥

( आर्या )

१०३ झाली रात्र तदा ते, खोपवली लागिजावया निघती ।
मॅके हळू हळू तें, गोदर्दालाहि जाउनी मिळती ॥ ३६ ॥

( स्रग्धरा )

१०४ देऊनी ब्राऊनाला सकल हयग ते आणि दाहाच तोफा ।
गोदर्दें तीन त्याला नवीन पलटणें, तो निघाला झपापा ॥
भाऊ घाली तयाच्या-वरि झडप जवें बैल त्याचे धरून ।
त्यानें केले रवाना सकल हरिकडे आंग्ललोकां जितून ॥ ३७॥

१०५ आंग्लांनीं शौर्य केलें परि परशुधरें दुर्दशा फार केली ।
कित्येकां ठार केलें कितिक जखमिही आननें शुष्क झालीं ॥
आंग्लांनीं आणखीही कुमक अणविली मुंबई बंदरून ।
तीही भाऊ पुढें तैं सकल चमु तदा गेलि हो भेदरून ॥ ३८ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१०६ डेरे सर्वहि आपुले हरुनिया त्या राहुल्या जेधवां ।
नेल्या बंदुकि फार गाळण उडे गोदर्दची तेधवां ॥
तेव्हां त्यास गमे पुणें-नगरिला जाणें नव्हे शक्य तें ॥
मागें काढुनि जाहले पद तदा मुंबापुरीं चालते ॥ ३९ ॥

( आर्या )

१०७ गोदर्द कर्नलानें, मोठ्या तोफा समस्त बुणगें ही ।
खंडाळ्याहुन दिधलें, खोपवलीलागिं धाडुनी पाहीं ॥ ४० ॥

१०८ कांहीं त्रास न पडतां, चवथे दिनिं पावलें हि खंडाळा ।
गोदर्द धीर येउन, तिकडे जाण्यास चालता झाला ॥ ४१ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१०९ गेले आंग्ल न कारल्यापुढतिं तों तात्या तयांच्यावरीं ।
घाली झाप लुटून फस्त हरि तो गोळ्या तयांच्या करीं ॥
बाराच्यावरि एक वाजुन जरी गेला तरी चाललें ।
होतें युद्ध तदा सुताम्रमुख ते अत्यंत भांबावले ॥ ४२ ॥

११० तात्या मागुनि त्रास देति पुढुनी भाऊ तसा देतसे ।
झाले त्रस्त समस्त आंग्ल रिपु ते होऊनि सारे पिसे ॥
होता त्यासमयीं तुंका कुसुरडें[१] घाटाकडे तो स्वतां ।
आंग्लांना फिरकूं न देइ तिकडे, भीती तया पाहतां ॥ ४३ ॥

( शिखरिणी )

१११ अशा पंचामाजीं करनल पडे तों मदतिला ।
तयालागीं धाडी अधिपति स्तुअर्टा जनरला ॥
असे हा सद्योद्धा जवळ शिकलेलीं पलटणें ।
प्रवीरें येऊनी झडकरिं सुरू केलिहि रणें ॥ ४४ ॥

( स्रग्धरा )

११२ गोळ्या सोडावयाला झर झर झर तैं लागतांनाच सारी ।
भाजे सेना द्विजाची जंबर करिति ते अग्निचा मार भारी ॥
युद्धाचा रंग सारा बदलुन सकला वाटलें आंग्ल गाजी ।
आतां युद्धांत लाभे जय अनलिं अरी भाजुनी सर्व आजी ॥ ४५ ॥

( आर्या. )

११३ रास्त्यानें भुळपानें, होळकरानेंहि आपली सगळी ।
होती नव्हती तितकी, शिकस्त केली परी वृथा गेली ॥ ४६ ॥

---

१ होळकर.

## ( शार्दूलविक्रीडित )

११४ झाले सर्व हवालदील समरीं निस्तेजता आननीं ।
आतां खास जळून सर्व मरतों सर्वांस वाटे मनीं ॥
होतें पोंचत मोदवृत्त परि तें नानाप्रती यापुढें ।
नाहीं वृत्त पुरंदरास कळलें कोड्यांत नाना पडे ॥ ४७ ॥

११५ नाहीं इंग्रज युद्धिं आटपत हें ऐकून नानाऽऽननीं ।
बापूच्या वदनींहि पाणि पळुनी दुश्चित होती मनीं ।
संगें तोफ बरीच देउन झणीं तो पानशा संप्रती ।
नाना धाडि वदे ' कसेंहि करुनी जिंकाच आंग्लांप्रती ' ॥ ४८ ॥

११६ डाकाही सुटती झरांझर तदा त्या बोरघाटाहुनी ।
येती सत्वरिं हो पुरंदरिं तशा तेथून जाती रणीं ॥
गेले घाबरुनी पुण्यांतिल तसे अन्यत्रही लोक हो ।
हाहाकार चहूंकडे उसळला प्रत्येक दुश्चित्त हो ॥ ४९ ॥

११७ जाते सर्वहि पेशवाइ बुडुनी आक्रान्त होतो झणीं ।
येतो काय पुढें प्रसंग कसला हा प्रश्न सर्वां मनीं ॥
तैं गाशा किति आपुला जलदिनें गुंडाळुंही लागले ।
ब्रह्मघ्ना रघुला यशास मिळतें ऐसें जना वाटलें ॥ ५० ॥

## ( आर्या )

११८ होऊंनये स्त्रियांचा, छल हूणांच्या-कडून तो पुढतीं ।
शनिवारप्रासादीं, तृण भरण्या हुकुम तेधवां सुटती ॥ ५१ ॥

११९ उपभोग्य वस्तुच्यासह, प्रासादाचा विनाश नानास- ।
वाटे योग्य परंतू, आंग्लांनीं पाहणें नको त्यांस ॥ ५२ ॥

१२० [ हल्लीचे मर्द बघा, मॅडम फॅशन करून अबलेला ।
हूणांस भेटण्याला, जाती सोडून सर्व लज्जेला ॥ ५३ ॥

१२१ ' टुमची स्ट्री सुंदरि ' ह्या, आंग्लमुखींच्या श्रवूनि वाणीला।
हल्लींच्या मर्दाला, वाटे स्वर्गांप्रती पितर गेला ॥ १४ ॥

१२२ या पेक्षां नीच कृती, करिती सोडूनि स्वाभिमानाला ।
यास्तव आर्य- जनाला, दास्यत्वाचा प्रसंग हा आला ॥ १५ ॥

१२३ द्रौपदि रुक्मिणि यांचें, स्त्रीशिक्षण आणि वागणें कोठें ।
हल्लींच्यांचे कोठें, आहे अन्तर तयांमधीं मोठें ॥ १६ ॥

१२४ हल्लींच्या युवति बघा, नायकिणींच्या करून नकऱ्याला ।
पतिहुन अन्य नराला आगमनीं घालिती कुसुममाला ॥ १७ ॥

१२५ गेलों दूरच वाहत, माफि करा क्रोध दूरही टाका ।
मुख्य कथा कथितां मी, होउनि स्वस्थान्त संप्रती ऐका] १८

१२६ औदासिन्य पुण्याला, सभोंवतालीं तसें तदा आलें ।
धामधुमी सुरु झाल्या, खिन्नत्वें स्थान आपुलें दिसलें ॥ १९ ॥

( भुजंगप्रयात )

१२७ चला बोरघाटांत जाऊन पाह्या ।
लढाया जिथें माजल्या थोरल्या ह्या ॥
यदा पानशांचा अला तोफखाना ।
नवें धैर्य आलें मराठीचमूंना ॥ ६० ॥

१२८ झरांरा करांच्या करें अस्तन्याला ।
वरी सारुनी घेति हस्तीं असीला ॥
तुकोजीपरी शूर माहादजीही ।
घुसायास आंग्लीं निघालेत पांही ॥ ६१ ॥

( स्रग्धरा )

१२९ भाऊ आणीक तात्या धरिति न परवा जीविताची मुळींच ।
सेनाग्रीं होउनीया वरहायें बसुनी मारिती त्यास टांच ॥

दैवानें या द्विजांना अनुकुल समिरें साह्य केलें तशांत ।
यांच्या मागून वाह यवनमुखि बसे सप्प सप्पा प्रवात ॥ ६२ ॥

१३० वाऱ्याचें साह्य झालें सहजचि चमुला पेशव्यांच्या अपारु ।
आंग्लांना सोसवेना समुर पवन तो आननीं फार मार ॥
या वायूनें द्विजांना मदतकरुनिया धैर्य देतांच तात्या ।
लावोनी मोठ मोठा चमुप्रति वदला बक्षिसें तो तदां त्यां ॥ ६३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१३१ " दावा हात रणांत इष्टुरं तुम्ही पाडाल तेव्हां खरें ।
झालें सार्थक अन्नवस्त्र विभुनीं तुम्हां दिल्याचें बरें ॥
होईना जर हें तरी सकलिका धिःकार सर्दारिला ।
तर्वारीस तसाच पौरुषगुणा " तात्या पुनः बोलला ॥ ६४ ॥

१३२ " हे ताम्रानन काय आणि अमुची त्रेधा उडावी अती ।
दावा मर्दुमकीस संधि बरवी ख्याती करा संप्रती ॥
श्रीमंतप्रभुची कृपा मिळविण्या हा योग आला भला ।
आंग्लां जिंकुनि कीर्ति आणि दुसऱ्या पावाल संपत्तिला " ६५

( इंद्रवज्रा )

१३३ " ह्या कारल्याच्या समरांत लावा ।
कीर्तिध्वजा शौर्य अरीस दावा ॥
भीऊं नका दैव तुम्हांस साह्या ।
द्याया असे सिद्ध असीस घ्या ह्या " ॥ ६६ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१३४ वीरश्रीजनकें अशा सुवचनें आवेश आला तया ।
खड्गा सावरुनी पुढें चमु घुसे आंग्लांस मारावया ॥
तोफा चालुंच जाहल्या धडधडा हाणा चिरा शत्रुला ।
ऐसा भैरव नाद तेथ पसरे संग्राम हा माजला ॥ ६७ ॥

१ मोठा वारा.

## ( शार्दूलविक्रीडित )

९३५ शिंदे-होळकरादिकीं अरिवरी चालून जाऊनिया ।
गोळ्याचीं अतिवृष्टि केलि यवनीं भाजून मारावया ॥
तैं भाऊ चमु आपुली झडकरीं सर्वांपुढें नेउनी ।
तोफांना सरबत्ति देउन अरी रंजीस आणी झणीं ॥ ६८ ॥

९३६ सव्वालाख चमू द्विजातिपतिची तोफेस तोफा भल्या ।
लागोनी रण माजलें अरिवरीं गोळ्या सुटूं लागल्या ॥
धूम्रानें सकला दिशा भरुनिया अंधार चोहींकडे ।
झाला त्यांतच वातहीं मिसळुनी आंग्लास मारी खडे ॥ ६९ ॥

९३७ शब्दांनीं मग धाड धाड सगळ्या दिङ्मंडळा व्यापिलें ।
पक्षी धावति भीउनी चहुकडे घेऊनि संगें पिलें ॥
जैशा शा[1]रद दुर्दिनीं चमकती आकाश-मार्गीं विजा ।
तोफा सोडिति तैं तशाच दिसती ज्वाला दिसे ती मजा ॥७०॥

## ( स्रग्धरा )

९३८ झंझावातें रिपूची गडवड उसळे, सैन्य अंधार-योगें ।
श्रीमंताचें किती, हें मुळिं नच समजे आंग्ल घे पाय मागें ॥
आहे सेना किती हें तरुवर बसुनी पाहतां मुख्य झाला ।
गोलंदाजास तात्या कथि "लगव बच्चूं आंग्लमुख्यास टोला" ७१

## ( शार्दूलविक्रीडित )

९३९ त्यानें योग्य निशाण घेउन जवें गोळा तदा सोडिला ।
वृक्षाग्रासमवेत आंग्[3]ल पडला प्राणान्तही जाहला ॥
शिंदे होळकरादिकीं करपदां ज्याच्या मुळें गाळिलें ।
ते हे इट्टुर फाकडे त्यजुनिया युद्धा वरीं चालले ॥ ७२ ॥

९४० ज्यांची युद्ध-विशारदा सु-पृतना विप्रांस भंडावची ।
ज्याचें 'फायर' झाडणें जबर जें धीराप्रती टाकवी ॥

१ शारदतूंतील. २. आभ्राच्छादित दिवशीं. ३. रट्टू घटे.

होती लागलि पेशवाइ डुलुही यत्क्षात्र-तेजामुळें ॥
ते हे इष्टुर फाकडे त्यजुनिया युद्धा वरीं चालले ॥ ७३ ॥

६४१ नाना आणिक भाउही डळमळे भित्र्याजनासारखा ।
लोकांलागिं पुण्यास आणि गडच्या भासे यमाचा सखा ॥
ज्याला मर्द किताब योग्य मजला वाटे, रणीं भागले ।
ते हे इष्टुर फाकडे त्यजुनिया युद्धा वरीं चालले ॥ ७४ ॥

( इंद्रवज्रा )

६४२ जातांच देहांतिल प्राण सर्व ।
हो चेतनाहीन तसा निगर्व ॥
ताम्राननांच्या चमुची तशीच ।
झाली स्थिती त्या समयास साच ॥ ७५ ॥

६४३ कोणी पळाले दडले कितीक ।
मेले किती दाद नसे असंख्य ॥
गोदर्दला लागति तीन गोळ्या ।
मुर्च्छीत होऊनि पडे धरेला ॥ ७६ ॥

( स्रग्धरा )

६४४ अठ्ठा गोरे निमाले यवन-चमुपती ठार झाले रणान्तीं ।
अठ्ठेचाळीस काळे जन अधिक तयीं चारशें स्वर्गि जाती ॥
ऐसें लाभे चमूंना यश, सकळ कळे राजधानींत वार्ता ।
झाले सानंद सारे टवटवति मुखें, सौख्य झालें समस्ता ॥ ७७ ॥

( आर्या )

६४५ [ जेव्हां स्तुअर्ट येउन, लागे द्विजसैन्य डागण्याप्रति तें ।
तेव्हां नाना बापू, श्रीमंताजवळ बैसले होते ॥ ७८ ॥

१४६ निद्रित माधव होता, जागा होऊन पाहतां दिसलें ॥
नाना आणिक बापू, मंत्रिद्वय खिन्न होउनी बसले ॥ ७९ ॥

१४७ 'कां खिन्न तुह्मी आहां ?' बालनृपानें असें तयां पुसिलें ।
'इंग्रज नोटोपे प्रभु, बसलों खिन्नान्त' बापुनें कथिलें ॥ ८० ॥

( युग्म )

१४८ 'काय यवन नाटोपें ?' वदुन असें खड्ग एक मागविलें ।
राहुनि पर्यंकि उभें, राजा माधव सवाइनें कथिलें- ॥ ८१ ॥

१४९ तें खड्ग तीन वेळा, फिरवुन भोंताऌि आपुल्या वेगें ।
'इंग्रज ठारचि झाला, शिल्लक सेना पळावया लागे' ॥ ८२ ॥

१५० इतक्यांत बोरघाटां-तून तदा डाकही तशी आली ।
तोफा मोदद सुटुनी, सैदोनांनीं पुरीहि गजबजली ] ॥ ८३ ॥

( भुजंगप्रयात )

१५१ पुढें होउनी आणखी कांहीं युद्धें ।
अखेरीस केलें तहाला विशुद्धें ॥
महादाजि शिंदा असे विद्यमान ।
पहा लाभला तो किती थोर मान ॥ ८४ ॥

( आर्या )

१५२ जो प्रांत इंग्लिशांनीं, पुरंदराच्या तहापुढें स्व-करीं ।
ताब्यांत घेतला तो, विप्रांला आंग्ल सर्व परत करीं ॥ ८५ ॥

१५३ सल्ह्यांत पुरंदरच्या, आंग्लांना प्रांत जो दिला होता ।
लाखांचा तीन तया, आंग्लीं मागूंनये ठरे आतां ॥ ८६ ॥

१५४ राघोबा पक्ष पुनः, घेउन आंग्लीं कधीं न मांडावें ।
खर्चास राघवाच्या, प्रतिमासीं पावलक्ष धन द्यावें ॥ ८७ ॥

१११ कांहीं दिन गेल्यावर, कोपरगांवीं रघू मरण पावे ।
कलहाग्नी शमला मग, राज्यहि सर्वत्र शांतता पावे ॥ ८८ ॥

११६ कृत्या आनंदी ही, वर्षांनीं कांहिं पावली मरण ।
पुत्रत्रयास त्यांच्या, नाना ठेवी गडांत नेऊन ॥ ८९ ॥

**आंग्लपराभूति नामक ६ वा भाग समाप्त.**

---

## भाग ७ वा.

### [ टिप्पुसंग्राम ]

### ( स्रग्धरा )

११७ राघोबा पत्निसुद्धां यमपुरिस यदा चालतां जाहला हो ।
तेव्हां लाभे प्रजेला बहुत समय तो शांततेचा चि लाहो ॥
भाऊचें खड्गही तें समर त्यजुनिया कांहिं घ्याया विसावा ।
आरामें राहिलें तें निजगृहिं पडुनी, लाभलें सौख्य सर्वा ॥१॥

### ( आर्या )

११८ सन् सत्राशें शैशित, सवाइ-माधव-विवाह नानानें-।
केला पुण्यनगरिला, सकल नृपा बोलवून थाटानें ॥ २ ॥

११९ अन्नाची अतिशांती, अति झाला दानधर्म या लोकीं ।
अति थाटमाट वैभव, अति अतिमोठा समाज जमला कीं ॥३॥

१६० काश्मीरनृपापासुन, मद्रनृपाळासमेत सकल नृप ।
सर्दार सर्व जमले, सवाइ राजास पाहण्या सकृप ॥ ४ ॥

१६१ गजबजली पुण्य-पुरी, गुढिया तोरण समस्त नगरांत ।
मोदें विवाह झाला, दुंदुभि झडले पुरींत दिनरात ॥ ५ ॥

१६२ यापरि नानाची तैं, निर्विघ्नच कारकीर्द सुरु झाली ।
प्रतिकूल न कोणि तया, नानाची पोळि चांगली पिकली ॥६॥

१६३ मोठ्या चातुर्यानें, बापूचा फितुर पकडुनी त्याला ।
सिंहगडावर टाकीं, नाना ऐसा प्रकार तें झाला ॥ ७ ॥

१६४ बापूनें मित्रद्वय, मोरो फडणीस बाळदिक्षितही ।
नगरीं[१] रायगडीं त्या, ठेवुन केली सुशांत सकल मही ॥ ८ ॥

१६५ सिंहगडाहुन बापू, नाना ठेवी प्रतापगडिं त्याला ।
तेथुन रायगडावर, ऐशा कष्टांत बापु तो मेला ॥ ९ ॥

१६६ यायोगें निष्कंटक, नानांनीं चालवून राज्याला ।
बसविलि छाप चहुंकडे, कोणी शत्रू न राहिला त्याला ॥१०॥

१६७ भाऊच्या पथकांतिल, सेना विश्रांति घ्यावया सगळी ।
कांहीं दिन गेली जों, तों टिप्पू फोडि एक डरकाळी ॥ ११ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१६८ त्राहि त्राहि करी समस्त विषया जो माधवाच्या बऱ्या ।
पावे हैदर मृत्यु तों टिपु बसे राज्यासनीं त्याचिया ॥
त्यानें या नवविप्रराजविषयीं आक्रांत मांडोनिया ।
घोरानर्थ सुरू करून त्यजिली चित्तांतली सद्दया ॥ १२ ॥

१६९ मागें खंडणि हक्कदार सुजना पासून जास्ती टिपू ।
सल्ला मोडि बदामिचा नविनही, प्रत्येक लागे लपू ॥
हल्ला तो नरगुंदि एक करुनी सौंदर्यवल्ली-वरी ।
तत्कन्येवरि शाप घालि पशु हा ती भ्रष्ट तेव्हां करी ॥ १३ ॥

१७० वत्सांना अचलास त्रासवुनिया काबूल-दुर्गामधीं ।
ठेवी कैदित आणि खेचि सचिवा काळोजिपंता[२] कुधी[३] ॥
टिप्पूनें नरगुंदच्याच न नृपा तैसेंच भंडाविलें ।
सर्वा हिंदुजनांस त्राहिकरुनी लोकांप्रती कांपिलें ॥ १४ ॥

---

१ अहमदनगरांत २ हा नरगुंदकराचा कारभारी. ३ दुर्बुद्धी ( टिप्पू. )

( अनुष्टुप् )

१७१ चांदी ब्रह्मसमूहाची ।
दुष्टानें मांडिली खरी ॥
एका हातिं कुराणा घे ।
अन्यीं समशेर घे बरी ॥ १५ ॥

१७२ धरावें ब्राह्मणालागीं ।
ठोकावें असुडें तया ॥
सुंता करूनि गोमांसा ।
तोंडीं घाली नसे दया ॥ १६ ॥

१७३ 'अब्रह्मण्यं' असा नाद ।
घुमला सर्वदेशिं जैं ॥
ज्यालागीं जी दिसे वाट ।
तो तिनें धावलाचि तैं ॥ १७ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१७४ झाले भ्रष्ट कितीक भूसर किती त्या शापितीही तईं ।
जिव्हा हासडुनीहि प्राण दिधले विप्रीं हजारीं द्वयीं ॥
पातिव्रत्य न हें टिकेल गमुनी कित्येक नारी तदा ।
कावेरीमधिं घालिती धडदिशीं तो टिप्पु त्रासी यदा ॥ १८ ॥

१७५ कांहीं विप्र पळून येउन पुण्या त्या माधवाच्या घरीं ।
मोठा हंबरडाच फोडिति तदा साह्या चला सत्वरीं ॥
ऐसें याचिति ऐकुनी सकल तें कांटा उभा राहिला ।
चावूं म्लेच्छप पेशव्यास गमले किंवा गिळूं टिप्पुला ॥ १९

( स्रग्धरा )

१७६ नाना क्रोधांध झाला मग परशुधरा बोलला " खड्ग घे घे" ।
भाऊ आणीक तात्या द्विजनरपतिंचे नाकिंचे बाल दोघे ॥

नानाची भिस्त होती बहु परशुधरीं तोहि योद्धा असूनी ।
विश्वासू आणि मोठा समरपटु असा भाउ होता इमानी ॥२०

( मंदाक्रान्ता )

१७७ भाऊ आहे तर सकलही पेशवाईहि आहे ।
भाऊ आहे तर सचिव हा मुख्य नानाहि आहे ॥
भाऊ आहे तर नरपती हा सवाईहि आहे ।
भाऊ आहे तर सकल हें सर्व कांहींहि आहे ॥ २१ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१७८ ऐसें होउन सर्व भाउवरतीं येऊनि बोजा पडे ।
आज्ञा घेउन तो निघे झडकरीं जायास टिप्पूकडे ॥
शिंदे होळकरादि सर्व निघती कर्णाटकीं जावया ।
त्यांना साह्य निजामही जलदिनें लागे तदा यावया ॥ २२ ॥

( स्रग्धरा )

१७९ नाना आंग्लांस मागे मदत परि तदा ते पहाती तमाशा- ।
कैसा होतो दुरूनी स्व-विषयिं बसती व्यर्थ मारीत माशा ॥
लावोनी सुव्यवस्था सकळ नृपचमू घेउनी खास नाना ।
भाऊलागीं मिळोनी अरिस शमविण्या योजिती युक्ति नाना २३

( शार्दूलविक्रीडित )

१८० झालें सैन्य समस्त एक मग तें हल्ला बदामीवरी ।
सत्रा शैंशित मे मधील नवव्या नामी दिनीं हो करी ॥
ती मैदानिं पुरी असोनि तिजला भोंतीं असे सत्तट ।
मध्यें मध्य गढी असोनि परिखा होती अति राकट ॥ २४ ॥

( आर्या )

१८१ होते बळकट किल्ले, मुख्य गडाच्या दुहींहि बाजूस ।
मुख्य गडामधिं अरि जर, शिरला तर सांपडेच पळण्यास ॥२५

१८२ पटवर्धन फडक्यांच्या, लोकांनीं चालवून तोफांला ।
तटबंदी फोडाया, त्यांनीं सुरु यत्नही तदा केला ॥ २६ ॥

१८३ शिंदे होळकरांची, फौजहि निकरेंच फायरा झाली ।
तेव्हां अंतःस्थ जना, वाटे आली यमाजिची धाडी ॥ २७ ॥

१८४ द्विज-सेनानी यापरी, विंशति दिन दांत ओंठ खाऊन ।
लढले परंतु नाहीं, पडले किल्ल्यास छिद्रही जाण ॥ २८ ॥

१८५ द्विजचमु तत्पति तेव्हां, गडबडुनी फार फार गेले जी ।
किल्लेदारें आंतुनि, तोफा सोडूनि चालविलि आजी ॥ २९ ॥

१८६ दोन्हीकडची जनता, भाजुंनि स्वर्गा पटापटा गेली ।
घेण्या अन्य गडांना, होळकराची चमू तदा गुतली ॥ ३० ॥

१८७ निजाम कारण सांगुन, गेला नगरास आपुल्या वेगें ।
सेना ठेवी साह्या, ती लढली मात्र त्याचिया मागें ॥ ३१ ॥

१८८ शिंद्याच्या सरदारा, तैसें द्विजपाचिया तया समयीं ।
किल्ला लढणें पडला, शस्त्रांची चालली टिपुरघाई ॥ ३२ ॥

१८९ तट फोडाया नचले, यत्न म्हणुनि लाविल्या शिड्या त्याला ।
भित्तीस वीस मेच्या, वरती चढण्यास यत्नही केला ॥ ३३ ॥

१९० पस्तिस हजार सेना, रिपु-दुर्गांतून भिंतिवर आली ।
सेना शिड्यावरून ती, यांना लोटावयाप्रती झटली ॥ ३४ ॥

१९१ किल्याभोंवतिं बुधले, दारूचे जागजागिं पुरवून ।
देतां बत्ती त्यांना, द्विजचमु गेली बरीच भाजून ॥ ३५ ॥

१९२ अपमान आणि नाशा, पाहुनि भाऊसमेत तात्याच्या ।
शिंदेहि लाल झाला, रिपुगलनालि फोडुं बोलले साच्या ॥ ३६ ॥

१९३ वीरश्री-जनक-वचें, तेव्हां अपुल्या चमूपुढें त्यांणीं ।
टिप्पूच्या दुष्कृतिचें, पुतळे केले उभेच थाटांनीं ॥ ३७ ॥

५९४ मारूं आज मरूं वा, ऐसी ईर्ष्या तयांत उपजविली ।
एकी करून सारी, सेना किल्ल्यावरीच धावविली ॥ ३८ ॥

५९५ आंतिल भडिमाराला, दारूच्याही तसेंच भडक्यास–।
नाहीं जुमानिले तई, किल्लयावरि चालली चमू टास ॥ ३९ ॥

५९६ भिंतीवरिल चमूवर, गोळ्यांची वृष्टि फारशी केली ।
कित्येक शिड्यावरुनी, भिंतीवर जाति तों बरी झडली ॥ ४० ॥

५९७ त्यांनीं रिपुचमु दिपली, आंत तसी बाहिरीहि लोटून ।
शिल्लक सेना सारी, किल्ल्यामधि आंत गेलि उतरून ॥ ४१ ॥

५९८ दृढनिश्चय एकोपा, हिय्या हे तीन मुख्य कार्याचे ।
चालक कारक प्राणचि, जाणावे चांगल्या सदा कृतिचे ॥ ४२ ॥

५९९ द्विजचमु आंत शिरे तैं, आंतिल सेना बहूत घाबरली ।
बाजूच्या किल्लयामाधिं, वेगें जाऊनिया तदा लपली ॥ ४३ ॥

६०० परि विप्रांच्या चमुंनीं, तेही काबीज दुर्ग जैं केले ।
तैं दुर्गप नम्रत्वें, द्विजसेनानीपदावरी पडले ॥ ४४ ॥

६०१ देऊन जीवदाना, विजयध्वज लाविला गडावरतीं ।
परते पुण्यास नाना, शिल्लक चमु राहिली तिथें होती ॥ ४५ ॥

६०२ घेऊन गजेंद्र दुर्गा, कोप्पाळादीक दांडगे किल्ले ।
हरिपंतें सर केले, ऐकुन म्लेच्छांस क्रोध नावरले ॥ ४६ ॥

६०३ टिप्पू सिद्ध चमु करी, चालुनि तात्यावरी झणीं आला ।
सावनुरप्रस्थीं[1] तो, हरिसेना पाहुनी मनीं भ्याला ॥ ४७ ॥

६०४ तुकोजि होळकराच्या, मध्यस्थीनेंच प्रार्थना केली ।
टिप्पूनें सल्ल्यास्तव, जें कथितां त्याप्रती असे कबुली ॥ ४८ ॥

६०५ कित्तुर बदामि तिसरें, नरगुंद तदा द्विजाति पा दिधलें ।
साडेचार प्रयुतें, रोख धना विप्रयास अर्पियलें ॥ ४९ ॥

---

१ सावनुरच्या पठारावर ( स्नुः प्रस्थः सानुरस्त्रियाम् इत्यमरः )

६०६ मावनुर-नबाबाला, कांहींसा प्रांत संप्रती दिधला ।
केला ऐसा तहपरि, नाहीं तो फार फार दिन टिकला ॥९०

( शार्दूलविक्रीडित )

६०७ देई आजवरी टिपू द्विजपती-लागींच त्रासाप्रती ।
तैसें आंग्ल निजाम यासहि टिपू त्रासास दे संप्रती ॥
विप्रापासुनि कित्तुरा हिसकुनी घे आणि फौजेस तो ।
घ्याया कोंकण बेदनूरिं जमवी जिंकूं द्विजा इच्छितो ॥ ९१

६०८ वंशाचा अपुल्या विचार न करी टिप्पू निजामा वदे ।
त्वत्कन्या मजला विवाह करण्या-लागीं प्रमोदेंच दे ॥
होता त्रावणकोरचा नरपती आंग्लास स्नेही खरा ।
तत्प्रांतीं टिपु धाडि घालि मग हो आंग्लास साह्या त्वरा॥९२।

( भुजंगप्रयात )

६०९ ह्मणोनी तिघांनीं टिपूच्या विनाशा ।
तदा बेत केला करूं सर्व नाशा ॥
तयापासुनी जें मिळे द्रव्य भाग्य ।
तिघे सारखे वाटुनी घेउ योग्य ॥ ९३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

६१० कोणी प्रांत असाध्य लब्ध अथवा ताब्यामधें आणितां ।
तो त्याचाच तया विभागणि नको ऐसें ठरे तत्वतां ॥
भाऊ विप्रपतीकडून लिटला आंग्लें तदा धाडिलें ।
आला खुद्द निजाम यापरि तिघे युद्धाप्रती चालिले ॥ ९४

६११ शिंदेहोळकरादिकां त्यजुनिया सैन्याधिपत्या तदा ।
नाना भाउस दे महत्पद किती हा पावला एकदा ॥
याच्या क्षात्रगुणा इमान बघुनी स्वस्वामि भक्तीसही ।
तेव्हां विप्रपतीस मंत्रिस पुरी मोदा पडेना मही ॥ ९५ ॥

( वसंततिलका )

६१२ कर्णाटकांतुन जवें लिटलासमेत ।
सद्भाउ जात असतां जनता समस्त– ॥
टिप्पूकडील मिळली जलदीं द्विजाला ।
वाटेच म्लेंच्छ नृपती न बरा जियेला ॥ ५६ ॥

( आर्या )

६१३ यांच्या सेनेबेरिज, जमले पांदाति तीस शतकें हो ।
दाहा हजार अश्वग, जाती मिळवीत कीर्तिचा लाहो ॥ ५७ ॥

६१४ अका अगस्ट मासीं, सत्राशें नव्वदांत भाऊनें ।
कृष्णाबाई उतरुन, रिपुची कित्येक घेतलीं स्थानें ॥ ५८ ॥

६१५ अठराव्या मित्तीला, द्विजपुंगव धारवाडि तैं आले ।
किल्ल्याचावरि हल्ल्यानें, बद्रिजमालाप्रती शहा दिधलें ॥ ५९ ॥

६१६ कर्णज वृषकेताच्या,-समेत अर्जून जिंकण्या अरिला ।
गेला होता मागें, तैसा एथें प्रकारही घडला ॥ ६० ॥

६१७ अप्पासाहेब[1] असे, छावा भाऊसमेत यासमरीं ।
युद्धीं शिरला वेगें, जैसा डोहीं शिरे मदान्ध करी ॥ ६१ ॥

६१८ ब्राह्मण आणिक आंग्लहि, या युद्धीं वागलेत लोभानें ।
एकीनें वागुनिया, लढति मनापासुनीच नेटानें ॥ ६२ ॥

६१९ कॅप्टन् लिटूल् तदा तो, भिंतीवर चढुन फार शौर्यानें ।
घेई पेंठ समस्तहि, शत्रूला हाटवी झपाट्यानें ॥ ६३ ॥

६२० लिटलांस लागल्या बहु, जखमा यास्तव निघेच छावणिला ।
अप्पाकरिं किल्ला दे, हें कळलें वृत्त सर्व भाऊला ॥ ६४ ॥

---

१ रामचंद्रपरशुराम,

६२१ बद्रिजमालें लढुनी, अप्पाकडुनी गडा हरण केलें ।
विप्रा न साहवे हें, हां हां ह्मणता अरीप्रती कुटिलें ॥ ६५ ॥

६२२ किल्ला सर केला मग, भगवा झेंडा वरीं झणीं रोविला ।
आनंद जाहला बहु, म्लेंच्छाचा गर्व सर्व हारविला ॥ ६६ ॥

६२३ किल्ला स्वाधिन केला, तेव्हां खानें करार भाऊंशीं ।
केला होता कीं मी, शाबुत देतों गडा तुह्मापाशीं ॥ ६७ ॥

६२४ परि आंत भाउ जाउनि, बघती तों सर्व नाश केलेलें ।
तोफा फोडुन दारू, गोळ्या सामान नष्ट हें दिसलें ॥ ६८ ॥

६२५ तेव्हां भाऊ वदले, बद्रिजमालाप्रती प्रकोपानें ।
निर्भर्त्सना करुनिया, काय ह्मणावें तुह्मांप्रती वदनें ॥ ६९ ॥

६२६ 'तुह्मा म्लेंच्छावरि हो, कोणी कधीं धरो न विश्वास ।
विश्वासघातकी टिपु, त्याचा आहे तुह्मासि सहवास' ॥ ७० ॥

६२७ 'बोलापरीच तुह्मी, नाहीं वागत कधीं कधींहि खरें ।
गुत्ती नरगुंदामधिं, केलें खोटेंच कृत्य हो सारें' ॥ ७१ ॥

६२८ या जिव्हारी वचनें, गेला खवळून खान चित्तांत ।
हा कुलज शूर होता, युद्धामध्यें असे कुशल हात ॥ ७२ ॥

६२९ त्यानें इशारत दिली, 'डालो बम्मनकु काट डालो जी' ।
तेव्हां पांच सहस्रहि, सेना धावे करावया आजी ॥ ७३ ॥

६३० भाऊ आत्मजनासह, सावध होते ह्मणूनिया त्यांनीं ।
यवनजनांचे तुकडे, केले वरच्यावरीच खड्गांनीं ॥ ७४ ॥

६३१ जखमी खान पळाया, लागे धरिला तयास सेनेनें ।
करुनि चतुर्भुज त्याला, निवती ध्यायास अन्यही स्थानें ॥ ७५ ॥

६३२ गेले कुशाळदुर्गीं, येथिल घेऊन सर्व जिनगीला ।
तेथें शह[1] देउनिया, तो किल्लाही करामधीं आणिला ॥ ७६ ॥

---

१ घेरला.

६३३ टिप्पू सुलतानाच्या, भाउ ठिकाणास येत असतांना ।
म्हैसुरबाजूलागीं, फावे घेण्यास प्रांत आंग्लांना ॥ ७७ ॥

६३४ श्रीरंगपट्टणामधिं, टिप्पूला कोंडिलेंच आंग्लांनीं ।
परि घास आणि दाणा, न मिळे यास्तव अली तया ग्लानी ७८

६३५ वेढा पडण्यापूर्वी, म्हैसुरच्या आसपासचा प्रांत ।
टिप्पूनें जाळुनिया, केला होता समग्र उध्वस्त ॥ ७९ ॥

६३६ सामग्री शिल्लक ती, संपून गेली समग्र आंग्लांची ।
अन्नान्न करुनि मरती, वीर कितीं हो स्थिती असी चमुची ८०

६३७ ढोरें कापुन खाल्लीं, सोजीरांनीं इलाजही सरले ।
माणुस खाण्याची त्या पाळी येऊन सर्व गडबडले ॥ ८१ ॥

६३८ ओझ्यांचे बैल तदा, आंग्लांनीं खाउनी सुशांतीला ।
उदराच्या कळें हो, सेना पोंचे तदा अशा स्थितिला ॥ ८२ ॥

६३९ दुर्धर प्रसंग अपुल्या, सेनेवर कार्नवालिसें बघुनी ।
करपाद गाळिले ही, झाले बहु खिन्न मर्व्यही[1] खचुनी ॥ ८३ ॥

६४० भाऊस धाडिले बहु, निरोप अपणास यावया मदत ।
नानाकडेहि डाका, मदतीस्तव धाडिल्या पुण्या बहुत ॥ ८४ ॥

६४१ टिप्पू जेरिस आणुन, थोड्यासाठींच यत्न निष्फल हा ।
होतो पाहुन आंग्ला, अति वाइट वाटलें खरे पाहा ॥ ८५ ॥

६४२ भाऊच्या मदतीची, नानांच्याही बघीतली वाट ।
कोणी नाहीं आलें, आंग्ला धरवे न धीर जरि धीट ॥ ८६ ॥

६४३ वेढा उठवुन वालिस, मद्रपुरीला निघेहि जायास ।
लार्डास त्या बिचाऱ्या, झाले हे व्यर्थ व्यर्थ आयास ॥ ८७ ॥

६४४ लार्डाच्या सुचनेपरि, भाऊकडुनी तशी पुण्याहून ।
मदतहि निघे जियाचें, वृत्तहि तेव्हां परंतु पोंचे न ॥ ८८ ॥

---

१ कंवर.

६४५ तद्वृत्तहारकांना, पेंढाऱ्यांनींच मारिलें रानीं ।
यास्तव समस्त सत्यहि, आयकिलें नाहिं वृत्त आंग्लांनीं ॥८९॥

( शार्दूलविक्रीडित ) ( युग्म )

६४६ वेढा काढुनि आंग्ल मद्रपरिला, जाया निघे जेधवां ।
वालीसा दिसले दुरून धुळिचे हो लोट कीं तेधवां ॥
पाहे थांबुनि अश्वसैन्य सगळें येतें असें त्या दिसे ।
'माराया चमु वा जिवास आपुल्या राखावया येतसे' ॥९०॥

६४७ आंग्लां ना उमगे ह्मणून अपुल्या लोकांस वाचावया ।
गोळ्या त्यावरि तो हुकूम चमुला हा सिद्धही द्यावया ॥
भाऊची चमु तों तयास कळली आली स्वजीवाऽवना ।
'देवाची करणी ह्मणून समयीं साह्या मिळे आपणां' ॥९१॥

६४८ सेना पाहुनि भाउचीं मुद तयां आंग्लास झाला अती ।
ते घेऊनि बुभुक्षितां जलदिनें खायाप्रती घालिती ॥
त्यांच्यापाशिं अलोट चंदि असुनी भीती नसे भाउला ।
भाऊनें मग आंग्लसाह्य करुनी तत्प्राणही राखिला ॥ ९२ ॥

( आर्या )

६४९ काळाच्या दाढेंतुन, काढी चमु भाउराव ती सारी ।
ही तत्कीर्ती कळतां, नाना आनंद पावला भारी ॥ ९३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

६५० भाऊची मिळतां तयास पृतना साह्यास आली दुजी ।
नानाचीहि मिळे शिवाय फडके त्यांना मिळाला अजी ॥
तेव्हां वालिस यासहीं हुरुप ये टिप्पूस त्याणें दिलें ।
किल्ल्याच्यामधिं घालवून जलदीं किल्ल्याप्रती वेढिलें ॥ ९४ ॥

६५१ या मोठ्या चमुची कुचंबणि इथें नाहीं बरी वाटुनी ।
तात्याला मदतीस ठेवुन निघे भाऊ लढाया झणीं ॥

संगें त्या लिटलास घेउन सिग तैसें दुजाही स्थळा ।
भाऊ हस्तकिं आणण्या झपझपा तो उतरे चालला ॥ ९५ ॥

६५२ भाऊ म्हैसुरप्रांतिं जात असतां काबीज दुर्गाप्रती- ।
एका मागुन एक ते करुनिया पेठा बहू जाळितो ॥
दाणा वैरण संपली मिष असे भाऊ करी तो वरीं ।
जातां चित्रगडास तच्चमुवरी तच्छत्रु ये सत्वरीं ॥ ९६ ॥

६५३ होती ती चमु तीनशेंच सगळी भाऊ तिला कापुनी ।
ध्याया चित्रगडास यत्न करिती सैन्याप्रती घेउनी ॥
बंदोबस्त बरा असूनि गडही होता बहू भक्कम ।
सामादी हरता उपाय मग ये टेकीस विप्रोत्तम ॥ ९७ ॥

६५४ ध्याया चित्रगडास यत्न करणें सोडून देऊनिया ।
घेई दुर्ग दुजे पराक्रम अती लोकांस दावूनिया ॥
टिप्पूच्या सगळ्या प्रचंड विषयीं भाऊ दरारा खरा ।
तेव्हां बैसवि दाति तेज अपुलें सर्वाप्रती हा हिरा ॥ ९८ ॥

(आर्या)

६५५ हा पुरुषसिंह विजयी, रिपुच्या राज्यांत गर्जना करि जैं ।
घाबरले जन सारे, जो तो पळण्याप्रतीच लागे तैं ॥ ९९ ॥

६५६ त्या दुर्जन टिप्पूनें, पटवर्धन वीर मारिले पूर्वी ।
तच्छासन हा टिपुला, करुनी डोळ्यातुनी टिपें अणवी॥१००॥

६५७ खेळांत बुद्बळ्यांच्या, अश्वीं राजाच आडला जावा ।
मोहऱ्यानें मग दुसऱ्या, धुंव्वा उडवून डावही व्हावा॥१०१॥

६५८ तैसा प्रकार झाला, टिप्पू अडकेच आपुल्या नगरीं ।
आंग्लांनीं शह दिधला, सुटण्या बहु यत्न तो करीहि अरी१०२

---

१ मुलखात.

६५९ इकडे भाऊ टिपुची, अन्य ठिकाणें करूनि हस्तगत ।
त्राहि त्राहि करूनी, रिपुलागीं आणि फार पेंचांत ॥ १०३॥

६६० ब्रालिस निरोप धाडी, यावें इकडे तुह्मी चमूसह हो ।
आजारि सबब दाउन, भाऊ नच जाइ सोडुनी लाहो ॥१०४॥

६६१ प्रांतांमागून प्रांता, किल्ल्यामागून घेत किल्ल्याला ।
वाटे विजयश्रीच्या, आंगींचा शालु भाउ हा त्याला ॥१०५॥

६६२ चित्रगडाहुन भाऊ, बेदनुरा घ्यावयाप्रती निघती ।
होळी ओनारगडा; लढुनी मार्गांत सत्वरें घेती ॥ १०६ ॥

६६३ तुंगातीरानें मग, जातांना लागला शिमोगा त्या ।
वेढा घालुन त्याला, सांगे यश गावया यशो-गात्या ॥ १०७ ॥

६६४ लागे भाऊस तदा, वृत्त असे कीं अरीकडील जन ।
रेझा ह्मणून कोणी, विपिनीं राही ससैन्य येऊन ॥ १०८ ॥

६६५ टिप्पूचा आप्त असे, अठशें स्वारांस बाळगी जवळीं ।
पत्ती सात हजारहि, दश तोफा मोजिना कुणास खळी॥१०९॥

६६६ त्याची रग जिरवाया, भाऊनें धाडिलें स्वपुत्राला ।
लिटूलास सवें दिधलें, विश्वासू आणि आप्त मित्राला ॥११०॥

६६७ उजवे बाजुस तुंगा, डावे बाजूस उंच सुळका जी ।
आगे मागे बांबू, ऐशा जागेंत राहिला काजी ॥ १११ ॥

६६८ अप्पानें आणि लिटलें, फायर झाडून पाहिलें प्रथम ।
रेझा युद्ध विशारद, होता तो टाकिना मुळींच दम ॥ ११२ ॥

६६९ काळ्या गोऱ्यांची ही, दुक्कल पाहून सोडिले बाण ।
रेझानें जोरानें, यांनीं परि नाहि सोडिलें ठाण ॥ ११३ ॥

६७० माजे बहु युद्ध तदा, पडली दोहींकडील चमु भारी ।
जखमी आंग्ल चमु तदा, होउन खिन्नत्व पावली सारी॥११४॥

( युग्म )

६७१ रेझा या दुकलिला, हटवाया फार फार यत्न करी ।
होता असा लिटूलचि, नामें साहेब तो लिटूलहि जरी॥ ११५॥

६७२ तरि त्याणीं दाद दिली, नाहीं रेझास ते न फिरतीच ।
सरसी करिती अपुली, प्रतिखेंनेला असे वदे साच ॥ ११६ ॥

( शिखरिणी )

६७३ शिमोगा किल्ल्याचें सकल उरकी कामहि यदा ।
निघे भाऊ पाह्या स्वसुत-समरा सत्वरि तदा ॥
करी रेझा हल्ला सघरि निकरें भाउसुनि जें ।
कधीं सेनेलाही असि धरुन झुंझा सकळ तें ॥ ११७ ॥

( शार्दूलविक्रीडित )

६७४ भाऊ संकट पाहुनी स्वसुति तें देईल साह्या नया ।
होतें वाटत सर्वही समुपनी गेला न तो त्याक्रिया- ॥
'अप्पाचीच लढाइ आजचि असे ही कामगारी स्वयें ।
त्यानें सारिलि पाहिजेच वदला साह्यास जाऊं नये ' ॥११८॥

६७५ 'मारो तो रिपुला मरो समरिं वा मी देत नाहीं तया ।
साह्या, आजवरी कुळांत कुणिही ने घेच लागे जया ॥
आह्मी सर्वहि हो पराक्रम नृपा दावूनि आलों पुढें ।
येवो हाहि तसा ' असें समरिं त्या भाऊ वदे रोकडें ॥११९॥

( भुजंगप्रयात )

६७६ पहा धैर्य हो केवढें भाउचें हें ।
अहा काय छाती तयालागिं आहे ॥
कुळाच्या किती दाविती स्वाभिमाना ।
असें रत्न पृथ्वीमधीं सापडेना ॥ १२० ॥

---

१ लहान.

६७७ [ स्वपुत्रावरी शत्रु धावून आला ।
तरी जो न हालेहि साह्या तयाला ॥
पहा क्षात्र तेजास आहे कसें हें ।
अतांच्या मुलां आणि बापास पाहे ॥ १२१ ॥

६७८ जरा सांज झाली नको जाउं बाळा ।
अतां बाहिरी तूं असे भूतमेळा ॥
जरी पंधरा पूर्ण वर्षें वयाला ।
तरीही विसंबे न बाबा सुताला ॥ १२२ ॥

६७९ असीं मेषपात्रीं मुलें सर्व केलीं ।
पित्यानेंच वा हीं अपोआप झालीं ॥
असा प्रश्न चित्तामधीं नित्य येतो ।
तयाच्या निकाला कुणीही करो तो ॥ १२३ ॥ ]

६८० जसा बाप साह्यास द्याया न इच्छी ।
तसा पुत्र तत्साह्य घ्याया न इच्छी ॥
जिवाच्यावरी पाणि सोडून यानें ।
अरी हाटवाया करी यत्न मानें ॥ १२४ ॥

६८१ परीकृत्य हें शक्तिबाहेर होतें ।
असें पाहिलें आंग्लमुख्यें तदा तें ॥
निघे साह्य द्यायास अप्पास वेगें ।
पराभूत रेझा पदा घेइ मागें ॥ १२५ ॥

६८२ तदा घेउनी त्या रिपूच्या ठिकाणां ।
निघे भाउ जायास अन्यास्थळांना ॥
किती एक दुर्गास घे बेदनूरीं ।
द्विजाची त्वरें पावली खास स्वारी ॥ १२६ ॥

( आर्या )

६८३ [ नेपोलियन जसा तो, पाश्चात्यीं राहिलाच गर्जून ।
किंवा भारतखंडीं, भीष्मादिक आणि वीर अर्जून ॥ १२७ ॥

६८४ हनिबालानें ज्यापरि, रोमाचें राज्य हलविलें सकल ।
हिंदू हनिबाल तसा, भाऊ ह्मणण्यांत कांहिं ना नवल॥ १२८॥

( स्रग्धरा )

६८५ नानासाहेब यांच्या अवलसमयिं हा भाउ उत्पन्न झाला ।
त्यांच्या मागील सर्वां द्विजपतिकडुनी मान लाभे तयाला ॥
या प्रान्तीं दक्षिणेला यवननृपतिना वाटला काळसा जो ॥
भाऊसाहेब प्रांता मिळवुन टिपुच्या कीर्तियोगेंच साजो॥ १२९॥

( आर्या )

६८६ वेदनुराच्या जवळीं, लागे सत्ता प्रभूत वाढाया ।
तों पत्रें नानांचीं, आलीं "आंग्लांस साह्य द्याया या"॥ १३०॥

६८७ "श्रीरंगपट्टणाला, जाउन मोहीम शेवटा लावा" ।
वालीसहि लीहि तया, "साह्या येऊन वेळ टाळावा"॥ १३१॥

६८८ "आपण आल्यावाचुन, नाहीं होणार काम वेळ्याचें" ।
सिंहानि करि वधण्याला, शशकाचें काम हें नव्हे साचें १३२

६८९ कमरुद्दीन ह्मणोनी, होता सरदार टिप्पुचा एक ।
त्याचा अश्वचमूसह, भाऊवरि यावया दिसे झोंक ॥ १३३ ॥

६९० त्याला अडवायाला, तें स्थळ नव्हतें मुळींच उपयोगी ।
या तीन कारणांनीं, भाऊ टिपुधानिच्या अला जागीं ॥ १३४॥

६९१ रक्ताचा पात तिथें, करणें पडलें न भाग भाऊला ।
टेंकिस टिप्पू आला, तह करण्यालागिं इच्छितां झाला॥ १३५॥

६९२ खालील अटी टिपुनें, दुःखें केल्या तदा सकल मान्य ।
भाउ बघा यावरुनी, होता हा शूर काय सामान्य ॥ १३६ ॥

६९३ अर्धें राज्य तिघांना, देउन मुलगेहि दोन ओलीस ।
कोटित्रय धन द्यावें, केलें टिपुनेंहि मान्य या अटिंस ॥ १३७॥

**टिप्पुसंग्रामनामक सातवा भाग समाप्त.**

# भाग ८ वा.

## [ शिरा विजय-दर्शन ]

( आर्या )

६९४ श्रीरंगपट्टणाहुन, परतुन येतात भाऊ तों त्यांना ।
करवीरकरि जाणें, भाग पडे चालली सकळ सेना ॥ १ ॥

६९५ आरंभीं अप्पानें, बापाला कळविलाच मानस कीं ।
मी करितों मोहिम ही, करवीरपाळास धाडितों नाकीं ॥ २ ॥

६९६ सेनेस घेउनी तो, अप्पा कोल्हापुराकडे गेला ।
अकलोस हलचलला, गांठुनि बुरुजाहि उडवुनी दिधला ॥ ३ ॥

६९७ आंग्लचमूंनीं कुटिलें, गांवामध्यें शिरून पेठांला ।
चमुपें जनार्दनानें, तोफांचा फार मार चालविला ॥ ४ ॥

६९८ अप्पांनीं गोळ्यांच्या, बाणांच्याही करून वृष्टीला ।
करविरसेना जर्जर, करुनी टेंकीस आणिली सकला ॥ ५ ॥

६९९ हें वृत्त नृपा कळतां, भगिरावास धाडिलें त्यांनीं ।
रत्नाकर सचिव सवें, केला हल्ला तदा उभयतांनीं ॥ ६ ॥

७०० अप्पास जखम लागे व्याकुल होवोनि भूमिला पडला ।
विठ्ठल घोंडोबासह, बाबा फडणीसही पडे महिला ॥ ७ ॥

७०१ पालखिमाजीं अप्पा, घालुन नेला नृपास कळवाया ।
राजानें गांव दिले, पोंच तदा बोलला बसा, या, या ॥ ८ ॥

७०२ भाऊस वृत्त लागे, अपमानें क्रोध त्यास नावरला ।
सेना जमवुन सारी, सुसज्ज भाऊ चालता झाला ॥ ९ ॥

७०३ गंगाधर गोविंदा-कडुनी तोफा सुरू करी भाऊ ।
त्रिंबक मग, रघुनाथा, बाबाही घेतले सवें भाऊ ॥ १० ॥

७०४ कृष्णा उतरुन गेले, उंबरगांवीं मानलें समर मोठें ।
नृपसेना घाबरली, झाले त्याचे अनंत जे तोटे ॥ ११ ॥

७०५ दरसालीं खंड नृपें द्यावा तिन लक्ष पेशव्यालागीं ।
त्रास न द्यावा पुढतीं, हें ठरलें त्या लढाइच्या जागीं ॥ १२ ॥

( शिखरिणी )

७०६ महत्त्वाऽऽकांक्षी जो, विजय मिळवूनीच मरतीं ।
महाराणी शिंदे, हिजसि कळले भेद सुमती ॥
वजीरीचीं वस्त्रें, धनि नृप समाईक नमनें ।
समर्थाची इच्छा, धरुनि मनिं आला जलदिनें ॥ १३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

७०७ संगें फार अपार वैभव असे सेनाहि मोठी असे ।
बाहूचा गड त्यास कारण असे कापट्य चित्तीं वसे ॥
नानाच्या कडुनें सचीवपण हें देवो स्वताला धनी ।
शिंद्याच्या सगळ्या सुरू खटपटी होत्या तयालागुनी ॥ १४ ॥

( आर्या )

७०८ माधवरावाचें वय, होतें एकोणवीस वर्षांचें ।
तारुण्य आस पुढें, भात तसा जाहलें असें साचें ॥ १५ ॥

७०९ राज्याचा भार नसे, नाना करिती समस्त राज्याला ।
चैनीत शिशुत्व गेलें, दुःख नसे माहिती मुळीं ज्याला ॥ १६ ॥

७१० भाऊ फडके शिंदे, होळकरासारखे खंबीरगडी ।
असतां समर धुरंधर, यशामधि धैर्य शत्रुचें रगडी ॥ १७ ॥

७११ रंगेल जरी होता, माधव तरि शाहणाहि बहु होता ।
राज्याच्या नीतिमधीं, सुरत्नींही असे सुयश होता ॥ १८ ॥

७१२ बाळाजिपंत नाना, जें म्हणे सौख्य तें तया होतें ।
खर्ड्याच्या युद्धामधिं, सर्वांला दाविलें नृपालें तें ॥ १९ ॥

७१३ नानाचा बहु ताबा, सोसेना पारतंत्र्य हें त्याला ।
जाई स्वास्थ्य मनाचें, ह्मणुनी निस्तेज राव तो झाला ॥ २० ॥

७१४ नानाची चतुराई, राज्याविषयीं तसेंच दक्षत्व ।
रावाच्या ध्यानिं असे, न दुखवी नानास त्यांत हें तत्व ॥ २१ ॥

७१५ विप्रांच्या राज्याची, बळकटि नानावरी सकल आहे ।
तैसा सुरक्षितपणा, खातरि होऊनि गेलि होती हे ॥ २२ ॥

७१६ शिंदा अर्जवि होता, मधुरोक्तीनें जनास बहुसुखवी ।
होता दिलदार तसा, पराक्रमें वैभवाप्रती मिळवी ॥ २३ ॥

७१७ ज्याचा पराक्रम अती, विभव तसें पाहुनी दरान्याला ।
मुत्सद्दीमंडळ हें, भीउन वचके मनांत शिंद्याला ॥ २४ ॥

७१८ अधिपति भक्ति तशांतचि, दावायाच्या मिषें सु-सनदेला ।
दिल्लीहुन चमुसह ये, शिंदा तें जनसमूह घाबरला ॥ २५ ॥

( स्रग्धरा )

७१९ आले पाटील बावा नविन नृपतिची घेतली भेट त्यांनीं ।
जोडोनी हात दोन्हीं विनतिहि चरणीं एक केली नमूनी ॥
श्रीमत्संदर्शनाला बहुत दुरुन मी पातलों मान द्यावा ।
सेना ही लाख आहे प्रभु तिजप्रतिही भेटिचा लाभ व्हावा २६

७२० हा मोठा लाभ आह्मां पुनरपि न घडे याचसाठीं प्रभूजी ।
होवोनीया कृपाळू मन विनति मनीं एवढी घ्याच आजी ॥
शिंद्याचा यांत होता मतलब कीं " दाखवूं वैभवाला ।
सेनेला शिक्षितेला सकल नृपतिला आणि कंपू ह्याला "॥ २७ ॥

( शिखरिणी )

७२१ स्वतांच्या ऐश्वर्यी विभव पृतनेचेंहि सकल ।
नृपा दावोनीया मन खुष करूं खास विमल ॥

पुढें तो साधाया हकुहकु खतांचा मतलब ।
असे बोलायाची मित मधुर शिंद्यास लकब ॥ २८ ॥

( स्रग्धरा )

७२२° हा हेतू सिद्ध झाला बसुनि गजवरीं तो निघाला सवाई ।
बाहेरी वैभवानें हयततिनरतीं दृष्टि तेव्हांच जाई ॥
रत्नालंकार-युक्ता भरजरि कपडे स्वार आबोरणांचे ।
पाहोनी गार झाले सकल नृपतिचे लोक भारीच साचें ॥२९॥

७२३ सैन्याची सुव्यवस्था क्रमिक सुरचना कंपु पाहोनि त्याचे ।
राजाही गार झाला मग इंतर जना काय बोलावयाचें ॥
जो तो आश्चर्य पात्र गरिब मनुज हा केवढ्या वैभवाला ।
देवानें पाववीला चकित निजमनीं होउनी लोक गेला ॥ ३०॥

( आर्या )

७२४ प्रथमचि थिजली मंडळि, पाहुन शिंद्यास फार दम आला ।
कांहीं दिन गेल्यावर, पुनरपि राजास याचिता झाला ॥ ३१॥

७२५ "स्वामीच्या सेवेस्तव, हाडांची करुनिया बहू काडें ।
संकटिं घालुनि जीवा, ओलांडलिं पर्वताग्र आणिकडे ॥ ३२ ॥

( आर्या )

७२६ दिल्लिपतीची मर्जी, संपादुनि स्वामिलागिं वस्त्रांना ।
वजिरातीच्या आणिलें,• वाटे अर्पावि आपणास मना ॥३३॥

७२७ स्वीकार करा विभुजी, ह्मणजे झालों जगामधीं धन्य ।
ऐसें मानिन आपणा, प्रभुचरणीं हेतु तो नसे अन्य" ॥ ३४ ॥

७२८ या मिठ्या वचनांनीं, आर्जव संपत्ति पाहुनि सबल ।
भोळा माधव भुलला, 'एतों घ्यायास मी' वदे 'सकल'॥३५

( स्रग्धरा )

७२९ नानाला हा तमाशा बघुन मुळ न हो जाणिलें सर्व त्यानें ।
केल्याही माधवाच्या बहुत समजुती ऐकिले ना नृपानें ॥

मानल्याआणि नाना कुटिलपण तसें तिनराज्यात -हास ।
सांगे त्याला न मानी नरपति वसतें सिद्ध हो व्याजयास ॥३६॥

( शार्दूलविक्रीडित )

७३० नानाचें ह्मणणेंच सत्य अमुनी राजास तें नावडे ।
होणारास उपाय नाहि ह्मणुनी ते बैसले बापडे ॥
शिद्याला परवानगीस मिळतां मोठा समारंभ तो ।
अर्पाया पदवी नृपास करवी तच्छासनीं वागतो ॥ ३७ ॥

( आर्या )

७३१ शनिवार-प्रासादा-पासुन तों थेट त्या नरोत्तंसें ।
वानवडीपर्यंत हि, डेरे मखमालि ठोकिले खासे ॥ ३८ ॥

७३२ शेवटच्या बहुमोली, मोठ्या डेऱ्यांत मांडिलें होतें ।
सुंदर सिंहासन हो, दिल्लिपतीच्यास लाजवीही तें ॥ ३९ ॥

७३३ वाटेनें दोंहिकडे, पुष्पांच्या लाविल्या बहू जाळ्या ।
तैशाच जागजागीं, सुंदर तैं घातल्याहि रांगोळ्या ॥ ४० ॥

७३४ घोडस्वारांची तसि, कंपूची मांड उठविली होती ।
दोहीं बाजूस तदा, पाहुनि हो चकित सर्व लोकतती ॥ ४१॥

७३५ स्वारांचे, घोड्यांचें, बहुमोली झगझगीत नग होते ।
भरजरि भरगच्चाचे, त्यांचे पोषाखही तसे हो ते ॥ ४२ ॥

७३६ सूर्याच्या प्रतिभेनें, शस्त्रांचा लखलखाट बहु झाला ।
वस्त्रांचाही तैसा, त्यायोगें दिपुन जाइ जनमेळा ॥ ४३ ॥

७३७ आदितवारापासून, गजबजला राजमार्ग त्या काळीं ।
वानवडीपर्यंतहि, अलिजाचें पाहिलें विभव सकलीं ॥ ४४ ॥

७३८ शिंदा बोलावुं स्वयें, आल्यावर स्वारि आणि मानकरी ।
पथकें जरिपटक्यासह, निघति तिथें जावयाप्रती भारी ॥४५॥

( शार्दूलविक्रीडित )

७३९ अप्पाजी-बळवंतराव दुसरे पेठे तिजे रामजी ।
बाजीपंत बिसाजिपंतहि तिथे तो दक्ष माहादजी ॥
नारोपंतहि बेहरेप्रमुख तें मुत्सद्दिमेळा तिथे ।
रास्ते घोरपडे तसे इतरही राजे सवें स्वारि थे । ४६ ॥

( मंदाक्रान्ता )

७४० भाऊ, नाना हरि चमुपती माधवाच्या-समेत ।
मोठ्या कष्टीं निघति बरस्या जाहिं राह्यास येत ॥
त्यांच्या चित्तीं अगदिं नव्हतें जावयाचें परी ते ।
'सेवा-धर्मः परम-गहनो' यामुळें जात होते ॥ ४७ ॥

( आर्या )

७४१ अग्न्यांच्या अंबारिंत; बसुनी वाजत तिथे प्रमोदानें ।
श्रीमंताची स्वारी, गेली डेऱ्यास फार थाटानें ॥ ४८ ॥

७४२ माधव सुंदर होता, मदनासहि लाजवी स्वरूपानें ।
आनंदें ध्यायाला, वनितातीचीं तदा तिथे वसनें ॥ ४९ ॥

७४३ अप्पा बळवंत दुजे, पेठे बसले खवासखान्यांत ।
श्रीमंताच्या मागें, अन्यगजीं सचिव येइ दृष्टींत ॥ ५० ॥

७४४ भाऊ भव्यगजिं बसे, आधारस्तंभ पेशवाईचा ।
नानाचा कंठमणी, विजयश्रीचा पतीच जो साचा ॥ ५१ ॥

७४५ शिंदे फडके हेही, अनुलेल्या उत्तमीं गजीं बसले ।
सरदार सर्व निघती, वाद्यांचे रव नभोंगणीं भरले ॥ ५२ ॥

७४६ शनिवार-प्रासादा, डावें घालून सर्व ते निघती ।
आदितवारांतुन हो, नाकशरीला हळू हळू येती ॥ ५३ ॥

७४७ स्वारी वानवडीला, आली तों लागल्या धडाडाया ।
तोफा सलामिच्या हो, लोक तती जमति फार पाहाया ॥ ५४

७४८ सुंदर डेऱ्यामाजीं; माधव मुजऱ्यास येत शिरला जी ।
मुख्यासनीं विराजित, झाला जावोनिया मुदें गाजी ॥ ५५ ॥

७४९ मुत्सद्दीमंडळ-ही, योग्यठिकाणीं बसेहि मानानें ।
सुंदर अभिनय-कुशला, वेश्यांनीं सुखविलें तया गानें ॥ ५६ ॥

७५० हिंदुस्थानि कलावति, नारींच्या फार मधुर गानानें ।
सौंदर्येंहि तसेंची, सर्वांची गार जाहलींच मनें ॥ ५७ ॥

( शार्दूलविक्रीडित )

७५१ झाला सुंदर नाच दोन घटका गाणें बिणें चांगलें ।
त्याच्यानंतर ते महादजि करा जोडूनिया बोलले ॥
" मीं नम्रें गरिबें मनें प्रभुजिची केली सुसेवा खरी ।
त्याचें हें फळ आप्त आज मजला झालें असें सत्वरीं " ॥५८॥

७५२ " श्रीमंतीं मजला प्रभूत दिधला हा मान यानें मला ।
झाला मोद बहू नृपास वसनें हीं अर्पिणें निर्मिलें " ॥
वस्त्रें आणि नगांस मांडुन पुढें सद्विप्र-पाला-प्रती ।
त्यानें ठेवविलीं तुह्मास कथितों ऐका तुह्मी संप्रती ॥ ५९ ॥

( भुजंगप्रयात )

७५३ पठाणी तऱ्हेच्या शिरीं मंदिलाला ।
जरीचा तसा अंगराखाहि त्याला ॥
विजारीस पायीं महादाजि घाली ।
कटीलागिंही बांधिली लाल शाली ॥ ६० ॥

( आर्या )

७५४ मस्तकिं शिरपेंच तुरा, लटकावुन मंदिलावरी कलगी ।
हातामधिं पोहोंच्या, बांधी भुजबंध बाहुच्या भागीं ॥ ६१ ॥

---

१ नृपास यानें वि०

७५५ मोत्यांचे सर तैसें, नवरत्नांचे गळ्यामध्यें हार ।
कानांत चौकड्याला, घालुनि मनिं मोद मानि तो फार ॥६२॥

७५६ दिल्लीहुन अणलेला, जोडा स्वामीपुढेंच ठेवून ।
आत्मकरानें मोर्चल, शिंदा उडवी तदा नृपावरुन ॥ ६३ ॥

( भुजंगप्रयात )

७५७ समारंभ हा पूर्ण झाला असे तों ।
सवाई निघे थाटमाटें गृहीं तो ।
दिलेल्या तदा पालखी-माजिं बैसे ।
शनीवारवाड्यामधीं येति खासे ॥ ६४ ॥

( शार्दूलविक्रीडित )

७५८ दिल्लीच्या वजिरातिचीं सुवसनें राजाप्रती अर्पितां ।
शिंद्याचें दरबारिं तेज पडलें नानाहुनी तत्वतां ॥
गेला अंधक होत भानु, नृप तैं शिंद्याप्रती दुय्यम ।
तो आमात्य करी जयास दचके युद्धामधीं तो यम ॥ ६५ ॥

७५९ शिंदा नी करि पूर्व तीच सकला तैं मानणें लागलें ।
शिंद्याची सुमती तशी हिकमती यांनीं नृपा मोहिलें ॥
नानापासुनि काढुनी सचिवता द्यावी स्वतांच्या-कडे ।
शिंदा यास्तव यत्न फार करिही साधे न खाई खडे ॥ ६६ ।

( आर्या )

७६० गेले दरबारिं विभू, तेथें शिंदा सदा असे गाजी ।
वाड्यामध्यें जातां, शव्दा झेलित उभा महादाजी ॥ ६७ ॥

७६१ एकांतांत निघाले, तरिही मागें असेच ही स्वारी ।
माधव जलकेलीस्तव, जाई हा त्या असेच कासारीं ॥ ६८ ॥

७६२ सारांश हें लटांबर, नृपतीमागेंच दोन वर्षें हो ।
होतें, वाटे सकलां, नृपसत्ता नामशेष सकलांचि हो ॥ ६९ ॥

## ( शार्दूलविक्रीडित )

७६३ नाना स्वस्थ तदा मुळीं न बसला युक्तिप्रयुक्ती करी ।
शिंदा सद्यश गाजवूनि असिला त्या उत्तरेला वरी ॥
भाऊही समशेर गाजवि तसी जाऊनि शत्रू-वरीं ।
लाभे सद्यश आणि वैभव अती होती स्थिती ही खरी ॥ ७० ॥

७६४ भाऊचाह असे अतां वजन तें त्या माधवासन्निध ।
तो, निस्तेज बनून भानु कथि त्या राजास नानाविध ॥
जेव्हां पाटिल अपुलेंच ढकली घोडेंच भाऊ तदा ।
नानाचा धरि पक्ष पाडि हणुनी शिंद्यास प्रत्येकदा ॥ ७१ ॥

७६५ नानाच्याविषयीं नृपाल-मन जें झालें असे दुष्ट तें ।
होई साफ तदा बरें नरपती ते जाहले वागते ॥
भाऊंनीं कृत पेशवाइस तसें राजासही राखिलें ।
नानाच्या समवेत हेहि असतें तें नष्ट केलें खलें ॥ ७२ ॥

## ( स्रग्धरा )

७६६ शिंद्याच्या ओंजळीचें जल नरपतिला प्यावया वेळ आली ।
तें भाऊनें सवाई नृपतिस कथिलें सर्व बेशुद्धि गेली ॥
शिंद्याचा लष्करी हा मतलब उघडा होउनी वाटलें कीं ।
मानाचा भंग केला करि-पुर वसनीं बोलुनी राव टाकी ॥ ७३ ॥

## ( शार्दूलविक्रीडित )

७६७ नानाच्यापरि राजभक्त चतुरा सद्बुद्धिवंता प्रती ।
राजानें दुर लोटलें तर पहा होतील तोटे अती ॥
देखावा सगळा नृपापुढतिं जैं भाऊ उभा तो करी ।
तेव्हां माधव शुद्धचित्त बनला तद्भाषणें सत्वरीं ॥ ७४ ॥

७६८ 'शिंद्याच्या मुलथापिला भुलुनिया तद्धस्ति राज्या खरें ।
देतां तें द्विज-दुर्दशा बहु नृपा होईल जागा बरें ॥

विप्रानें सगळें सुराज्य मग हें पावेल कीं नष्टता ’ ।
ऐकोनी नृप शुद्धचित्त बनला तद्भापणें तत्वतां ॥ ७५ ॥

७६९ भाऊनें दिसले उपाय तितके केले तदा सत्वरीं ।
‘केला बोधनृपास ऐकुन खरी ती वाटली वैखरी ॥
शिंदा ज्यापरि कृष्णवर्ण वरतीं तैसाच आंतूनही ।
ऐसें माधवराज यास गमतां क्रोधा पुरेना मही ॥ ७६ ॥

( आर्या )

७७० वैतागानें नाना, काशीला जावयास निघती जें ।
माधव अजिंक्य करुनी, ठेवुन घेई तया नराला तें ॥ ७७ ॥

७७१ एके दिनिं जलकेली, करितांना लाडिगोडिनें शिंदा ।
मागे प्रधानकी तें, खर्पुस उत्तर मिळे तयास तदा ॥ ७८ ॥

( शार्दूलविक्रीडित )

७७२ “ नाना हा उजवाच हात मम जी, याच्यापुढें आपण ।
नानाच्या विषयीं नका वदुं, मला व्हावेत दोघेजण ॥
नाना राज्यभरास योग्य असती तुम्हीहि तद्रक्षणा ।
आहां राज्यि तुम्ही म्हणून मजला फावे सदा खेळना ” ॥७९॥

( आर्या )

७७३ ‘ नानाला काढूनी, माझा कर वाम हा खुडावा हूं ।
ऐसें तुम्हांस वाटे, किंवा दोन्ही असोत मज बाहू ’॥ ८० ॥

७७४ ‘ यास्तव यत्नहि भलता, साचिव्याला नका करूं पुढतीं ।
आपण आणिक नाना, सत्ता दोघाविना नही चलती ’ ॥८१॥

७७५ भाऊंनीं नानांनीं, शिंद्याचे सर्व बेत ढासळले ।
दीर्घद्वेषी शिंदे, पाहुनि चित्तांत तप्त हें झालें ॥ ८२ ॥

७७६ नानाचा द्वेष पुढें; उघडपणें तो करावया लागे ।
नरडीचा घोटचि तें, घ्यावा ऐसें तया मनीं वागे ॥ ८३ ॥

७७७ नानांच्याही चित्तीं, वाटत होतें तसें तया काळीं ।
शिंदा ब्रिग्रेद पलटण, आणी युद्धार्थ आपुली सगळी ॥ ८४॥

७७८ पाठीराखा भाऊ, नानाच्या रक्षणाप्रती अगत्री ।
सेना आत्मपुराहुन, शिंद्यासह सामन्याप्रती वरवी ॥ ८५ ॥

७७९ यापरि यादवि माजे, निवती सेना परस्परावरतीं ।
फडके मध्यें पडले, गोष्टी सांगून चार परतविती ॥ ८६ ॥

( शार्दूलविक्रीडित )

७८० गेला बेत न शेवटास ह्मणुनीं शैथिल्य आले जरी ।
सिद्धी जाइल हें तयास गमलें हा बेत केव्हांतरी ॥
हिंदुस्थानिं तयापुढें न फिरुनी शिंदाहि गेला परी ।
मृत्यू येउन झाप घालून तया नेई पुरा सत्वरीं ॥ ८७ ॥

( आर्या )

७८१ सत्राशें चौर्‍याण्णविं, बाराव्या तारखेस ये मरण ।
फेब्रुवारी-मध्यें, जय मिळवी जो करून फार रण ॥ ८८ ॥

( स्रग्धरा )

७८२ मोठा दीर्घप्रयत्नी प्रबलतम अरी जिंकि मोठ्या सुशौर्यें ।
दीर्घोद्योगें मिळालें सकल विभव हें वागला फार धैर्यें ।
श्रीमंताचा दरारा बसवुन दिधला सर्व राज्यांत यानें ।
ऐसा माहादजी हा झडकरिं अपुल्या सद्मि नेला यमानें ॥८९॥

( अनुष्टुप् )

७८३ खचे बाजू मराठ्याची ।
वाटले सकलाप्रती ॥
दौलतराव बसे त्याच्या ।
गादीला नृप संप्रती ॥ ९० ॥

( आर्या )

७८४ शिंद्याच्या मागुनि तो, भाऊचा मित्र आणि समरजयी ।
तात्या फडके मेला, राज्यीं दुसरी पडेहि धोंड तई ॥ ९१ ॥

७८५ तात्यास पोटशूलव, माराया जाहला मुशक्त तया ।
केले उपाय बहु परि, नाहीं यश लाभलें मुळींहि शंया ॥९२॥

( अनुष्टुप् )

७८६ सिद्धटेकीं मरे तात्य ।
गणेशाच्या पदीं यदा ॥
बाबाराव पुढें काम ।
तयाचें चालवी तदा ॥ ९३ ॥

**शिंदाविभवदर्शन नामक ८ वा भाग समाप्त.**

---

## भाग ९ वा.

[ खर्ड्यांची लढाई ]

( स्रग्धरा )

७८७ 'केला हल्ला सवाई प्रभु-निजकटकें भाउनें मार दिल्हा ।
तेव्हां किल्ला परांडा जवळ हि असतां जाहला दूर पल्ला ॥
नाहीं गल्ला न पाणी यवन तळमळी या नबी यारअल्ला ।
बोले सल्ला करोजी अबहि गनिमको चाहिसो देव जिल्हा'॥१॥

( शार्दूलविक्रीडित )

७८८ शिंद्याचा अवतार संपुन पुढें राज्यामधें शांतता ।
होती तोंच निजाम ये निजबळा घेऊन युद्धा स्वतां ॥

---

१ हातास.

भाऊला समशेर हातिं धरुनी युद्धार्थ जाणें पडे ।
त्याच्या मी कथनास सर्व करितां ऐका तुह्मी रोकडें ॥ २ ॥

( आर्या )

७८९ गोविंदराव काळे, नानांनीं धाडिले निजामपुरा ।
चौथाइ देशमुखिची, बाकी मागावयास म्लेंच्छ वरा ॥ ३ ॥

७९० कोटिद्वय सार्धवरी, दशलक्ष तदा असेच बाकि तिला ।
द्विज मागे जाउनिया, म्लेंच्छसचीवा रुचे न हे मतिला ॥ ४ ॥

७९१ म्लेंच्छाच्या दरबारीं, वलवलपुरि माजली असे मोठी ।
सेना लढाउ नसे, कारस्थानेंहि चालतीं खोटीं ॥ ५ ॥

७९२ सरदार चैनबाजी मार्जी हुक्क्यांत गुंतले असती ।
गाफिल निजामअल्ली, दरबारींहीं असे अशी भरती ॥ ६ ॥

( शार्दूलविक्रीडित )

७९४ दाढ्या लांबचि लांब आणि भपकी लामानिम्याची असे ।
मुल्लासाब व खानसाब तिसरे अल्लादि येती तसे ॥
हे सारे दरबारिं येति बसती शोभवती चांगले ।
गप्पा मारुन त्यांस तोष अपुल्या स्वामीस देणें कळे ॥ ७ ॥

( आर्या )

७९४ गोविंदराव काळे, दरबारीं जाउनी निजामाला ।
नानाऽऽज्ञा कथन करी, चौथाइचि यादि वाचतां झाला ॥८ ॥

७९५ निजाम धुंदचि होते, मशिरें ऐटींत भाषणें केलीं ।
' गोविंद-राव नाना, कोण? कलमबंदि हे असे कसली '॥९॥

७९६ ' नाहीं आह्मी जाणत, जाउन नानास घेउनी या जी ।
तेव्हां ऐकूं तुमचें, ' ऐसें धुंदींत बोलला काजी ॥ १० ॥

७९७ इतकेंच बोलुनी तो, ना राही एक तें तमाशाला ।
दरबारीं करवुनिया, सोंगें विप्रांचि आणितां झाला ॥ ११ ॥

७९८ नाना माधव यांच्या, सोंगांनीं हसविलें जना सकला ।
गोविंदराव यांचा, या कृतिनें क्रोध फार वाढविला ॥ १२ ॥

( स्रग्धरा )

७९९ ज्याचा मोठा दरारा दिगवहि अति तें पोंचलें अग्रभागीं ।
काशीपर्यंत राजे, बचकतिहि मिळे खंडणी जागजागीं ॥
निंदा त्या माधवाची यवन असि करी ऐकुनी लाल झाले ।
त्याला गोविंदकाळे उठुन झडकरीं फार खोंचून बोले ॥ १३ ॥

( आर्या )

८०० 'गोविंदराव काळे, नांवाचा मी असेन तर याची ।
दारोदार फिरवुनी, धिंडचि काढीन हे कथा साची' ॥ १४ ॥

८०१ लेहुनि कशीवरली, उरवल्याहि ठेवि त्या जागीं ।
दुर्धरपण करुनीया, वेगें ते पावले पुण्यालागीं ॥ १५ ॥

८०२ ऐकून या प्रकारा, नानाची त्या सवाइ समवेत ।
अंगाचि लाहि झाली, होउन युद्धार्थ ते करिति बेत ॥ १६ ॥

८०३ केलेला पणहि तया, सांगितला सर्व आणि कृति कथिली ।
शिक्षिस न्याया त्याला, सेनेची सकल सिद्धता केली ॥ १७ ॥

८०४ वर्दी म्लेंच्छांस दिली, तच्चमुही युद्ध द्यावया सजली ।
सरदारांना पत्रें, श्रीमंताकडुन धाडिली गेली ॥ १८ ॥

( शार्दूलविक्रीडित )

८०५ शिंदे होळकरादि वीर सगळे रास्ते वगैरे यदा ।
संगें घेउनि सैन्य येति मिळती मुख्या चमूला तदा ॥
पाहूनी मुहुर्तें त्या विशुवळा येवोनिया राहिली ।
सेना गारपिरावरी मग पुढें शत्रूकडे चालली ॥ १९ ॥

८०६ नानाची चमु आणि राज्य सगळें यांची व्यवस्था अती ।
होती अल्प चमू परंतु पुढती वाढहि भारीच ती ॥

म्लेंच्छाच्या वकिलें धन्यास लिहिलें आहे चमू थोडकी ।
"सोंळ्यामाजिंच काळ जात असतो भीऊं नका त्यास कीं." २०

८०७ 'कांहीं वामणभट्ट एथ जमले सेना नसे फारशी ।
सोंळीं ओंवळिं घाळिती प्रतिदिनीं दाळावया त्याजशीं ॥
तीं रात्रंदिन नेसती बहुतदा म्याया नको कारण' ॥
म्लेंच्छाच्या सचिवास ऐकूनिच ये स्फूर्ती कराया रण ॥ २१ ॥

८०८ त्या दुष्टास गमे जयश्रि मजला मालाच घालावया ।
आहे सिद्ध ह्मणून मोद न मनीं मावेहि नीचा तया ॥
गेले लोक खुलून सर्वहि तदा म्लेंच्छाधिपा वाटलें ।
विप्रा जिंकुनि राज्य हस्तकिं अणूं ते विप्र हो माजले ॥ २२ ॥

८०९ झाली काय मजा पुण्याप्रति तदा हे गारपीराहुनी ।
जातां कूच करून त्यांस मिळती सर्दार ते येउनी ॥
आले गाइकवाड आणि डफळे थोरात ही मंडळी ।
येवोनी मिळतां प्रचंड चमु ती भासावया लागली ॥ २३ ॥

( शिखरिणी )

८१० हजारों योद्धे ते हळुहळु सवाईस मिळतां ।
समुद्रावाणी ती सकल चमु वाटेच बनतां ॥
असा हा देखावा पुढतिं भरतस्था न दिसला ।
गमे संपत्तीची शिखरगत वेळाच मजला ॥ २४ ॥

( शार्दूलविक्रीडित )

८११ ज्याचें आयु समस्त आजवरि तें गेलेंच युद्धामधीं ।
देहाच्या जखमा पराक्रमि अशा साक्षीस देती अधीं ॥
ज्यानें बाहुबलें अती दमविलें गर्विष्ठ म्लेंच्छाप्रती ।
तो भाऊ सचिवें प्रचंड चमुचा केलाच सेनापती ॥ २५ ॥

८१२ जो नारायण मृत्युनंतर पुढें राज्यास ह्या सावरी ।
ज्यानें टिप्पु तसाच तज्जनकही भंडाविला संगरीं ॥

शिंद्याही वचके ज्यास वत्रतां होताहि जो सन्मती ।
तो भाऊ सचिवें प्रचंड चमुचा केलाच सेनापती ॥ २६ ॥

८१३ ज्याच्या प्रौढपराक्रमेंच थिजले मोठेहि शत्रू तदा ।
ज्यानें आंग्लजनासही फिरविलें युद्धांतुनी एकदा ॥
ज्यानें बेदनुरादि दुर्गमगडा हातामधीं आणिलें ।
भाऊला सचिवें प्रचंड चमुचा सेनापती नेमिलें ॥ २७ ॥

( आर्या )

८१४ शिंद्याचा सेनापति, जिउबावक्षी तुकोजि होळकर ।
रघुजी, फडके चमुपति, पेरानाच्या वरीहि भाउ वर ॥ २८ ॥

८१५ पेरान डिवाइन हे, योद्धे पाश्चात्य चांगले होते ।
त्यांच्यावर भाऊचा, ताबा तच्छौर्य काय सांगूं तें ॥ २९ ॥

८१६ सल्ला मसलत द्याया, नानाही संगरांगणी होता ।
सवाइ माधव होता, देखावा चांगला दिसे वत्रतां ॥ ३० ॥

८१७ सपाद लक्षापेक्षां, जास्त चमूमाजि स्वार तैं असती ।
पेंढारी अयुत असे, वेगें शत्रूवरी तदा निवती ॥ ३१ ॥

८१८ द्विजसेना गारपिरा-हून निघे ऐकिलें नवाबानें ।
संगें घेउन सेना, आस्ते आस्ते निघेहि थाटानें ॥ ३२ ॥

८१९ एक ह्मणे द्विजपुरिला, जाळुन आतांच टाकितों समुल ।
दुसरा ह्मणे इतःपर, खंडांतुन मुक्त जाहलों सकल ॥ ३३ ॥

८२० तिसरा वदे मराठे, आंचवले हो विजापुरास पुरे ।
खान्देशास तसेंची, विप्रां शासन करीन मी स्वकरें ॥ ३४ ॥

८२१ मशिरोल्मुलुखाला तर, स्वर्ग उरे दोन अंगुलें खास ।
पैजेचा उचलि विडा, तन्मोदा करिल कोण लेखास ॥ ३५ ॥

### ( शार्दूलविक्रीडित )

८२२ जातीचा जर मी खरा महमदी आहे तरी पेशवा ।
गादी घेउन राख फासुन जवें फेटाळितो हा नवा ॥
लोटा देउनिया करीं झडकरीं लंगोटि नेसावया ।
काशीला पिटवून जाविन वरें राजा सवाईस या ॥ ३६ ॥

८२३ विप्राची चमु गारदौंड-नगरा येतांच नाना कथी ।
म्लेंच्छाच्या मुलुखास जप्त करुनी ठोकाच ठाण्याप्रती ॥
तेव्हां गंगथडी व भीवरथडी ख़ान्देश इत्यादिकां ।
जप्ती होउन थेट अंमल बसे त्या बेदराला निका ॥ ३७ ॥

८२४ दौंडेपासुन ती चमू थडकली खर्ड्यास येवोनिया ।
रामाजी, हरिपंत, संगरि सवें घे भाउ पुत्रद्वया ।
अल्ली बेदर सोडुनी झर झरां लागे यदा यावया ।
बाबाराव करी तयांवरि जवें हल्लाहि जिंकावया ॥ ३८ ॥

८२५ बाबाराव फिरे भिऊनि अरिला भाऊ चमू घे भला ।
राजाची फडक्याचि आणि मग तो शत्रूवरी धावला ॥
भाऊ दौलतरावची चमु करी बाजूस डाव्या उभी ।
वामीं त्या रघुभोसल्यास करुनी मध्यें स्वतां अस्तभी[1] ॥ ३९ ॥

८२६ भाऊ भैरव सिंहनाद करुनी एतो असें पाहुनी ।
शत्रूचा मग लालखान असता-सुद्धां जला धावुनी ॥
सेना त्याजवळीं हुशार समरीं हे तीहि सत्रा शतें ।
लालखान प्रशस्त पुष्ट असुनी होते रणीं शूर ते ॥ ४० ॥

८२७ त्यांनीं येउनिया पराक्रम बहू दवूने लोकां क्षणीं ।
मारूनी जखमा द्विजाति चमुला, ते दोन केल्या रणीं ॥
अश्वाच्या वरुनी पडे धरणिला भाऊ अघातामुळें ।
भाऊच्या हरिपंत नामकसुतें लालास तें मारिलें ॥ ४१ ॥

---

१ ज्याचें भय गलें आहे असा ( भाऊंचें वि० )

८२८ बाबूराव फिरे जरीपट सर्व घेऊन युद्धांतुन ।
तों वक्षी जिउबा हयावरुन ये त्याच्याकडे धाउन ॥
तद्धिक्कार करून तो वदतसे 'भ्याडा कुळाला कसी ।
काळोखी पळुनी स्वतांस तिसरी बापास कां आणिसी ॥ ४१ ॥

८२९ नाहीं वीर्य तर्मे सुवंर्ण तुजला राहे दडूनी अरे ।
शिंद्याच्या चमुमागुनी पळुनि जा तात्या सुता सत्वरें ॥
बाबा त्या स्मरणास होउन तया तेथेंच तो राहिला ।
ऐशामाजि समस्त लोक नमुनी युद्धाप्रती चालला ॥ ४३ ॥

८३० भाऊ वीस हजार अश्वचमुची मांड शत्रुवरी ।
फौजी गर्दि करून सोडि तंव ता रास्तेहि ये सत्वरी ॥
म्लेंच्छें लक्ष चमूहि धाडिलि जवें विप्रास तोडावया ।
शिंदा तोफा सुरू करी अरिवरी लोकांस जाळावया ॥ ४४ ॥

८३१ बाणांचा जबराच मार करि तैं तो भोसला संगरीं ।
जाती एक शरें पटापट रणीं हो पांच योद्धे वरी ॥
तोफा डागुंच लागला धडधडा तो पातशाही यदा ।
सर्वांचा अतिमार शत्रुवरतीं व्हायास लागे तदा ॥ ४५ ॥

( भुजंगप्रयात )

८३२ शरांनीं शिरें तैं झराझा महीला ।
शतघ्नीमुळें ही खराबा जहाला ॥
धुरानें दिशा व्याप्त झाल्या समस्त ।
तदा मस्त शत्रूहि होईच फस्त ॥ ४६ ॥

( शार्दूलविक्रीडित )

८३३ तेव्हां वीस हजार घेउन दला गर्दीत भाऊ शिरे ।
शिंद्याच्या समवेत, शत्रुचमुचीं तोडूनि पाडी शिरें ॥
उत्साहाग्नि तदा प्रभूत पसरे म्लेंच्छास घेई वळा ।
भाऊनें समरीं असंख्य रिपुचीं सेना तदा कापिली ॥ ४७ ॥

८२४ भीष्माचार्यपरी करी समरिं तो भाऊ मुगुन्दाप्रती ।
मारी तोडि कितीक दूर पळवी योद्ध्याप्रती संप्रती ॥
तें झाला क्षत दोन घाव असती तद्रक्त त्यांच्यांतुन ।
वाहे आंग समस्त धूलि-रुधिरीं गेलें अती माखुन ॥ ४८ ॥

८२५ त्याच्या त्यासमयीं वयास असती तीं साठ वर्षे खरीं ।
गांगा अश्वि बसून वायुपरि तो धावे तरी सत्वरीं ॥
फेकोनें असिच्या प्रवीर अरिचे टेकीस आणोनिया ।
धाडी स्वर्गि कितीक घोर रण तें राहेच माजोनिया ॥ ४९ ॥

८२६ ही त्याची कृति पाहुनी द्विजनृपा संतोष झाला असे ।
वारंवार तयास तो वदतसे 'शाबास भाऊ' असें ॥
भाऊच्या असिचा प्रताप असला चालू असे हो यदा ।
पेरानें नगि तोफ छत्तिस जवें चालूंहि केली तदा ॥ ५० ॥

८२७ भाऊची असि आणि तोफहि तसा सर्वांप्रती त्रासदा ।
या-योगे बहुतक शस्त रिपुची सेना पळाली तदा ॥
झाली सांज पुढें पडे चहुंकडे काळोखही जेधवां ।
म्लेंच्छाच्या मग धांदलीस मिति ती नाहीं अहो तेधवां ॥५१॥

(स्रग्धरा)

८२८ जो तो धावावयाला जलद जलद तें लागला फार वेगें ।
विप्रांचें सैन्य त्यांना उडवित असिनें चाललें त्यांजमागें ॥
म्लेंच्छाचे जागजागीं मरुन पडति तें मोठमोठे थवे हो ।
युद्धामाजीं जयश्री द्विज-प- वर वरी लाभली सौख्यलाहो ५२

(शार्दूलविक्रीडित)

८२९ वाताहात करून अल्लिचमुची जेव्हां जयश्री मिळे ।
अल्ली शिल्लक सैन्य घेउन तदा किल्ल्यामधें तो पळे ॥
वेढा घालुनिया गडास जलदीं तोफा करूनी सुरू ।
केलें बंद जलान्न फार जनता लागे तदा ती मरू ॥ ५३ ॥

( आर्या )

८४० धरिला धीर कसातरि, अल्लीनें दोन दिवसपर्यंत ।
तिसरे दिवशीं त्यांना, वाटे होतो असाच जीवान्त ॥ ५४ ॥

८४१ अन्नाविण कासाविस, त्यांचे व्हायास लागले प्राण ।
मद उतरे मशिराचा, अल्लीसह तो द्विजास ये शरण ॥५५॥

८४२ माधवरावा लोटा, देउन काशीस धाडण्या टपला ।
त्या ह्या मशिराचा तैं, सर्वहि व्यापार खास आटपला ॥५६॥

८४३ वाटेल तसा करुनी, तह आपण जीवदान द्या आजी ।
घ्या मुलुख हवा तो तुह्मि, जोडुन कर बोलला असे काजी५७

८४४ विनती तह करण्याची, पाहुनि नाना लढाइ बंद करी ।
धाडी अटि लीहुनिया, पाहुनि दुःखास पावलाच अरी ॥ ५८॥

८४५ 'उन्मत्त मशीरा द्या, काढाया धिंड आपणापाशीं ।
देवगिरी गड तापी, यांमधल्या द्या समस्त देशाशीं' ॥ ५९॥

८४६ कोटित्रय धन द्यावें, दंडादाखल तुह्मी अह्मां आज ।
खर्चेहि लढाइचा द्या, ह्मणजे संपेल हें समर-काज ॥ ६० ॥

८४७ त्या अटि मान्य करूनी, दुःखें मशिराम धाडिलें इकडे ।
गोविंदराव काळे, मोदें श्रीमंत-दत्त लेइ कडें ॥ ६१ ॥

( शार्दूलविक्रीडित )

८४८ घेई लेखनि अंगवस्त्र अपुलें गोविंदकाळे तदा ।
अल्लीच्या दरबारिं जाउन ह्मणीं पावूनिया तो मुदा ॥
श्रीमंतादिक सर्व लोक निघती याया पुण्याला बरें ।
कोशाच्या विहिरीनजीक मशिरा तैं ठेविती सत्वरें ॥ ६२ ॥

( आर्या )

८४९ सत्राशें पंच्याणावि, योद्ध्यापटवर्धनाप्रती सकला ।
श्रीमंतीं सनद दिली, संतोषानें दयान्वितीं विमला ॥ ६३ ॥

८९० उत्पन्न त्या द्विजांना, अर्धाधिक पंचवीस लक्ष असे ।
त्याहुन शंभर जास्ती, त्याबद्दल मुलुख लाविलाहि असे॥६४॥

८९१ एक्विस लक्षापेक्षां, ब्याण्णव हाजार त्यामधें जास्त ।
देती तदा शतद्वय, उत्पन्नाचा द्विजाप्रती प्रांत ॥ ६५ ॥

८९२ चिंतो पांडूरंगा, सनद दिली एक तें नवी करुन ।
तैनातीचा जाबा, देउन त्याला प्रभूत सन्मान ॥ ६६ ॥

**खर्ड्यांची लढाई नामक भाग ९ वा समाप्त.**

---

## भाग १० वा.

[ साचिव्यलाभ ]

( आर्या )

८९३ सत्राशें पंचाण्णवि, खर्ड्याचें युद्ध जाहलें तुमुल ।
विभवाचा कळसचि हा, उतराया लागलेंचि मग सकल ॥ १॥

८९४ नानाच्या त्रासास्तव, माडीच्या वरुन माधवें खालीं ।
मारुनि उडि प्राणांची, हानि नृपें आपुल्या तदा केली ॥ २ ॥

८९५ नाराणमृत्यूच्या,-नंतर जशि धामधूम होति सुरू ।
तैशी यासमयींही, राज्यामधिं लोक लागलेच करूं ॥ ३ ॥

८९६ धरपकड मार ऐसा, देखावा पुण्यपत्तनीं भासे ।
यांचा प्रतापभानू, एथुन अस्ताचलास जात असे ॥ ४ ॥

८९७ नानास पडे चिंता, बसवावा कोण गादिच्या-वरतीं ।
बाळाजिपंत याची, संतति आहेच भूमिच्या-वर ती ॥ ५ ॥

८५८ द्यावा दत्तक तर ही, पंचाइत येउनी पडे साची ।
बाजीराव करावा, तर नानाला धास्ति लागली त्याची ॥ ६ ॥

८५९ पाळें मुळें खणाया, नाहीं कमी तो मुळींच करणार ।
[1]पंचाइत दोहिंकडे, अन्तीं तो भरवि एक दरबार ॥ ७ ॥

८६० सर्वानुमतें ठरलें, माधवपत्नीस दत्तका द्यावें ।
होइल मोठा तोंवर, बाईनें सकल राज्य हाकावें ॥ ८ ॥

८६१ बाळोबा कुंजरला, हें मत नव्हतें मुळीं तदा मान्य ।
जिउबा बक्षी, कुंजर, त्या काळीं नसति वीर सामान्य ॥ ९ ॥

८६२ शिंद्याचा सेनापति, पहिला दुसरा असे सचिव त्याचा ।
त्यांच्या शिक्षित चमुचा, होता त्या काळिं धाकही साचा ॥ १० ॥

८६३ जिउबादादा बक्षी, पडले नंतर लगेच मृत्युमुखीं ।
होता लढवय्या हा, शिंद्याचें सैन्य चांगले राखी ॥ ११ ॥

८६४ बाळोबा कुंजरच्या, चित्तीं बाजीस सोडुनी द्यावें ।
बसवावें गादिवरि स्वकरें राज्यीं असेच शिरकावें ॥ १२ ॥

८६५ बाजीनेंही त्याशीं, बांधुन संधान त्या कबुल केलें ।
सेनाव्यय देउनिया, लक्षांचे चार प्रांतही दिधले ॥ १३ ॥

८६६ कुंजरचा बेत कळे, तेव्हां नाना विचारिं हो पडले ।
करुनी विचार त्यांनीं, चमुसह भाऊस यावया लिहिलें ॥ १४ ॥

८६७ भाऊ आत्मपुराहुन, दोन दिनामाजि ये पुण्याला तो ।
नानास धीर देई, हितकर मित्रें जनास मुद होतो ॥ १५ ॥

८६८ बाळोबा कुंजर जें, होता करणार कृत्य तें सारें ।
आपण घ्यावें उरकुन, ह्मणजे नृप-वरिं बसेल वजन खरें ॥ १६ ॥

८६९ राहून वोज अपुला, शिंद्याचा ना शिरेल कर राज्यीं (आजी) ।
ऐसा विचार करुनी, भाऊला धाडि आणण्या बाजी ॥ १७ ॥

---

१ सेनेचा खर्च.

८७० भाऊ तैं बाजीची, विश्वासाच्या बहूत गोष्टींनीं ।
खातरजमा करूनी, त्याला तो पुण्यपत्तनीं आणी ॥ १८ ॥

८७१ बाजीची नानाची, होउनिया भेट जाहल्या शफथा ।
'विसरूंया गत गोष्टी, चालू आतां धरूनिया सुपथा' ॥१९॥

८७२ बाजीला गादिवरि, बैसवुनी राज्य चालवो नाना ।
साचिव्य स्वीकारुनि, योजूं तैशाच युक्तिही नाना ॥ २० ॥

८७३ अपुल्या सल्लयावाचुन, बाजीला राज्य आप्त व्हावें हें ।
कुंजरला नच रुचले, तो तेंव्हां समर द्यावया पाहे ॥ २१ ॥

८७४ 'नानाची मसलत ही, हाणुन पाडिन तरीच शिंद्याचा ।
आहें दिवाण मी हो,' बोलुन कंपूहि आणिला साचा ॥२२॥

८७५ पाटिलबावाची ही, शिक्षित सेना बघून नानाची ।
घाबरगुंडी उडली, तन्मतिनें भीति घेतली साची ॥ २३ ॥

८७६ चिजबस्त जमा करुनी, साताऱ्याला पळून जायाचा ।
भाऊला बेत कळे, गाठी वाडा तदा फडणिसाचा ॥ २४ ॥

८७७ नामर्दपणाबद्दल, भाऊ नानास दोष दे प्रखर ।
वाणीनें गंभिरशा, देई धीरास त्यास विप्रवर ॥ २५ ॥

८७८ "नाना हें काय तुह्मी, करितां; बुद्धीस भ्रंश कां झाला ।
आणुन मज सेनेसह; बाजीला सोडुनीहि कां अणिला ॥ २६॥

८७९ आपण जर पाय असे, गाळाया जाहलाच सिद्ध तर ।
इतरांची गति कैशी, चित्तीं घ्यावाच हा विचार-वर ॥ २७॥

८८० भित्रेपणा असा जर, तुह्मी दावाल तर तुह्मा लोक ।
ह्मणतील काय चित्तीं, आणुनि बदलाच हा तुह्मी रोख॥२८॥

८८१ विस्तीर्ण विप्रराज्या, अंगाबाहेर टाकुनी जातां ।
याचा परिणाम कसा, होइल इकडेच द्या तुह्मी चित्ता ॥२९॥

८८२ नाहीं धनी न चाकर, ऐसें होईल सकल राज्यांत ।
ऐसें करुनी तुह्मी, पळतां कां? हित नसे मुळीं यांत ॥ ३० ॥

८८३ आपण गेल्यावरतीं, कोणाचा पायपोस कोणाच्या ।
पायांत राहिना हो, अडचणि कां व्यर्थ आणितां साच्या ३१

८८४ अमुच्या राष्ट्रावरतीं, परराष्ट्रें घालण्यास झडपेला ।
टपुनी बसली असती, ध्या चित्तीं सत्वरींच वचनाला ॥३२॥

८८५ कारस्थानें मसलति, यांचा किल्ला जनींच गिरवावा ।
तुमची लायकि असली, असतां सद्धीर काय सोडावा ॥ ३३॥

८८६ या संकटसमयीं तुह्मि, कर-पद गाळूनि बैसला आहां ।
त्यायोगें दिल माझा, फाटुनि गेला असे खरें पाहा ॥ ३४ ॥

८८७ इतकें गडबडण्याचें, भ्यायाचें नाहिं कांहिं कारण जी ।
कुंजरची काय कथा, मारिन शतकुंजरांसही आजी ॥ ३५॥

८८८ नारायणमृतिनंतर होति कठिण पातलीच वेळा जी ।
तींतून शिताफीनें, पडलों कीं नाहिं पार सांगा जी ॥ ३६ ॥

८८९ त्या काळाच्या स्थितिचा, विचार करितां मुळींच पाड नसे ।
ह्या गोष्टीचा तिजशीं, नाना चित्तांत ध्या विचार कसें ॥ ३७॥

८९० गाइकवाड तुकोजी, आजचं अस्तास पावले होय! ।
हरभट्ट-वंशजांनीं, करिं कंकण घातलें असे काय? ॥ ३८ ॥

८९१ धीरा न टाकितां तुह्मि, जर आहां राज्यभार पाहाया ।
तर मारिन रणिं अरिला, त्याची कितिशी विशाद पाहा या ३९

८९२ कंपूवाला पुरुनी, उरणारा सबल वीर मी आहें ।
त्याची काळजि नलगे, विचार पाहा खरें किं खोटें हें ॥ ४०॥

८९३ आपण जर एक असूं, तर शत कुंजर तसेच तन्नृपती ।
लावूं धुडकावुनिया, बसवूं गादीवरीहि शत नृपती ॥ ४१ ॥

८९४ कंवर खर्चु देउं नका, हो नलगे व्यर्थ भीति शिंद्याची ।
तच्चमुमाजीं पहिली, बलकटि मुदली न राहिली साची ॥४२॥

८९५ शिंदा वश करुं यत्नीं, नच जमलें जिंकुनी तरी त्याला ।
आणूं वटणीवरतीं, आपण सोडूं नयेच धीराला ॥ ४३ ॥

८९६ बाजीस गादि देणें, न रुचे तर अन्य युक्तिला योजा ।
दुसरा कोणी बसवा, परि नच सोडा अशांत या काजा ॥४४॥

८९७ भाऊ हा न वदेची, गादीविषयीं खरीच कळकळ ही ।
निष्पाप मैत्रि किंवा, बोलविते मन्मुखें असें पाही ॥ ४५ ॥

८९८ नाना मम वचनाचा, विषाद मानूं नका दयालो ह्या ।
उक्तीस मान द्यावा, वेत करा पुण्यपत्तनीं राह्या ॥ ४६ ॥

८९९ सातान्यास न जाउन, एथें राहुन बचाव राज्याला ।
युष्मल्लेखनिची तसि, मम असिची प्रचिति दाउं जगताला" ४७

## ( शार्दूलविक्रीडित )

९०० भाऊंच्या दिलदारिच्या सुवचनें नानांत तेव्हां जरा ।
आला धीर परंतु शील भितरें आलीहि होती जरा ।
शिंद्याच्या चमुची विशेष बसली होतीच धास्ती तया ।
बाजीच्या मतिचा तदा भरवसा ना ये निवे जावया ॥ ४८ ॥

९०१ नाना बावरुनी, पुरंदरहुनी बाजीस, भाऊकडे ।
देऊनी निघती मराठिपुरिला भांबाउनी बापडे ॥
नाना नैकुनि भीउनी पळुनिया गेलाच पाहूनिया ।
भाऊ क्रुद्ध तदा करीं भूतकृती नेण्या करी निश्चया ॥ ४९ ॥

९०२ त्यानें राज्यधुरा स्वतां उचलली बाळोजि तात्याप्रती ।
केलें वश्य तदा ठरे उभयतीं बाजी नको हा पती ॥
स्त्रीला माजि नृपाचियाच चिमणा देऊनिया दत्तक ।
सातान्याहुन आणुनी सु-वसनें देऊं करूं कौतुक ॥ ५० ॥

---

१ सातान्यास. २ हातात. ३ घरलेलें काम.

९०३ बाजी कैद करून आत्मपृतनेमाजी तदा बाळुजी ।
ठेवी नेउन भाउही हिमतिनें आणी चिमाजी अजी ॥
घेई भाउ कडेवरी उचलुनी अप्पा रघूनाथज ।
पट्टयाचे कर दाखवीत चमूला कापीत; आला द्विज ॥ ९१ ॥

९०४ केलें दत्तविधान आणि वसनें आणूनिया अर्पिली ।
द्वाही राज्यि चहूंकडे फिरवुनी केली व्यवस्था भली ॥
भाऊ मुख्य दिवाण होइ कसलें प्रारब्ध त्याचें तदा ।
होतें त्यासमयीं अलभ्य इतरां त्या भाउ पावे पदा ॥ ९२ ॥

९०५ सत्ताधीश बनून राज्यशकटा हाकीच नानाप्रती ।
सल्ला तो पुसुनी तयास विनवी यावें तुझी संप्रती ॥
नाना अस्थिर-बुद्धि आणि भितरा यायां धजेना यदा ।
प्रेमाऽभाव हळूहळू उभयतीं लागेच होऊं तदा ॥ ९३ ॥

९०६ त्यांचा द्वेष अती विकोप मग तो पावे पुढें एकदा ।
नानाचें करि जत हर्म्य कपडा भाऊ जना दे तदा ॥
साताऱ्यांत पुण्यांत मार पकडा ऐसें सुरू जाहलें ।
नाना कैद करावयास चमुला तें भाउनें धाडिलें ॥ ९४ ॥

९०७ भाऊचा हरिपंत पुत्र बहिरू मेहेंदळा त्यासवें ।
देई चार हजार फौज निवती हे वीर तेव्हां जवें ॥
त्यांनीं येउन वाटही पकडण्या नामी जरी घातला ।
कांहीं डाव फसून सिद्ध नच हो नाना पळाला भला ॥ ९५ ॥

९०८ तेव्हां मंडळि येइ पुण्यपुरिला झालें सुरू तेधवा ।
नानाच्या जनतेस कैद करणें राजा विचारा नवा ॥
तैं कोटित्रय घेउनी धन जवें उल्मुक तो सोडिला ।
शिंद्याचा द्विज भाउचा चहुंकडे तेव्हां दरारा भला ॥ ९६ ॥

९०९ त्या बाबा फडक्यास कैद करुनी दुर्गावरी चाकणीं ।
टाकी नेउन, ठोकि पायि बिडिला लेल्याप्रती आणुनी ॥

भाऊचे जन चक्रदेव-सुत त्या नारायणाला यदा ।
येती हो पकडावया परि मिळे तो शत्रुलागीं तदा ॥ ९७ ॥

( आर्या )

९१० नाना फडणीसाची, ह्माडापासून थेटपर्यंत ।
कारस्थानें चालूं, त्यांचा कळलाच सर्व आद्यन्त ॥ ९८ ॥

९११ ह्मणुनी जनता केली, कैद अती भाउनें तयाकाळीं ।
दिधली तन्नामावलि, धांदल सुरु फार फार हो झाली ॥९९॥

९१२ निलकंठराव पागे, याला धरण्यास लोक पाठविले ।
ते मोठे शूर गडी, लोकां देखत हयावरी बसले ॥ ६० ॥

( शार्दूलविक्रीडित )

९१३ संगें घे दश सार्ध लोक अपुल्या शत्रूसमूहाप्रती ।
ठोकी एक सलामि हातिं असि घे फेकी हया संप्रती ॥
तेव्हां तो बुधवार पेठमधुनी फेंकीत खड्गा निघे ।
छाती त्या धरण्या न होइहि कुणा जो तो तयाला बघे ॥६१॥

( आर्या )

९१४ हा शूर परभु गेला, जाउन नानास भेटला पुढतीं ।
भाउचे दैव फिरे, बाजू उलटेच भाउची मग ती ॥ ६२ ॥

९१५ कारस्थानें सगळीं, फसल्यावर धूर्त त्या द्विजप्रवरें[1] ।
नानानें बांधियलें, बाजीशीं सूत्र आपुलें निबरें ॥ ६३ ॥

९१६ नानाच्या अधिकृतिचा, विभवाचा आणि पूर्ण राशतिचा ।
उपभोग भाउ घेई, चिमाजि तैसाच राय-बाजीचा ॥ ६४ ॥

९१७ नाना बाजी झाले, समदुःखी एक ते तयास्थानीं ।
तत्पत्रव्यवहारा, बाळोबा[2] ह्मणुन पोंचवी कोणी ॥ ६५ ॥

---

१ वृद्धानें ( नानानें ). २ बाळोबा कुंजर ह्मणून कागलकराचा कोणीएक वंशज होता. ( हा शिंद्याचा कुंजर नव्हे. )

९१८ नाना बाजी यांची, जमतां चित्तांत एकि नानांनीं ।
कर्तबगारी मतिची, केली सुरुवात दावण्या त्यांनीं ॥ ६६ ॥

९१९ होता झाडास जरी, बसल्या बसल्या तरीहि नानानें ।
पंचिवस हजार सेना, जमविलि तेव्हां तया प्रबुद्धानें ॥ ६७ ॥

९२० बाबा फडक्यालागीं, वश करुनी खाजगी सकल सेना ।
ओढुन घेई मतिनें, ऐसा करिं तें प्रकार तो नाना ॥ ६८ ॥

९२१ महशिराच्या द्वारानें, अळीशीं बांधिलेंहि संधान ।
त्याची जय्यत सेना, सिद्ध करी तो करावयास रण ॥ ६९ ॥

## ( शार्दूलविक्रीडित )

९२२ इंदूराधिप, नागपूरनृपती या सिद्ध केले रणीं ।
फोडाया शिर त्या मदांध करिचें जें शक्य सिंहा झणीं ॥
भाऊच्या मुलुखीं धुमाकुल तदा घालावया लाविली ।
कोल्हापूर-नृपाळ धाजकडुनी ऐसी स्थिती जाहली ॥ ७० ॥

९२३ कोणी एक सखोजिराव ह्मणुनी होता बरा घाडगा ।
त्याची सुंदर कन्यका मिष वरीं शिंद्यास दावी बघा ॥
त्यालाही स्वकरांत आणुन रणीं नाना करी सिद्ध कीं ।
कारस्थान असें प्रचंड करुनी बैसे उगा कौतुकी ॥ ७१ ॥

## ( आर्या )

९२४ नानांनीं शिंद्याशीं, केला होता करारही दुसरा ।
'कुंजरला कैद करा, बसवा गादीवरीच बाजि नरा' ॥ ७२॥

९२५ 'मग मी तुह्मा नगराचा, किल्ला आणीक प्रांतही खासा ।
देईनप्रयुताचा,' यायोगें तुष्ट होइ तो खासा ॥ ७३ ॥

---

१ कुंजराचे ( बाळोबा )

## ( शार्दूलविक्रीडित )

९२६ पेटे हा भडका जरी चहूंकडे नाहीं तरी भाउला ।
अद्यापी कळला तसाच न कळे उन्मत्त बाळोजिला ॥
नानाला पकडावयास फितुरी लोकांप्रती धाडिलें ।
भाऊ हे असिचे खरे न मतिचे शुद्धान्त होते भले ॥ ७४ ॥

## ( आर्या )

९२७ शिंदे होळकरांच्या, सेना नानाकडेस जातां ना ।
भाऊ, चिमाजि, कुंजर; आल्या पकडावयाप्रती यांना ॥ ७५ ॥

९२८ अक्तोंबर सत्ताविसि, रात्रीं बाळोजि कैद शिंद्यानें ।
केले, भाउ कराया, धाडिलि चमु मशीर यवनानें ॥ ७६ ॥

९२९ नारोपंत-सवें ही, सेना होती तया नरानें ही ।
वेळा आहे कैसी, वदण्या मनुजास धाडिलें पाही ॥ ७७ ॥

९३० केले दोन लखोटे, अप्पाच्या[1] एक नावचा त्यानें ।
भाऊ वैद्यास दुजा, द्यायाला कळविलें हि संज्ञेनें ॥ ७८ ॥

९३१ अप्पा बळवंताच्या, घरिं जाउनि त्याजला दिला एक ।
भाऊ परशूरामा, द्याया कथि अन्य तो तया लेख ॥ ७९ ॥

९३२ वैद्य कि पटवर्धन हें, हेलकुन्याला नसेच ठाऊक ।
पटवर्धन भाऊला, उठवुन दिधलाच लेख जो शिलक ॥ ८० ॥

९३३ भाऊ पत्र बघूनी, झाले पोटांत चर्र त्याच्या जी ।
करण्या विचार वेळ न, यास्तव पडले विवंचनेमाजीं ॥ ८१ ॥

९३४ पोषाख लढाईचा, चढवुन अंगांत चिलखताला जी ।
मस्तकिं मंदिल पायीं, जोडा चढवून चालला गाजी ॥ ८२ ॥

९३५ भरजरिच्या शेल्यानें, मध्य कसुनि पाठिशीं असे ढाल ।
खोवी उजव्या बाजुस, बिचवा युद्धास शूर कां भिइल ॥८३॥

---

१ अप्पा बळवंत.

९३६ दोन्ही करांत पट्टे, दोन चढवुनी तया सुवीरानें ।
टाकिलि चौकांत उडी, धाडदिशीं फार फार जोरानें ॥ ८४ ॥

९३७ प्रभुच्या नामस्मरणें, प्रासादांतुन पडेच बाहेर ।
वीरश्रीस ह्मणे जणुं, माझ्या शौर्याप्रती अगे हेर ॥ ८५ ॥

९३८ सीतारामासाठीं, मारुतिनें संकटीं उडी घ्यावी ।
भाऊनें स्वामीस्तव, काळमुखीं मान तसि सदा द्यावी ॥ ८६ ॥

९३९ कल्याणानें जेवीं, गुरुसाठीं शिरहि कापिले होतें ।
तैशीच भाउची कृति, पूज्य असे कोण हो तयापरतें ॥ ८७॥

९४० स्व प्राणाची पर्वा, न करी भाऊ निघेच वाड्याला ।
उठवुनि श्रीमंतांना, तैसें दाजीस आणि बाबाला ॥ ८८ ॥

९४१ स्वारहि पंचशत तदा, हां हां ह्मणतांच येउनी मिळले ।
फुटलें पत्र ह्मणोनी, शत्रूला वृत्त हें सकल कळलें ॥ ८९ ॥

९४२ अर्धालाख रिपूची, सेना दिन् दिन् करीत नगरांत ।
शिरली याकाळिं किहो, सेनाध्वज बाजिचा असे चमुंत॥९०॥

९४३ सेनासागर दिल्ली-दरवाजा-जवळ येउनी थडके ।
भाऊ चिमाजिसह तैं, वाड्यामध्येंच बापडा अडके ॥ ९१ ॥

९४४ वेढा वाड्यास पडे, तेव्हां आकांत जाहला नगरीं ।
सूर्योदय वेळा ती, नियमित कृत्यांत गुंतल्या नारी ॥ ९२ ॥

९४५ संमार्जन सुरु होतें, जाती कित्येक विप्र तैं नदिस ।
सुस्नात नारि जाती, घेउन अर्घ्यादिकास जिनसास ॥ ९३ ॥

९४६ वाटसरू चौकीमधिं, होते ते लागतीहि यायास ।
बाळें दप्तर घेउन, निघती शाळेप्रतीच जायास ॥ ९४ ॥

९४७ सेना बघतां सकलहि, कृत्यें हीं थांबलीच सत्वरिं हो ।
जो तो प्रासादाप्रति, शनिवारीं यावयास लागे हो ॥ ९५ ॥

९४८ भाऊ भाऊ अप्पा, याहुन कानीं नसे दुजा शब्द ।
सर्वां चिमाजिचें हें, चोढवलें वाटलेंच प्रारब्ध ॥ ९६ ॥

९४९ नारायणहत्येपरि, विप्रांचें हनन अन्य होतें हें ।
भासे सकलास असे, दुःखें जो तो धन्याकडे पाहे ॥ ९७ ॥

९५० धर पकड सुरू झाली, तेव्हां वाड्यास लाउनी कुलुपें ।
सचिंत होउनि जो तो, जाउन माडीवरीं जवेंच लपे ॥ ९८ ॥

९५१ मोगल सेनेवाचुन, कोणि दिसेना सबंध रथ्यांत ।
भाऊ नृपाळ अप्पा, पकडाया शिरति सर्व वाड्यांत ॥ ९९ ॥

९५२ पटवर्धन मंडळिच्या, पायांमध्यें विड्यास ठोकाया ।
झाली सुरवात तदा, त्यांची निस्तेज जाहली काया ॥ १०० ॥

९५३ बापू लेल्यास तदा, वंदींतुन सोडिलेंच जलदीनें ।
बहिरव कैद करूनी, रायगडीं धाडिलाच वेगानें ॥ १०१ ॥

९५४ केला कैद अन्यावा, थत्तें रावुहि तसाच केला जी ।
गणपत करमरकरच्या, मुसक्या बांधून नेति त्याशिं अजी १०२

९५५ चिंतोपंतास दिलें, प्रतापदुर्गींच धाडुनी मानें ।
बाळाजि सिंह-गडला, विसाजि पहाऱ्यांत ठेवि सन्मानें॥ १०३॥

९५६ यापरि पंचेचाळिस, लोकांना कैद करुनिया त्यांनीं ।
केले अकांत भारी, गजबजलि नगरि सकल रुदनांनीं॥ १०४॥

९५७ आतां इकडे पाहा, वाड्यामध्यें कशी मजा झाली ।
भाऊ चिमाजि सह तें, अश्वीं बसुनी तयास टांच दिली॥ १०५॥

९५८ पट्टे गर्र गर्र फिरवित, भाऊ उसळेच कंदुकापरि तो ।
अश्वग पंचशत तदा, स्वाम्यवना धावले, खरा गाडि तो १०६

९५९ छातीवर शत्रूच्या, देउन पद भाउ चालला वेगें ।
जुन्नरपर्यंत तदा, भाऊनें नाहिं पाहिलें मागें ॥ १०७ ॥

९६० स्कंधावरिं कृष्णाला, घेउन कापी प्रवात पंखांनीं ।
गरुडापरि नृप घेई, भाऊ लोकांस कापि पक्ष्यांनीं ॥ १०८ ॥

९६१ घंटापथांतुन निघे, वायुजवें भाउ जेधवा वेगें ।
श्री तो आश्चर्य करी, अंगुलि मुखिं घालुनी तयास बघे ॥१०९॥

९६२ घेउन बालनृपाला, बुधवारांतून चालला तडख ।
तत्पृष्टीं अरिसेना, धावे त्याला धरावया चोख ॥ ११० ॥

९६३ पांचप्रहरांनीं तो, शिवनेरीलागिं जाउनी पोंचे ।
तद्रक्षकाजवळ दे, अप्पाला मोद पाउनी साचे ॥ १११ ॥

९६४ नंतर इमानि भाऊ, स्वामीच्या जीवरक्षणाकरितां ।
झगडे शत्रुसवें मग, सापडला अन्तिं शत्रुच्या हातां ॥११२॥

९६५ आनंदराव रास्ते, यांच्या ताब्यांत देउनी त्याला ।
मांडवगणासि नाना, ठेवी कैदेंत सुवीर भाऊला ॥ ११३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

९६६ दैवाची गति ही किती अजब हो आहे पहा एकदा ।
जो होता सचिवाधिकारि परि तो भोगी अतां आपदा ॥
खड्गानें जगतास थक्क करुनी जो गाजलाही अती ।
तो कारागृहिं दुःख भोगुन असे कंठीत काळाप्रती ॥ ११४ ॥

( आर्या )

९६७ दैवगती कालाची, असती मनुजाप्रती अगम्य चला ।
प्रत्येकपदा येतो, अनुभव याचा महीवरी सकला ॥ ११५ ॥

९६८ ' मनुजसुखाची किंवा, दुःखाची पाहिजे करायाला ।
मीमांसा तर करणें, मृतिनंतर ' तत्वविद्ध असे वदला ॥११६॥

९६९ नानाच्या बेतापरि, तात्या कुंजर तसाच भाउ पडे ।
कैदीमाजीं तेव्हां, नाना अर्थात जाहले उपडे ॥ ११७ ॥

---

१ निधडक. २ चंचल. ९६८ आर्येंत सोलनचें म्हणणे आहे.

९७० बाजी प्रधान नाना, ही दुकल पुण्यपत्तनीं आली ।
पूर्वींचा दत्तविधी, अशास्त्र ऐसेंच ठरविती झाली ॥ ११८ ॥

( शार्दूलविक्रीडित )

९७१ बाजीराव अहो नृपालपदिं तो सत्ताविसी मित्तिला ।
बाराव्या महिन्यात श्याण्णव सनीं सत्राशतीं बैसला ॥
साताऱ्याहुन आणुनी सुवसनें बाजीप्रती अर्पिलीं ।
नानानें मग आपुली सचिवता मोदेंच संपादिली ॥ ११९ ॥

साचिव्यलाभनामक दहावा भाग समाप्त

## भाग ११ वा.

[ परिसमाप्ति ]

( स्रग्धरा )

९७२ बाबासाहेब ऐसें उपपद धरुनी गादिला बाजि बैसे ।
नीतीला भ्रष्ट केलें प्रति दिवशिं करी बाजिराजा तमाशे ॥
कोती बुद्धी स्वताची सचिववचनही नायके राव बाजी ।
मूर्खांना मोठमोठ्या अधिकृति नृपती देउनी तोष मोजी ॥ १ ॥

( शार्दूलविक्रीडित )

९७३ शिंद्याचा जम बैसला बहुत तो राज्यांत बाजीचिया ।
त्यानें कैद करून टाकुन दिलें नानाप्रधानास या ॥
या काळींच मरे तुकोजि मुलगे राज्यार्थ ते भांडती ।
युद्धें माजुन पर्वती-नजिक हो आक्रांत झाला अती ॥ २ ॥

(स्रग्धरा)

९७४ तैं शिंद्या काशिरावा धरुन निजकरीं मारि मल्हारबाला ।
सर्वांना बाकिच्यांना पिटवुन दिधली गादि त्या काशिबाला ॥
शिंद्याचें पारडें तें अति वजन धरी घाडगा मुख्य झाला ।
देऊं केलें तयाला विपुल धन मही बाजीनें घाडग्याला ॥ ३ ॥

(शार्दूलविक्रीडित)

९७५ शिंद्यालाहि तशीच द्रव्यकबुली केलीहि होती पुढें ।
द्रव्या मागति ते तदा नृप वदे येऊनिया सांकडे ॥
श्रीमंता धनिका तुह्मी लुटुनिया घ्यावें स्वतः द्रव्य तें ॥
तें ऐकून तसेंच तेहि करिती झाले जना ठोकिते ॥ ४ ॥

९७६ हर्म्यें जाळिति पोळितीहि सुजना रक्षादिचे तोबरे ।
देती आंगहि सोलिती सरसरा कित्येक मेले बरें ॥
तप्तीं तैलिं कितीक लोक तळिति हस्ता सुया टोंचिती ।
तोफेच्या मुखि देति लोक; करिती क्रूरा असी दुष्कृति ॥ ५ ॥

९७७ प्रायश्चित् तयांस देउं ह्मणुनी बंधू नृपाचा करी ।
नामी बेत परंतु राव फसवी मित्राच जो अन्तरीं ॥
शिंद्याला कथि दुष्ट तो नरपती भाऊच माझा तुला ।
पाहे गर्तिंत आणुं सावध असे धिःक्कार ऐशा खळा ॥ ६ ॥

(स्रग्धरा)

९७८ नानासाहेब याची सकल सबलता काढवावी ह्मणून ।
बाजी कैदेंत टाकी अहमदनगरीं त्यास शिंद्याकडून ॥
साताऱ्याच्या नृपाला लिहुन कळविलें बाजिनें " बाबुरावा ।
कैदेमध्येच घाला फडनिस सचिवा वेळ याला न जावा " ॥७॥

(शार्दूलविक्रीडित)

९७९ " ऐसें तुह्मि कराल खास तर मी बंद्या गुलामापरी ।
वागूनी तुमच्यासवें सकलही मानीन आज्ञा शिरीं ॥

पूर्वापार असें जसा उभयतीं संबंध तो तत्वतां ।
मी पाळीन " नृपास लीहुन तदा झाला असें धाडितां ॥ ८ ॥

९८० नानाला बलहीन वाजि करण्या-साठी सुयुक्ती करी ।
आली ती सकला फसून उलटी त्याच्याच अंगावरी ॥
तैं विद्या गुरुची गुरुस पुरतीं भोंवें तसें संप्रती ।
झाले छत्रपती न मोजि नृवरा बोलावि युद्धाप्रती ॥ ९ ॥

९८१ बाबूराव सचीव कैद करितां राजाप्रती वाजिनें ।
थत्ते पाठविले गडा परतुनी मागावया वाजिनें ॥
केलें छत्रपती वदेच सचिवा नानाचिया कैद मीं ।
आहें राखुनि हा सुदुर्ग अपुला आहां तुह्मी विभ्रमीं ॥ १० ॥

९८२ सांभाळा वचनास आपण स्वयें अंकीत माझा असें ।
वागा या पुढतीं द्विजातिपतिहो सत्यास सिद्धी असे ॥
राजा सांगुनिया असेच न वसे जास्ती चमू ठेवूनी ।
सत्ता स्थापुनि आपुली पुनरपी स्वातंत्र्य लाभू झणीं ॥ ११ ॥

९८३ विप्रांची उपयोगि आज पडतें आज्ञाप्रती यादवी ।
ऐसें छत्रपतीस वाटून चमू गोळा करी तो नवी ॥
वाजीला कळतांच वृत्त गमलें ही पेशवाई भली ।
आतां खास बुडून जाऊन तिथें ती भोसलाई अली ॥ १२ ॥

९८४ रास्ते माधव सैन्य देउन सवें सातार-पाळावरी ।
धाडी वाजि परी नृपें जितुनिया फेंटाळिलें त्या दुरी ॥
राजा घेऊन सैन्य वाजिवरती याया निघे जेधवां ।
झाली घाबरगुंडि विप्रपतिची भांबावला तेधवा ॥ १३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

९८५ आतां संकट वारितो कवण हें झालें तयाला असें ।
भेटे त्यास सहाय आज मजला द्या हेंच प्रार्थीतसें ॥

भाऊ शूर तसा महाचतुर तो नाना अशा सद्भया ।
कैदे-माजिच घालि साह्य न मिळे अन्या-कडूनी तया ॥ १४

९८६[1] राज्याचे हित पाहती सचिव ते टाकूनिया बाजिनें ।
लोकांना पिळुनीच द्रव्य हरिती ते निमिले पाजिनें ॥
ऐसे लोक कसे प्रसंगि पडती कामास सांगा बरें ।
बाजीराव तदा सचिंत बनला चित्तीं अती घाबरे ॥ १५ ॥

( वसंततिलका )

९८७ साताराच्या नरपतीप्रति साह्य शिंदा ।
आंतूनि खास असुनी न गणी सु-मंदा ॥
विप्राकडून तुह्मि राज्य हिरून घ्यावें ।
ऐसें नृपास कथुनी चमु धाडि भावें ॥ १६ ॥

९८८ तेव्हां अतां करु कशी तजवीज याला ॥
चिंतेंत राव पडुनी, न सुचे तयाला ॥
तेव्हां जुनें अनुभवी वदले नृपाला ।
भाऊ तुझें हरिल संकट सोड त्याला ॥ १७ ॥

( आर्या )

९८९ आनंदराव रास्ते, यांच्याकरवीं सुवीर भाऊंनीं ।
सांगितलें बाजिस त्या, "टाकिन मी संकटास या हरुनी" ॥१८॥

९९० पटवर्धनवीरांचा, करूनी बींमोड सर्व संपत्ती ।
त्यांच्या जाहागिरिला, घशांत घालूं असेच विभ्रमती ॥ १९ ॥

९९१ परि या धामधुमीस्तव, भाऊला सोडणेंच भाग पडे ।
सोडी निरुपायानें, बाजी परि मानसांत खाइ खडे ॥ २० ॥

९९२ भाऊ वाईजवळीं, सेना जमवी तदा झपाट्यानें ।
प्रावृट् काळ असे तो, जलधारा पडति फार जोरानें ॥ २१ ॥

१ मूर्ख बाजीला.

९९३ दाहा हजार सेना, तरि जमवी भाउराव सत्वरिं तो ।
अरिवरि जायास निघे, जो समरीं अरिमदास हारवितो ॥ २२ ॥

९९४ कृष्णा वेण्यादि नद्या, तुफान होऊन चालल्या होत्या ।
पाहुनि उतार भाऊ, सेना नेई रिपुकडे मग त्या ॥ २३ ॥

९९५ वेढा साताऱ्याला, देउन भाऊ तुटून वरि पडले ।
बेसावध शिवराजे, पाहुन भाऊस फार घाबरले ॥ २४ ॥

९९६ रास्त्यास जिंकिलें मीं, दौलतशिंदा असे मला मदती ।
पाउस मोठा आहे, धुंदीमध्येंच या असे नृपती ॥ २५ ॥

९९७ नृपजनता घाबरली, परि तद्बंधू चतूरसिंग असे ।
सेना जमवुनि कसितरि, भाउवरी यावयास पाहतसे ॥ २६ ॥

९९८ संधीं साधुनि आला, सिंहावरि धावतो मदांध करी ।
तैसा भाउवरी ये, रवि कैसा सापडेल बाल-करीं ॥ २७ ॥

९९९ दशोन पाउण शत जरि, वर्षं भाऊस तेधवा होती ।
कौशल्यीं उत्साहीं, कमतरता जाहली तरी नव्हती ॥ २८ ॥

१००० ज्वानींतिल बांडापरि, भाऊची चालली असी होती ।
तद्बंधुचीहि तैसी, चतुरांच्या मानसीं भरे भीती ॥ २९ ॥

१००१ एलाजि मोहित्याला, स्वर्गीं धाडूनि भाउंनीं दिधलें ।
दुर्गाजि कुशाबा हे, जखमांनीं भूमिच्यावरी पडले ॥ ३० ॥

( अनुष्टुप् )

१००२ तेव्हां चतूरसिंगाला ॥
माघारें फिरणें पडे ॥
सेनाजी मोहिते मात्र ।
युद्धाच्या तें भरीं पडे ॥ ३१ ॥

( स्रग्धरा )

१००३ सेनाजी मोहिते तो द्विजचमुपतिला दाखवीनाहि पाठ ।
राऽत्याच्या माधवीं तो तुटुनच पडला छेदण्यालागिं कंठ ॥
शिप्यानें भाउच्या तैं झडकरिं कर त्या मोहित्याचा असीनें-।
कापूनी टाकूनीया विजय मिळविला फार मोठा जवानें ॥३२॥

( शार्दूलविक्रीडित )

१००४ राजाचें अवशिष्ट सैन्य सगळें धांवावया लागलें ।
भाऊंनीं शहरीं शिरून नृपती कैदेमधीं ठेविले ॥
त्यांच्या बंधुस भाउंनीं पिटविलें तेव्हांच कोल्हापुरीं ।
भाऊ गोंधळ शांत तो जलदिनें तेथील भारी करी ॥ ३३ ॥

१००५ मोठा शूर तसा चतूर हुरुपी होता चतुर्सिंगजी ।
मार्गीं पालिस जाउनी जमवि तो युद्धार्थ सेना अजी ॥
रात्रीं देवपुजा करून निटिलीं भंडारही लाविला ।
प्रातःकालिच वारणा उतरुनी रास्त्यावरी धांवला ॥ ३४ ॥

१००६ रास्ते सावधही परी अरिवरें कापूनि त्याच्या जना ।
शौर्यानें लढुनी तयास जितलें कोणास तो मोजिना ॥
हातानें तरवार झेलिते मिळे राजास कोल्हापुरीं ।
रास्ते जिंकुनि यापरी यश वरी तेव्हां रणीं तो अरी ॥ ३५

१००७ भाऊ नाश करून छत्रपतिचा बाजीस भेटावया ।
आला सद्यश मेळवून मग तो वन्दी नृपाला तया ॥
कारागारिं पडून दुःख वरुनी तो बाजिचें जेधवा ।
वारी संकट दे न मानहि परी बाजी तया तेधवा ॥ ३६ ॥

१००८ जैसी पौरुषहीन सुंदर नरा लावण्ययुक्ता परी ।
लाभावी परि चीज होत नसते खिन्नान्त हो सुंदरी ॥

तसेची अविचारि भूमिपतिच्या राज्यामधीं सद्गुणी ।
मातीमोल बनून मुख्य असती तेथें सदा दुर्गुणी ॥ ३७ ॥

१००९ सेनेचा थकला पगार झणुनी भाऊ सवें आणि ती ।
बाजीराव विचार कांहिं न करी " फांटा न सैन्याप्रती ' ॥
कां तुझी दिधला " असाच टपका भाऊवरी ठेवुनी ।
त्याला दंड करी प्रयूत रुपये मूर्खांत मेरूमणी ॥ ३८ ॥

१०१० ज्याला युद्धविशारदीं नृपतिनीं माना धनाला दिलें ।
तैनाती इतमाम पालखि करी इत्यादि संपादिलें ॥
ज्याचें युद्ध बघून भीष्म सकलां भासे अशा भाउला ।
बाजी दंड करी प्रयूत रुपये बक्षीस हें त्याजला ॥ ३९ ॥

१०११ केला दंड परी पुनः फिरविणें हो प्राप्त त्या बाजिला ।
टिप्पू त्रासच पेशव्यास अणखी द्यायाप्रती लागला ॥
तेव्हां भाउकडे नृपास बघणें आलें प्रसंगीं यदा ।
बाजीलागिं नमून भाउ वदला खालील अटी तदा ॥ ४० ॥

( आर्या )

१०१२ " कर्णाटकांत मजला, तैसें त्या धारवाड-भागांत ।
गांवें इनाम मिळतां, घेतों तरवार आज हातांत " ॥ ४१ ॥

१०१३ " जो प्रयुत दंड झाला, तो व्हावा माफही मला आज ।
तर या मोहीमेचें, घेतों अंगावरींच मी काज " ॥ ४२ ॥

१०१४ या अटि कबुल करूनी, भाग पडे धाडणें द्विजाति-वरा ।
भाऊ ससैन्य मग तो, लागे येण्यास दक्षिणे समरा ॥ ४३ ॥

१०१५ यासमयींच दुजीही, गोष्ट घडे तीमुळेच नानाची ।
सुटका बंदींतुन हो, कथितों ती आपणाप्रती साची ॥ ४४ ॥

१०१६ दौलतजी शिंद्याला, माता सापत्न तीन होत्या जी ।
बंदोबस्त तयांचा, मान मरातब न ठेविला आजी ॥ ४५ ॥

१०१७ माता लहान तिजवर, शिंदा तो वाकडी नजर ठेवी ।
गृहकलहाग्नी माजे, लाजेनें तो तदा शिरा नमवी ॥ ४६ ॥

१०१८ बाजीरावभ्राता, जो होता अमृतराय नामक हो ।
त्यानें तिघीजणींचा, पक्ष धरुनि लाभला सुधन लाहो ॥ ४७॥

१०१९ बाजिभ्राता, शिंदा, यांचें रण चालण्याप्रती लागे ।
काशीरावें अमृता, साह्य दिलें चांगलें महाभागें ॥ ४८ ॥

१०२० द्विजपति निजाम याशीं, आंतुनि संधान बांधुनी होता ।
टिप्पूहि साह्य व्हावा, यास्तव धाडी वकील तत्प्रांता ॥ ४९॥

१०२१ ऐसा गोंधळ माजे, दहशत बाजीप्रती पडावीच ।
नाना फडणिस याला, शिंदा सोडी ह्मणूनिया साच ॥५०॥

१०२२ दोघांचा कलह तिजा, पावे बहु लाभ यापरी घडलें ।
नानाची कैदेंतुन, सुटका होऊनि मोकळे झाले ॥ ५१ ॥

१०२३ नानाची बाजीला, दहशत पडुनी त्यजीहि तद्वैर ।
शिंद्याशीं स्नेह करी, तोही फिरवी समस्त वीरवर ॥ ५२ ॥

१०२४ तिघिंही मातांची मग, समजुत करि देउनी धनालागीं ।
वार्षिक उत्पन्नासहि, आलें शांतत्व तें तयाजागीं ॥ ५३ ॥

१०२५ नानाची बाजीची, पुनरपि मैत्री जडे मनें विमल ।
भाऊंचा दंड तदा, केला मग माफ बाजिनें सकल ॥ ५४ ॥

१०२६ भाऊ टिप्पूवरतीं, स्वारीस्तव जावयास निघणार ।
तों करविरपाळानें, धांदल राज्यांत मांडिली फार ॥ ५५ ॥

१०२७ त्याची खोडकि मोडा, ऐसा केला हुकूम बाजीनें ।
भाऊनें अतिमोदें, त्याच्यावरि चाल केलि त्या जीनें ॥५६॥

१०२८ कोल्हापुर-वृत्ताला, पूर्वींच्या सांगतोंच यासमयीं ।
छत्रपती शिवबाचा, कुलज असे हा नृपाल तूं पाही ॥ ५७॥

१०२९ पटवर्धन वीरांचीं, संस्थानें होति त्या प्रदेशाला ।
झणुनी करविरपालीं, द्यावा संत्रास नित्य विप्रांला ॥ ८८ ॥

१०३० त्यांचीं युद्धं चालति, शत्रू बनुनीच राहिले होते ।
घोंडो गोखले यांचे, त्या बाजूलाच प्रांत होते ते ॥ ८९ ॥

१०३१ स्वाऱ्या करीत तेही, कोल्हापुरिं जाउनी नृपावरतीं ।
धन-वसनें लाभुनिया, मोठें सयश जवें सकल वरिती ॥ ९०॥

१०३२ सवाइ-माधव-मृत्यू-नंतर, धांदल पुण्यांत माजे जी ।
ती-मध्यें मुख्य असे, भाऊ योद्धा रणामधीं गाजी ॥ ९१

१०३३ झणुनी करविरपाला, यांच्या प्रांतांत धाड घालाया ।
संधी लाभे नामी, ते घेती भुदरदुर्गमा राया ॥ ९२ ॥

१०३४ भास्कररावापासुन, मनोळि घेऊनिया चिकोडीला ।
घेई करविरपालक, सुपीक भोंतालिच्या प्रदेशाला ॥ ९३

१०३५ हुबळी नलमाधि शहरें, कर्णाटीं लुटुनु फस्तही केली ।
संकेश्वराजवळच्या, वल्लभदुर्गींहि चाल मग केली ॥ ९४ ॥

१०३६ संवदलग्याचा किल्ला, आणुनि ताब्यांत एक स्वारीला ।
गोकाकेवर केलें, सपाद लक्षास घेइ खंडणिला ॥ ९५ ॥

१०३७ कित्तूरा मग गेले, खंडा, घेऊन कुन्नुरा गेले ।
देसाई मारुनिया, लुटुनी उध्वस्त तें नगर केलें ॥ ९६ ॥

१०३८ पाच्छापुरास जाउन, तेथुनिही खंडणी जमा केली ।
करवीरनृपाळानें, ऐसी बंडाळि फार माजविली ॥ ९७ ॥

१०३९ नाना भाऊ यांच्या, वैरत्वा पाहुनी नृपानें ह्या ।
जाऊन तासगांवा, केल्या हर्म्यांस जाळुनी लाह्या ॥ ९८ ॥

१०४० तें तासगांव लुटुनी, चंदनि वाडा सबंध जाळून ।
रास्त्यावरि चाल करी त्याला असिनेंच कादि कापून ॥ ९९ ।

१०४१ हें बंड फार माजे, भाऊची होई योजना वरतीं ।
भाऊनेंही अरितरि, केली हो चाल सत्वरीं मग ती ॥ ७० ॥

१०४२ टिप्पूवर जाण्याला, जी होती सिद्ध ती चमू सारी ।
भाऊस देउनीया, कथिलें जिंका अरिप्रती समरीं ॥ ७१ ॥

१०४३ बाजी आणिक शिंदे, दुसरे कित्येक शूर सरदार ।
त्रिंशत् हजार अश्वग, साहा हाजार घेति पद्ग-वर ॥ ७२ ॥

१०४४ भाऊच्या मदतीला, झाले जायास सिद्ध समराला ।
प्रावृट् संपू द्यावी, ऐसा पुढतीं विचार हो ठरला ॥ ७३ ॥

१०४५ परि धीर भाउला त्या, धरवेना क्षुधित जेविं वाघास ।
कळपाजवळ अजांच्या, वाटे ध्यावाच जाउनी घास ॥ ७४ ॥

( शार्दूलविक्रीडित )

१०४६ कोल्हापूरकरावरीं झडकरीं क्रोधाप्त तो तेधवा ।
घाली झाप मुलूख सर्व रिपुचा उध्वस्त केला नवा ॥
ज्याला माहित फक्त मार धर घे ठोका हणा हें असे ।
तो भाऊ अपमान सोशिल कसा शत्रूस ठोकीतसे ॥ ७५ ॥

१०४७ गेलीं पाउण शंभरा दश उणीं वर्षें जयाचीं रणीं ।
क्रोधाग्नी भडके नृपालकृतिनें ज्याचा अती तत्क्षणीं ॥
माशा मारित दारिं काय म्हणूनी बैसेल सांगा कसें ।
तो भाऊ अपमान सोशिल कसा शत्रूस ठोकीतसे ॥ ७६ ॥

१०४८ प्रावट्काल निघून ज्यास दसरा येईल हो तोंवरी ।
धीराला धरवे न शत्रुवरतीं तो भाउ हल्ला करी ॥
हाहाकार घटप्रभा मलहरा यांच्यामधीं जाहला ।
तो भाऊ समशेर घेउन करीं सेनेस बोले चला ॥ ७७ ॥

१०४९ भीष्माचार्य जसा प्रवृद्ध असुनी जाळावया लागला ।
सेना जिष्णुकडील तेविं समरीं भाऊ जना भासला ॥

सारा दक्षिण देश जाकुन झणीं हा टाकितो बांटलें ।
ज्याला वाट फुटेल लोक तिकडे धांवावया लागले ॥ ७८ ॥

१०९० भाऊ वृद्ध असूनि देश अपुला आक्रान्त केला असे ।
पाहूनी करवीर पालक मनीं लाजे वदे हें कसें ॥
भीती पाउनि मानसीं दणदणे धावें तयाचें यदा ।
भाऊ मारुन टाकितो स्वजनता वाटे नृपाला तदा ॥ ७९ ॥

१०९१ भाऊ घेइ समस्त ठाणिंहि करीं किल्ले तसें घेतले ।
जागोजाग पराभवा करुनिया राजास भांबाविलें ॥
प्रायश्चित्त दिलें नृपास-पुरतें आलें तया सांकडें ।
भाऊचा मग कीर्तिदुंदुभि जगीं वाजेच चोहोंकडे ॥ ८० ॥

१०९२ फत्ते होउनि भाउची जगवरीं कीर्ती फिरूं लागली ।
कोल्हापूर-नृपा अवेश चढला पाहूनि कीर्ती भली ॥
सातारा-नृप-बंधुही चतुरजी तेव्हां नृपाला मिळे ।
' भाऊला रणिं मारुं वा मरुं ' असें बोलोनि ते चालले ८१

( स्रग्धरा )

१०९३ आतांपर्यंत भाऊ करविरजनता यांजमध्येंच झालें ।
हें मोठें युद्ध; राजे चतुरसह परी युद्ध द्यायास आलें ॥
सोळा हाजार सेना महिस थरथरी घेउनी त्या चमूला ।
वेगें राजा लढाया सर सर-सरुनी भाउशीं खास आला ८२

१०९४ [ आम्हाला बंदुकीचा श्रवुनिच रव तो धस्स पोटांत होतें ।
खड्गाला पाहतांची गर गर फिरती नेत्र भोंवोळ येते ॥
ऐसें नामर्द झालों परि कत अपुल्या पूर्वजांना लढाई ।
भाजी पर्सातली वा स्वकरगत मळी वाटली ध्यानिं घेई ८३ ]

१०९५ राजा कोल्हापुरचा चतुरसह करी चाल भाऊवरी जैं ।
खेळे बुद्धीबळाच्या निजशिबिरीं मुदें भाउ डावाप्रती तैं ॥

तथूनीत्रा चमूला हुकुम कळवितो ' यापरी वागुनीया ।
हल्ला ऐसा करा जी ' चतुर किति रणीं भाउ ञ्या पाहुनीया ॥८४

( आर्या ) युग्म

१०५६ नेपोलियन् जसा तो, गेला फ्रान्सांत होउनी गाजी ।
आंग्लीं वेलिंगटन् वा, मोल्टके वीर जर्मनी-मार्जी ॥ ८५ ॥

१०५७ द्वापारीं भीष्मार्जुन, किंवा त्रेतायुगीं जसा राम ।
धोरोदात्त रणामधिं, तैसा हाही असे परशुराम ॥ ८६ ॥

१०५८ शत्रुद्वय सन्निध ये, ऐकुन खड्गास हस्तकीं घेई ।
स्वार हयावर होई, शह द्याया त्या नृपावरी जाई ॥ ८७ ॥

१०५९ तंबूतून निघे तों, अपशकुनीं फार पुरविली पाठ ।
तिकडे लक्ष न देतां, अरिला नच दाखवी तरी पाठ ॥ ८८ ॥

१०६० रत्नाकर अप्पाच्या, जाई तुटुनी फळीवरी जलद ।
कत्तल सुरू करी तो, करितो धारांनिं जेविं तो जलद ॥८९॥

१०६१ रत्नाकर अप्पाच्या, लोकांचीं पाडिलीं शिरें समरीं ।
तेव्हां गोंधळ होउन, लागे पळण्यास ती चमू सारी ॥ ९० ॥

१०६२ मोठे मोठे योद्धे, खड्गानें भाउच्या मरुन गेले ।
त्यांचा राशी पडला, ध्वज-हत्ती कितिक हस्तकीं आले ॥ ९१ ॥

१०६३ रत्नाकर-अप्पाच्या, लोकांचा उडवितां बहू सप्पा ।
सप्पासप्प असीनें, तेव्हां मठ्यास येई तो अप्पा ॥ ९२ ॥

१०६४ पडली गांठ तदा त्या, भाऊची आणखी शिवाजीची ।
अस्थिद्वेष अशांची, सिंहाची आणि जैशि वाजीची ॥ ९३ ॥

१०६५ दोघेहि शूर मोठे, इच्छा दोघांसही असे एक ।
' अरिशिर समरीं तोडूं ' अश्वांची करिति ते क्षणीं फेंक ॥ ९४ ॥

( युग्म )

१०६६ वाटर्लूच्या समरीं, किंवा केनी अणीक ज्ञामांत ।
कोर्थिजच्या प्रवीरें, रोमविरें मांडिलाच आकांत ॥ ९५ ॥

१०६७ तैशाच कृती घडल्या, पट्टण-कुंडीमधीं लढाईच्या ।
गंभीर सिंहनाद्, उभय चमू करुनि धावल्या साच्या ॥ ९६ ॥

१०६८ अजवरि नाश करूनी, त्रास दिलेला पुढें उभा राहे ।
मूर्तिमंत तयांच्या, उसनें फेडावयास सिद्धच हे ॥ ९७ ॥

१०६९ खड्गांत हातखंडा, दोघांचाही असून समरजयी ।
दोघे होते योद्धे, कोणाला जय मिळेल त्यासमयीं ॥ ९८ ॥

१०७० भीष्मार्जुनाप्रमाणें, युद्ध-कला-निपुण चांगले होते ।
माजुनि युद्ध भयंकर, रिपु-चमु खपविति रणांत फारचि ते। ९९।

१०७१ सर्दार लोक तेव्हां, स्वामीला साह्य आपुल्या द्याया ।
दोघाकडील आले, वैमानिक देव येति पाहाया ॥ १०० ॥

१०७२ हतवाईवर आले, धुळिनें अंधार मजला भारी ।
तोडा मारा कापा, ऐसा रव माजला तया समरीं ॥ १०१ ॥

१०७३ सगळ्याच्या समशेरी, बिजलीपरि लागल्याहि चमकाया ।
खण खण अवाज करिती, शत्रुशिरें पाडिती महीवरि या। १०२

१०७४ रक्तप्रवाह वाहति, मासाचा चिखल होउनी गेला ।
घामानें रुधिरानें, तेव्हां जो तो दिसेल भिजलेला ॥ १०३ ॥

१०७५ भाऊ तुफान होउन, दोन्ही हातांत घेउनी पट्टे ।
चौफेरी फेकीनें, अरिचे मारी कितीक तो पठ्ठे ॥ १०४ ॥

१०७६ इतक्यांत शूर राजा, सेनापति आणि तो चतुरसिंग ।
दोघां गाइकवाडीं, भाऊला घेरिलें तदा सांग ॥ १०५ ॥

१०७७ ज्यापरि अभिमन्युवरी, केला हल्ला सहा प्रवीरांनीं ।
तैसा या पापांनीं, केला भाऊवरीहि क्रुद्धांनीं ॥ १०६ ॥

१०७८ शस्त्रप्रहार केले, तेणें मूर्च्छीत जाहला भाऊ ।
वर्षे पन्नास जना, वाटे जो मूर्तिमानसा बाऊ ॥ १०७ ॥

१०७९ यासमयीं भाउ पडे, धरणीवरि तो पुनः न उठला जी ।
पडला भाउ असा तैं, दुःखद रव मजला रणा-माजी ॥ १०८॥

१०८० पक्षांत करविराच्या, जयजय ऐसा ध्वनी तदा चाले ।
पटवर्धन-नेत्रांतुनि, अश्रूंचे ओघ वाहते झाले ॥ १०९ ॥

१०८१ टिप्पूस हैदराला, कृतांतवत् भासला रणा-माजीं।
दोघां माधवरावा, भासे मित्रापरीच जो गाजी ॥ ११० ॥

१०८२ तो भाऊ पडतांची, वाताहत जाहली सुविप्रांची ।
त्यासमयीं तच्चमु ती, गेली भांबाउनी सकल साची ॥ १११ ॥

१०८३ भाऊचे सुत अप्पा, होउनि घायाळ संगरीं पडले ।
भिन्नतवारांनें ते, त्यांतुनही चांगले बरे झाले ॥ ११२ ॥

१०८४ एका विप्राकरवीं, भाऊचें प्रेत जाळवी राजा ।
त्यांची क्रियाहि करवी, ज्याला सानंद सर्व नित्य प्रजा ॥ ११३॥

१०८५ पट्टणकुडिरणरंगीं, जेथें पडले प्रतापि भाऊ ते ।
छत्रीची साक्ष तिथें, स्मारक ह्मणुनी जना अजुन दिसते ॥ ११४॥

( शार्दूलविक्रीडित )

१०८६ वार्ता ऐकुनि दुःख-कारक पुणें-एथील लोकांप्रती ।
दुःखावेग न साहुनी पटादिशीं भूमीवरी घालिती ॥
हो आक्रांतहि तासगांवि तसला कन्या स्नुषा स्त्रीसती ।
आक्रंदोनि कपाल वक्ष पिटिती आली तयां दुःस्थिती ॥ ११५ ॥

१०८७ जन्मापासुन संगरीं शरिर हें सद्भाउनें अर्पिलें ।
विश्वासूकपणें धन्यावरि सदा सद्भक्तिला ठेविलें ॥

सेवेमाजिंच देह हा झिजविला वागे महा-नीतिनें ।
कोणाचा करि घातपात न कधीं निष्पाप होता मनें ॥ ११६ ॥

१०८८ होता शूर खरा द्विजातिवर हा योद्धाहि भीष्मापरी ।
विप्राचें ऋत तेज दाखवि जना सत्या असे वैखरी ॥
[ ' हे भित्रे कमजोर हिंमत नसे विप्रांस ' कांहीं जपी ।
(गप्पा) वल्गा मारिति तेज दाखवि तयां भाऊ करूनी रण ॥ ११७ ॥

( युग्म )

१०८९ हिंदूलोक न धीर-वीर; भितरे भारी असे बोलती ।
कांहीं लोक परंतु सर्व मजला ते अज्ञसे वाटती ॥
बाजीराव शिवाजि माधव रघू बापू तसें गोखले ।
हे भाऊ हरिपंत वीर फडके मल्हारजी चौगुले ॥ ११८ ॥

१०९० राणोजी जनकोजि शूर वरते झादाजि शिंदा असे ।
शोभे वीर चकाकुनी भरत-भू आतां नसे हो तसें ॥
सोडावाटर ब्रँडि पीउन वरी खाती सदा बिस्कुटां ।
वाणी लागट बोलती चघळती तोंडामधें चीरुटा ॥ ११९ ॥

१०९१ होणें कांहिं करांतुनी न कधिंही वाचालता सत्वरीं ।
मोठ्यांचे गुण मोडुनी वदति त्या निंदायुता वैखरी ॥
ऐसें संप्रति लोक वागति सदा हांजीत वेळाप्रती ।
खेळामाजि तसा कुटाळकिमधीं निंदेंत वा लोटती ॥१२०॥ ]

## भुजंगप्रयात.

१०९२ असो सांग झाली क्रिया सर्व त्याची ।
चमू सर्व गेली रणांतून साची ॥
जगामाजिं कीर्ती करुनी निघाला ।
विमानांतुनी भाउ स्वर्गास गेला ॥ १२१ ॥

१०९३ जयाचा गिरावा जगानें सु कित्ता ।
असा वीर भाऊ महाशूर होता ॥

परस्त्री जयाला स्वमाताच वाटे ।
सदा सर्वदा प्रेम चित्तांत दाटे ॥ १२२ ॥

१०९४ धन्याची सु-सेवा सदा मुख्य मानी ।
धनाची न इच्छा असे तो इमानी ॥
स्वतांचा जरी प्राण जाईल जावो ।
तरि स्वामिकार्यामधीं शुद्ध भावो ॥ १२३ ॥

१०९५ महाशूर टिप्पू महाशूर अल्ली ।
तयाची हबेलंडिही फार केली ॥
महाशूर आंग्लांस दावूनि हात ।
क्षणामाजिं केलें तयांनाहि चीत ॥ १२४ ॥

१०९६ महादाजि शिंदा लढाया जितूनी ।
वजीरी सवाईस अर्पीहि मानी ॥
स्वतां पेशव्याचाहि व्हावें दिवाण ।
मनीं आणि शिंदा परी व्यर्थ जाण ॥ १२५ ॥

१०९७ तयालागिं हाणून पाडीच भाई ।
स्वतांच्याच हेतूस सिद्धीस नेई ॥
अशा कारकीर्दीप्रती गाजवी हा ।
विमानांतुनी स्वर्गिं जाईच प्राहा ॥ १२६ ॥

१०९८ जयालागिं स्वामी अतीमान देई ।
कृतांतापरीही अरी ज्यास भीई ॥
जयाची पराभूति झाली नसेच ।
असा वीर भाऊ महाशूर साच ॥ १२७ ॥

१०९९ सदा आत्मकार्या असे सिद्ध गाजी ।
महा भव्य ऐसा जयाचा सुवाजी ॥
रणीं अग्रभागीं असी घेउनीया ।
विजेच्या परी जो चकाके लढाया ॥ १२८ ॥

( आर्या )

गोसावी उपनामक, सूनूनें एकनाथपंताच्या ।
गोविंदानें रचिला, ग्रंथ जना वाचण्या भरतभूच्या ॥ १ ॥

कुलदैवत खंडोबा, त्याला हा ग्रंथ अर्पिला भावें ।
यत्पादरजें मुक्ती, शक्ती, भक्ती धनादि लाभावे ॥ २ ॥

समाप्त.

# आश्रयदात्यांचीं नांवें.

७।

श्रीमदानंद स्वामी मठ खानापूर.
श्रीमच्छंकराचार्य स्वामी मठ संकेश्वर .... ....
रा. सा. गणपत जयवंत रेघे.
रा. हरी सखाराम खानोलकर.
रा. सा. मंगेश जिवाजी तेलंग बी. ए. एल्. एल्. बी. ....
मे. एज्यूकेशनल इन्स्पेक्टर ग्वाल्हेर
मे. डायरेक्टर साहेब वऱ्हाड
रा. ब. रामकृष्ण सखाराम आठवल्ये एम्. ए. .... ....
रा. ब. सि. व्ही. वैद्य एम्. ए. एल्. एल्. बी. .... ....
मे. विद्याधिकारी बडोदें.
श्रीमंत आनंदरावजी पवार धार.
श्रीमंत बाळासाहेब राजे घोरपडे मुधोळ. .... ....
श्रीमंत नारायणराव ऊर्फ बाबा साहेब घोरपडे. ....
रा. ब. लक्ष्मण गोपाळ देशमुख.
न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे
रा. सा. आर. व्ही. गद्रे डे. ए. इन्स्पेक्टर सातारा. ....
रा. सा. डेप्युटी इन्स्पेक्टर मुंबई.
रा. सा. विष्णू गणेश नाडकर्णी हेड् अकौंटंट. .... ....
रा. दत्तात्रय गणेश नाडकर्णी.
,, वासुदेवराव वागळे.
,, बाबूराव मायगावस देसाई.
,, तोताराम व्यंकटेश कापशे.
,, शामराव बाळाजी कुलकर्णी.
,, गोविंद शेटजी इंगळे.
,, वासुदेव नारायण केळकर.
,, कृष्णाजी भास्कर काळेले.
,, बळवंत गणेश वांगीकर वकील
,, बळवंतराव दुबळे वकील.
,, चिंतामण दाजी वाघ वकील.
,, नारायणराव मेंगदे वकील.
,, नारायण कृष्ण वैद्य मास्तर.
रा. सा. लक्ष्मणराव सोमण.
,, कृष्णराव गणेश तेल्हारा.
सेक्रेटरी ने. ज. ला. खामगांव.
रा. शांताराम अनंत देसाई.
श्रीमंत बाळासाहेब हेरेकर.
रा. कृष्णाजी विष्णू आचार्य मास्तर
,, नारायण हरी चिटणीस मास्तर
,, महादेव नारायण कुलकर्णी मा.
रा. ब. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर

रा. सा. बालकृष्ण वामनाजी गव्हाणकर.
रा.ब. रामकृष्ण गोपाळ भांडारकर
रा. सा. पी. एन्. पाटणकर.
,, विश्वनाथ हरी जोशी.
रा. महादेव वासुदेव जोशी.
रा.सा. श्रीपाद गोविंद जोशी.
श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन मिरज
श्रीमंत बाळासाहेब पंत औंध.
श्रीमंत बाळासाहेब आंबोटीकर.
श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन मिरज
रा. गणेश विष्णू शेंडे.
रा. सा. कृष्णराव गरवारे.
,, गजानन रावजी कणेकर स. ज.
,,एकनाथ सुबराव कुलकर्णी स.ज.
श्रीमती जमनाबाई साहेब गाइकवाड
रा. सा. व्यंकट मार्तंड.
रा.ब. मोरेश्वर गोपाळ देशमूख.
श्रीमंत आप्पाजीराव मोरे.
,, एच्. एच्. धी. चीफ ऑफ भोर.
,, नारायण सदाशिव राजोपाध्ये.
डा. सदाशिव वामन काणे.
श्री. सौ. चिमणाबाईसाहेब.
श्री. योगेश्वरराव देशपांडे.
,, नारायणराव लक्ष्मण जाहागि०
,, माधव नारायण किंवे.
,, मल्लाप्पा विरुपाक्ष सिंत्रे.

रा.सा. लक्ष्मणराव गोळवलकर.
,, गोविंद आत्माराम पोतनीस.
,, विष्णू शिवराम.
श्रीमंत बाबासाहेब पवार देवास.
रा. सा. विष्णू मोरेश्वर महाजनी एम्. ए.
रा. ब. बळवंतराव सर न्यायाधीश
रा. सेक्रेटरी ने. ज. ला. जत.
,, कृष्णाजी नारायण सिरसाट.
श्रीमंत वंटमुरीकर देसाई.
मे. ए. इन्स्पेक्टर करवीर.
रा. काशिनाथ महादेव भीमे.
रा.सा.रामचंद्र नारायण जोगळेकर
रा. सा. गोविंदराव लिमये वकील
रा. वासुदेव बाळाजी जतकर.
रा. विश्वनाथ पुरुषोत्तम देशपांडे.
रा. सा. गोपाळ रामचंद्र पिटके.
रा. सा. निळकंठ नारायण भट.
रा. सा. डे. ए. इन्स्पेक्टर नासिक
रा. सेक्रेटरी ने. ज. ला. सासवड
,, ,, ,, नासिक.
,, ,, ,, ,, धुळें.
,, ,, ,, मालेगांव.
,, ,, ,, चिकोडी.
अध्यक्ष शिक्षक समाज एलिचपूर.
रा. ब. व्यंकटरावजी कुप्पीकर.
अध्यक्ष शिक्षक समाज नांदूरा.

श्री. माधवराव साहेब बावडा.
,, आबासाहेब विशाळगड.
डे. ए. इन्स्पेक्टर मुधोळ.
कृष्णाजी तमाजी कोन्हेर.
रा. सा. रघुनाथ गंगाधर भडभडे.
रा. ब. श्रीनिवासराव चिटगुप्पी.
मे. ए. इन्स्पेक्टर म्हैसूर.
रा. सा. कृष्णराव जयराम.
रा. सा. गोविंद विष्णू श्रीखंडे.
रा. सा. बालकृष्ण रामचंद्र बखले
रा. सा. हरी महादेव पंडित.
रा. माधव विनायक पटवर्धन.
रा सा. शामराव विठ्ठल वकील.
रा. सा. धोंडो रामचंद्र अभ्यंकर.

रा.सा. गोपाळ रामचंद्र रजिष्टर.
रा. सा. तुकाराम गोविंद.
श्री. बापूसाहेब पटवर्धन.
रा. ब. गणपतरावजी लोथे.
रा.सा. से. ने. ज. लायब्ररी कागल.
रा. रा. माधव नारायण सातपुते.
रा. ब. धोंडो शामराव गरूड.
रा.सा. डे. ए. इन्स्पेक्टर रामदुर्ग.
रा. रा. केशव दयाराम
रा. सा. वैकुंठराव वाघ.
रा. ब. गणेश कृष्ण खापरडे.
रा. रा. नारायण कृष्ण अगाशे.
रा.सा. बळवंतरावजी सप्रे वाळवें.
रा. मोरेश्वर पांडुरंग रानडे.
रा. कुंडलिकराव पाटील फडतरे.

# प्रस्तावना.

ज्या साधु पुरुषाचा कवितासंग्रह आह्मी आज लोकांपुढें आणित आहों त्याचा कांहीं जीवनवृत्तांत आरंभीं देणें अवश्य आहे. परंतु या कामासाठीं आह्मांकडे साधनें फारच थोडीं आहेत, किंबहुना मुळींच नाहींत ह्मटलें तरी चालेल. याचीं कारणें शोधूं गेल्यास अनेक सांपडतील. एक तर हा साधु पूर्ववयांत अगदीं गरीब स्थितींत होता यामुळें त्याच्याविषयीं कोणी फारशी पूसतपास केलेली नाहीं. दुसरें, तो ज्या प्रदेशांत राहिला होता त्यांतल्या लोकांचें लक्ष नेहमीं व्यापारधंद्यांत मग्न झालें, असल्यामुळें ते विद्याप्राप्तीविषयीं अगदींच पराङ्मुख राहिले. मग याच्या कवितेस विचारतो कोण ? तिसरें, या साधूस मुळीं कोणाचा आश्रय नसल्यामुळें एकाद्या कोनाकोपऱ्यांत पडलेल्या झांकलेल्या रत्नाप्रमाणें त्याचें तेज अगदींच लोपून गेलें होतें. अशा व दुसऱ्या अनेक कारणांमुळें सोहिरोबांविषयीं कांहीं वृत्तांत मिळत नाहीं. फार तर काय, पण त्यांचे वंशज जे हल्लीं आहेत त्यांलाही त्यांविषयीं कांहीं माहिती नाहीं. आह्मांस जी कांहीं माहिती मिळाली आहे ती सावंतवाडी येथील अनेक वृद्ध पुरुषांच्या मुखांतून ऐकिलेली आहे, आणि तीच सर्व एकत्र करून आह्मी एथें देतों.

सुमारें पावणेदोनशें वर्षांपूर्वीं ह्मणजे शके १६३६ च्या सुमारास सावंतवाडी संस्थानांत बांदें[1] ह्मणून गांव आहे तेथें सोहिरोबा आंबिये या महान् साधु पुरुषाचें जन्म झालें. यांच्या पूर्वजांविषयीं फारशी माहिती मिळत नाहीं. परंतु सावंतवाडीस येण्यापूर्वीं त्यांची वस्ती गोवें प्रांतांत असावी असें दिसतें, कारण त्यांचे बहुतेक वंशज अद्यापि गोवें अमलांत आहेत. सोहिरोबा हे जातीचे शेणवी

---

१. बांदें हें शहर पूर्वीं विजापूरसरकारचे वेळीं एदिलाबाद या नांवानें प्रसिद्ध होतें, व तें त्या सरकारच्या राजधानीचें शहर होतें. मुसलमान लोकांनीं त्यावेळीं बांधलेलीं कबरस्थानें, घुमट, विहिरी वगैरे जुनीं दगडी कामें या ठिकाणीं अजूनही पुष्कळ पाहण्यांत येतात.